## राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/३६८

निर्णय दिनांक १६-०६-२००७

श्री. साठे राजाभाऊ बाबासाहेब, : अपीलार्थी

मु. पो. (दा.) तालुका परळी वैजनाथ

जिल्हा बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :

तथा सह संचालक, उच्च शिक्षण, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा विभागीय सह संचालक उच्च शिक्षण

औरंगाबाद विभाग, औरंगाबाद

**विवेचन**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १६-०६-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपीलार्थी श्री. साठे राजाभाऊ बाबासाहेब (यापुढे त्यांना अपीलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा सह संचालक उच्च शिक्षण औरंगाबाद श्री. अर्जुन पाटील (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल)

व जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय सह संचालक उच्च शिक्षण औरंगाबाद विभाग औरंगाबाद श्री. आर. बी. किर्दक (यापुढे त्यांना जन अपीलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

सुनावणीच्या वेळी प्रथमच अपीलार्थी यांनी आयोगापुढे दिनांक ३१-०१-२००७ चे केलेले कथित अपील त्यांनी केले नसून सदर अपीलावरील सही कोणी दुस-याच व्यक्तीने केली आहे व सदर अपील हे बनावट असल्याचे आयोगास लेखी शपथपत्रावर लिहून दिले आहे.

सदर अपील खोट्या सहीने केले असल्यामुळे तसेच सदर अपीलावर २० रुपये किंमतीचे स्टॅम्पस चिकटविलेले नसल्यामुळे हे अपील अवैध ठरते त्यामुळे सदर अपील खारीज करण्यात येत आहे.

## निर्णय

१. अपील खारीज करण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )
दिनांक १६ जून २००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. साठे राजाभाऊ बाबासाहेब, मु. पो. (दा.) तालुका परळी वैजनाथ जिल्हा बीड

२ जन माहिती अधिकारी तथा सह संचालक, उच्च शिक्षण, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय सह संचालक उच्च शिक्षण औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

५ निर्णय नस्ती

## राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२१६

निर्णय दिनांक १८-०६-२००७

श्री. पंढरीनाथ रघुनाथ बिजमवार, : अपीलार्थी
सेवानिवृत्त मुख्याधिकारी, रा. उमरी (महाकाली मंदिराजवळ) तालुका उमरी जिल्हा नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा मुख्याधिकारी, नगरपरिषद, कुंडलवाडी, जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा उप आयुक्त (सा. प्र.) विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद

**विवेचन**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १८-०६-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपीलार्थी श्री. पंढरीनाथ रघुनाथ बिजमवार (यापुढे त्यांना अपीलार्थी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत, जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी

नगरपरिषद कुंडलवाडी जिल्हा नांदेड हे गैरहजर असून जन अपिलीय अधिकारी तथा उप आयुक्त (सा. प्र.) विभागीय आयुक्त कार्यालय औरंगाबाद यांच्या प्रतिनिधी सौ. मंजुषा मुथा तहसीलदार नगर पालिका प्रशासन विभागीय आयुक्त कार्यालय औरंगाबाद (यापुढे त्यांना जन अपीलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) ह्या उपस्थित आहेत.

या प्रकरणी सर्व प्रथम अपीलार्थी यांनी त्यांच्या दिनांक ०४-०९-२००६ च्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे १९९३-९४ ते १९९७-९८ या चार आर्थिक वर्षाची आक्षेप क्रमांक १५ मध्ये संदर्भित केलेली अनियमित रक्कम २७,५९,५२६ वसूल न केल्याबाबत माहिती मागविली होती.

अपीलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाप्रमाणे ज्या माहितीची मागणी केली आहे ती पाहता अर्जदारास नेमकी काय माहिती हवी आहे त्याचा बोध होत नाही तथापि आज सुनावणीमध्ये अपीलार्थीने वरील संदर्भात लेखी आक्षेप परिच्छेद क्रमांक १५ दाखविला असता अपीलार्थीची मागणी अग्रीम रक्कमेच्या समायोजनाबाबतची आहे असे दिसून येते. नगरपरिषद कुंडलवाडी यांनी १९९३-९४ ते १९९७-९८ मध्ये २७,५९,५२६ रुपये इतक्या रक्कमेचे अग्रीम वेगवेगळ्या व्यक्तींना वेळोवेळी दिल्याचे दिसून येते तथापि सदर व्यक्तींनी नगरपरिषदेस विहित मुदत टळून गेल्यानंतरही या रक्कमेचा हिशोब सादर न केल्यामुळे या रकमा नगरपरिषदेच्या लेखावहीत वीना समायोजित राहिल्या आहे या रकमा त्वरीत समायोजित करुन घेण्याच्या लेखा परिक्षण पथकाने नगर परिषदेस सूचना दिल्या आहेत तथापि त्यावर अपीलार्थीने अर्ज करण्याच्या तारखेपर्यत कारवाई न होण्याची कारणे अपीलार्थीने जन माहिती अधिका-यास विचारली आहेत असे त्यांच्याशी आज झालेल्या चर्चेतून दिसून येते.

अपीलार्थीच्या या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी प्रथमतः दिनांक २९-०९-२००६ रोजी पत्र लिहून अपीलार्थीस ही माहिती प्राप्त करुन घेण्यापोटी येणारा खर्च म्हणून रुपये २७ इतके शुल्क शासकीय कोषागारात भरणा करण्याची सूचना दिली. सदर शुल्क

अपीलार्थीने दिनांक ०१-१०-२००६ रोजी अगर तत्पुर्वी भरावे अशीही सूचना या पत्रामध्ये शेवटी जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस दिल्याचे दिसून येते. त्यावर अपीलार्थीने दिनांक ०६-१०-२००६ रोजी जन माहिती अधिका-यास २७ रुपयाची मनीऑर्डर दिनांक ०६-१०-२००६ रोजी उमरी येथील पोस्ट ऑफिस पावती क्रमांक २६०६ दिनांक ०६-१०-२००६ अन्वये पाठविल्याचे दिसून येते.

अपीलार्थीने आवश्यक ते शुल्क जन माहिती अधिका-याकडे भरुनही अपीलार्थीस कोणतीही माहिती प्राप्त न झाल्यामुळे त्यांनी जन अपीलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०५-१२-२००६ रोजी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) मधील तरतुदीच्या अनुसार प्रथम अपील केले. सदर अपीलाची सुनावणी जन अपीलीय अधिकारी यांनी दिनांक २९-१२-२००६ रोजी घेऊन अपील दिनांक ०७-०१-२००७ रोजी अंतीम केले. या अपीलामध्ये त्यांनी अपीलार्थी यांचे अपील मान्य केले आहे व जन माहिती अधिकारी यांना अपीलार्थीस आवश्यक ती माहिती त्वरीत पुरविण्याचे सुचित केले आहे.

जन अपीलीय अधिकारी यांच्याकडून अपीलार्थी यांच्या अपीलावर निर्णय प्राप्त होऊनही अपीलार्थीस कोणतीही माहिती न मिळाल्यामुळे अपीलार्थीने व्यथित होऊन राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०९-०२-२००७ रोजी माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) अन्वये व्दितीय अपील केले आहे.

आज झालेल्या युक्तीवादामध्ये असे आढळून आले की अपीलार्थीने मागितलेली माहिती ही मुळातच जन माहिती अधिकारी यांच्याकडे रक्कम समायोजित न होण्याची कारणे काय आहे अशी होती. माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वये जन माहिती अधिका-यास कारणे विचारण्याचे अभिप्रेत नाही तथापि जन माहिती अधिका-याने अपीलार्थीचा सदर प्रमाणे माहितीचा अर्ज प्राप्त होऊनही अपीलार्थीस असा कोणत्याही प्रकारचा खुलासा केलेला दिसून येत नाही. त्याच बरोबर जन माहिती अधिकारी हे आयोगाने, दुस-यांदा, त्यांचे म्हणणे

मांडण्यासाठी संधी देऊन देखील सुनावणीस अनुपस्थित राहिले, त्यांच्या या अनुपस्थितीव्दारे त्यांना माहिती अधिकार अधिनियम २००५ संदर्भात त्यांच्या मनात असलेला अनादर अप्रत्यक्षपणे व्यक्त केला आहे असे आयोगाचे मत आहे. जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी अपीलार्थीस कारणे विचारण्याची तरतूद माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वये नाही असे जरी तात्काळ कळविले असते तरी अपीलार्थीस त्यांच्या मागणीतील त्रुटी वेळीच लक्षात आल्या असत्या व त्यांनी दुस-या प्रकारे या माहितीची मागणी केली असती तथापि त्यांनी अपीलार्थीस त्यांचे माहितीचे अर्जास अनुसरुन काहीही न कळविता या प्रकरणी केवळ मौन राखून एक प्रकारे अपिलार्थीस हव्या असलेल्या मागणीमध्ये अडथळा आणला असल्याचे सिध्द होत आहे. तेव्हा या प्रकरणी असे आदेशित करण्यात येते की, उप आयुक्त (सा. प्र.) विभागीय आयुक्त कार्यालय औरंगाबाद यांनी या प्रकरणी व्यक्तीशः लक्ष घालून अपीलार्थीने निर्देशित केलेल्या असमायोजित रक्कमा तात्काळ समायोजित करण्या संदर्भात संबंधित जन माहिती अधिका-यास सूचना द्याव्यात. तसेच त्यांनी अपीलार्थीच्या या माहितीच्या अर्जासंदर्भात दाखविलेला अक्षम्य बेपर्वाई बाबत त्यांच्यावर महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) शिस्त व अपील नियम १९७९ अन्वये योग्य ती प्रशासकीय कारवाई करावी / योग्य त्या प्रशासकीय प्राधिकरणा कडे प्रस्तावित करावी व दोन महिन्यात अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा. त्याच बरोबर अपीलार्थीकडून नगर परिषद कार्यालयास प्राप्त झालेली रक्कम रुपये २७ ही अपीलार्थीस हे आदेश प्राप्त झाल्या पासून दोन दिवसाचे आत जन माहिती अधिकारी यांनी व्यक्तीशः पोहोचती करावी.

मुख्य अधिकारी नगरपरिषद कुंडलवाडी जिल्हा नांदेड यांना असे आदेशित करण्यात येते की, या आक्षेपाची सद्यस्थिती अपीलार्थी यांना हे आदेश प्राप्त झाल्यापासून ७ दिवसाच्या आत विनामूल्य कळवावी. सदर माहिती प्राप्त झाल्यानंतर अपिलार्थी त्यांचे म्हणणे योग्य त्या प्रशासकीय प्राधिकरणाकडे मांडू शकतात.

अपीलार्थीस या प्रकरणा संदर्भातील नस्ती प्रत्यक्ष पाहावयाची आहे किंवा कसे असे विचारले असता अपीलार्थी यांनी नकारार्थी उत्तर दिले.

सबब खालील प्रमाणे निर्णय पारित करण्यात येत आहे.

## निर्णय

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. उप आयुक्त (सा. प्र.) विभागीय आयुक्त कार्यालय औरंगाबाद यांनी व्यक्तीशः लक्ष घालून अपीलार्थीने निर्देशित केलेल्या असमायोजित रक्कमा तात्काळ समायोजित करण्या संदर्भात जन माहिती अधिका-यास सूचना द्याव्यात. तसेच अपीलार्थीच्या माहितीच्या अर्जासंदर्भात दाखविलेला अक्षम्य बेपर्वाई बाबत जन माहिती अधिकारी यांच्यावर महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) शिस्त व अपील नियम १९७९ अन्वये योग्य ती प्रशासकीय कारवाई करावी / योग्य त्या प्रशासकीय प्राधिकरणाकडे प्रस्तावित करावी व दोन महिन्यात अहवाल आयोगास सादर करावा.

३. अपीलार्थीकडून नगर परिषद कार्यालयास प्राप्त झालेली रक्कम रुपये २७ ही अपीलार्थीस हे आदेश प्राप्त झाल्या पासून जन माहिती अधिकारी यांनी दोन दिवसाचे आत व्यक्तीशः पोहोचती करावी.

४. मुख्य अधिकारी नगरपरिषद कुंडलवाडी जिल्हा नांदेड यांनी या आक्षेपाची सद्यस्थिती अपीलार्थी यांना हे आदेश प्राप्त झाल्यापासून ७ दिवसाच्या आत विनामूल्य कळवावी.

औरंगाबाद — ( वि. बा. बोरगे )

दिनांक १८ जून २००७ — राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. पंढरीनाथ रघुनाथ बिजमवार, रा. उमरी तालुका उमरी जिल्हा नांदेड

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगरपरिषद, कुंडलवाडी, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप आयुक्त (सा. प्र.) विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन, संचालनालय, मुंबई यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

६ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

अपील क्रमांक- २००७/ २९९/रामाआ/औ'बाद
निर्णय दिनांक १८ जून ,२००७

१. अध्यक्षा, अखिल भारतीय महिला सुरक्षा व विकास महासंघ नांदेड. .. अपिलार्थी.

विरुध्द

१. जनमाहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड. .. प्रतिवादी

२. जनअपिलिय अधिकारी तथा अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, नांदेड. ..

**विवेचन**

वरील प्रकरणाची सुनावणी दिनांक- १८ जून,२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अध्यक्षा, अखिल भारतीय महिला सुरक्षा व विकास महासंघ नांदेड, (येथून पुढे अपिलार्थी असे संबोधण्यात येईल.) हया गैरहजर आहेत. तर जनमाहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, श्री.अविनाश त्र्यंबकराव धोंडगे, ( येथून पुढे जनमाहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल ) व जनअपिलीय अधिकारी तथा अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, नांदेड, श्री.सु.अ.वांढेकर ( येथून पुढे जनअपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल ) तसेच सहायक जनमाहिती अधिकारी, श्री.म.ब.बंगाळे, हजर आहेत.

> “ या प्रकरणी अपिलार्थी यांनी त्यांचे दिनांक-२७-०१-२००६ रोजीच्या अर्जानूसार जनमाहिती अधिकारी यांच्या कार्यालयामार्फत, रोजगार हमी योजने अंतर्गत हदगांव तालूक्यातील धानोरा,हस्तरा, नेवरी, नवेरीवाडी पुरहानी दुरुस्तीचे काम ज्या मजुरांनी केलेले आहे. त्या मजुरांच्या हजेरीपटाची सत्यप्रत मिळणे बाबत अर्ज केला होता. ”

सदर अर्ज अपिलार्थीने सरळपणे जनमाहिती अधिका-यास न करता तो सहायक जनमाहिती अधिकारी यांना उद्देशून केला होता. संबंधित उपअभियंता यांनी सदर अर्ज जनमाहिती अधिकारी यांच्याकडे न पाठविता जनमाहिती अधिकारी यांच्याकडे वरीलप्रमाणे अर्ज प्राप्त झाल्याचे जनमाहिती अधिकारी यांना दिनांक-१०-फेब्रवारी, २००६ रोजी कळविले.

अपिलार्थी यांनी त्यांच्या माहितीच्या मागणीच्या अर्जामध्ये नमूद केलेली सदर हजरीपत्रके जुनी असल्यामुळे विभागीय कार्यालयातून प्राप्त करण्यास उपअभियंता यांना विलंब लागला व परिणामी अपिलार्थीस ही माहिती देण्यास उपअभियंता यांना विलंब झाला, वास्तविक ही माहिती जनमाहिती अधिकारी म्हणजेच कार्यकारी अभियंता यांनी द्यावयास हवी होती. तथापि त्यांनी तसे न करता उपअभियंता, जे या प्रकरणी सहायक जनमाहिती अधिकारी आहेत त्यांच्या मार्फत अपिलार्थीस देण्याची कार्यवाही केली. त्याचवेळी संबंधित उपअभियंता ह्दयविकाराने आजारी असल्याने अपिलार्थीस माहिती देण्यास सहायक माहिती अधिका-यांना विलंब लागल्याचे त्यांनी आयोगाच्या निदर्शनास आणले आहे.

अपिलार्थीच्या माहितीच्या अर्जावर या टप्यावर जनमाहिती अधिकारी व सहायक जनमाहिती अधिकारी हया दोघाकडूनही आपापली कर्तव्ये बजावण्यात चूक झाली असल्याचे दिसून येते. माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदी नूसार सहायक जनमाहिती अधिकारी यांनी ( येथे उपअभियंता) यांनी सदर अर्ज मूळप्रतीत पाच दिवसाच्या आत जनमाहिती अधिकारी ( कार्यकारी अभियंता ) यांच्याकडे मुळप्रतीत पाठवावयास हवा होता. तथापि त्यांनी तसे न करता अपिलार्थीने मागितलेली माहिती जनमाहिती अधिकारी यांच्या कार्यालयातून पत्रव्यवहारा व्दारे प्राप्त करुन घेण्याचा प्रयत्न केला व त्याच बरोबर जनमाहिती अधिकारी यांनी ही माहिती त्यांच्या पातळीवर देण्याचे या अधिनियमाव्दारे अपेक्षीत असतांना त्यांनी तसे न करता संबंधीत सहायक जनमाहिती अधिका-यांमार्फत अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन दिली.

अपिलार्थीस अपेक्षित असलेली माहिती विहीत कालावधीमध्ये प्राप्त न झाल्यामूळे अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) अन्वये जनअपिलिय अधिकारी यांच्याकडे दिनांक- ०८-०३-२००६ रोजी प्रथम अपिल केले. या अपिलामध्ये अपिलार्थीने आपली मूळमाहितीची मागणी कायम ठेवली आहे.

या अपिलावर कोणत्याही प्रकारची सुनावणी न घेता जनअपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील पत्र क्रमांक २३६७, दिनांक- ०१ एप्रिल, २००६ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस, उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, हदगांव यांना अपिलार्थीस माहिती देण्याचे सूचीत केले असल्याचे कळविले.

अपिलाची सुनावणी कशी असू नये, याचा हा उत्तम नमूना आहे. सार्वजनिक बांधकाम खात्यातील अपिले ठरवितांना कोणतेही जनअपिलीय अधिकारी आवश्यक पध्दतीचे पालन न करता फक्त साधा पत्रव्यवहार करतात, ही बाब सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्या वेळोवेळी निदर्शनास आणून देण्यात आलेली आहे. वास्तविकतः अपिल ठरवितांना दोन्हीही पक्षकारांना बोलावून, त्यांचे म्हणणे ऐकून आपला अंतिम निर्णय जनअपिलीय अधिकारी यांनी देणे अभिप्रेत आहे. तथापि यापैकी कोणतीही कृती न करता अपिलार्थीस पत्रव्यवहाराव्दारे आपला निर्णय कळविणे, ही चूक आहे. असे परत एकदा त्यांच्या निदर्शनास आणून देण्यात येत आहे.

जनअपिलीय अधिकारी यांच्याकडील वरील निर्णयाने समाधन न झाल्यामूळे व आवश्यक ती माहिती प्राप्त न झाल्यामूळे अपिलार्थीने व्यथीत होवून राज्य माहिती आयोगाकडे दिनांक- २६-०४-२००६ रोजी व्दितीय अपिल केले आहे.

आज झालेल्या युक्तीवादामध्ये व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्राची तपासणी करता अपिलार्थीने जनमाहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती स्वतः वैयक्तीकरित्या न करता एक संस्था म्हणून केलेली आहे. माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ३ ची तरतूद पहाता, माहिती अधिकार हा सर्व नागरीकांना आहे. यामध्ये सदर अधिकार संस्थेस आहे किंवा कसे, याचा उल्लेख नाही, त्याच बरोबर इतर कलमांमध्ये अर्जदाराचा जो उल्लेंख केला आहे. त्यावरुन या अधिनियमास अर्जदार ही एखादी व्यक्ती असणे अभिप्रेत असल्याचे दिसून येते.

आज सुनावणीस अपिलार्थी गैरहजर आहेत. त्यामूळे त्यांचे या मुद्यावर म्हणणे या विवेंचनामध्ये मांडता येत नाही. एवढे जरी असले तरी जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक- २८-०४-२००६ रोजी आवश्यक ती माहिती पुरविल्याचे आयोगास उपलब्ध करुन दिलेल्या कागदपत्रावरुन दिसून येते. त्याचबरोबर अपिलार्थीची आता कोणतीही तक्रार राहीली नसल्याचे व सदर माहिती दिनांक २८-०४-२००६ रोजी अपिलार्थी यांना मिळाल्याच्या पोचपत्राची प्रत जनमाहिती अधिकारी यांच्यातर्फे आयोगास सादर करण्यात आली आहे.

या प्रकरणातील सर्व घटनाक्रम व जनमाहिती अधिकारी, सहायक जनमाहिती अधिकारी व जनअपिलिय अधिकारी यांची कार्यपध्दती पहाता, त्यांना माहिती

अधिकार अधिनियम २००५ मधील कलमाच्या अंमलबजावणी / तरतुदीचे आवश्यक ते ज्ञान नसल्याचे दिसून येते. यास्तव सचिव, सार्वजनिक बांधकाम यांना सूचीत करण्यात येते की, माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदी / अंमलबजावणी संदर्भात त्यांनी त्यांचे कार्यक्षेत्रातील सर्व क्षेत्रिय अधिका-यांकरिता वेळोवेळी कार्यशाळा / शिबीरे आयोजित करावीत व या प्रकरणात आपला अनुपालन अहवाल आयोगास दोन महिन्यात सादर करावा. वरील विवेंचनाच्या प्रार्श्वभूमीवर अपिलार्थीचे हे अपिल निकाली काढण्यात येत आहे. सबब खालील प्रमाणे निर्णय पारीत करण्यात येत आहे.

## निर्णय

१. अपिल निकाली काढण्यात येत आहे.

२. सचिव, सार्वजनिक बांधकाम यांना सूचीत करण्यात येते की, माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदी / अंमलबजावणी संदर्भात त्यांचे कार्यक्षेत्रातील सर्व क्षेत्रिय अधिकारी / कर्मचारी यांचे करिता वेळोवेळी कार्यशाळा / शिबीरे आयोजित करावीत.

औरंगाबाद<br>
दिनांक-१८ जून, २००७.

**(वि. बा. बोरगे)**<br>
**राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद**

प्रति,

१ अध्यक्ष अखिल भारतीय महिला सुरक्षा व विकास महासंघ नांदेड.

२ जनमाहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड, यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

३ जनअपिलिय अधिकारी तथा, अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, नांदेड, यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

४ सचिव, सार्वजनिक बांधकाम, मंत्रालय, मुंबई-३२, यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

५ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला, नविन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई- ३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यासाठी.

६ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

अपील क्रमांक- २००७/ ३५६/रामाआ/औ'बाद
निर्णय दिनांक १९ जून ,२००७

१. मामीलवाड मारोती नागोबा .. अपिलार्थी.
तालूका अध्यक्ष बहुजन समाज पार्टी,
मुखेड, गजानन पिंटीगप्रेस,
शिवाजीनगर, मुखेड, जिल्हा-नांदेड.

विरुध्द

१. जनमाहिती अधिकारी तथा .. प्रतिवादी
वन परिक्षेत्र अधिकारी, मुखेड,

२. जनअपिलिय अधिकारी तथा ..
सहायक वन संरक्षक (रोहयो) नांदेड

**<u>विवेचन</u>**

वरील प्रकरणाची सुनावणी दिनांक- १९ जून,२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, श्री. मामीलवाड मारोती नागोबा, (येथून पुढे अपिलार्थी असे संबोधण्यात येईल.) हे गैरहजर आहेत. तर जनमाहिती अधिकारी तथा वन परिक्षेत्र अधिकारी, मुखेड, श्री.मो.सिराजोद्दीन,( येथून पुढे जनमाहिती अधिकारी तथा वन परिक्षेत्र अधिकारी असे संबोधण्यात येईल ) व जनअपिलीय अधिकारी तथा सहायक वन संरक्षक (रोहयो) नांदेड, श्री. बी.एस.देशमुख ( येथून पुढे जनअपिलीय अधिकारी तथा सहायक वन संरक्षक (रोहयो) नांदेड असे संबोधण्यात येईल ) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्याकडील दिनांक- ०१-०२-२००६ रोजीच्या अर्जान्वये जनमाहिती अधिकारी यांच्याकडे " मार्च २००५ ते मार्च २००६ या वर्षाच्या कालावधीतील विकास कामांची माहिती व कामावरील मजुरांचे मस्टरची झेरॉक्सप्रत, नियोजीत कामांची माहिती, झालेल्या कामांच्या एम.बी."
या माहितीची मागणी केली होती.

सदर माहिती अपिलार्थीने रजिस्टर-पोष्टाने मागविली होती.

अपिलार्थीच्या वरील अर्जास अनुसरुन जनमाहिती अधिकारी यांनी त्यांचे पत्र क्रमांक६८७, दिनांक- ०४-०३-२००६ अन्वये, "मजूरांचे मस्टर लेखा शाखेत विभागीय कार्यालयास सादर केले आहेत. मार्च, २००५ ते मार्च, २००६ मधील नियोजित कामे कार्यालयात येवून पहावून जावी व विविध योजनेतंर्गत चालू असलेली

व होणा-या नियोजीत कामांची माहिती देण्या संदर्भात आवश्यक ती रक्कम जनमाहिती अधिकारी यांच्या कार्यालयात भरण्या विषयी सूचीत केले आहे.

जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पाठविलेल्या या पत्रामध्ये एकूण माहिती किती पृष्ठांची आहे व अपिलार्थीस किती शुल्क भरावयाचे आहे, याची कोणतीही कल्पना दिल्याचे आयोगास उपलब्ध करुन दिलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही. त्याचबरोबर अपिलार्थीने हे शुल्क भरण्या संदर्भात काय कार्यवाही केली. हेही कळण्यास आज अपिलार्थी अनुपस्थित असल्यामूळे मार्ग नाही.

जनमाहिती अधिकारी यांच्याकडून विहीत मुदतीत कोणतीच माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी अन्वये जनअपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक- ०२-०३-२००६ रोजी प्रथम अपिल केले.

या अपिलावर जनअपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारे सुनावणी घेतल्याचे आयोगास उपलब्ध करुन दिलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही. तथापि जनअपिलीय अधिकारी यांनी ही माहिती अपिलार्थीस दिली किंवा कसे, इ. प्रकारच्या वेगवेगळया पत्राव्दारे जनमाहिती अधिकारी यांच्याकडे पृच्छा करुन कालापव्यय केल्याचे दिसून येते. जनअपिलीय अधिका-याच्या या कृतीची यथायोग्य नोंद प्रधान मुख्य वनसंरक्षक, नागपूर यांनी घ्यावी.

जनअपिलिय अधिकारी यांच्याकडे केलेल्या अपिलावर  कोणताही निर्णय न झाल्यामूळे व अपिलार्थीस कोणतीही माहिती न मिळाल्यामूळे अपिलार्थीने व्यथीत होवून राज्य माहिती आयोगाकडे दिनांक- १०-०४-२००६ रोजी व्दितीय अपिल केले.

या अपिलामध्ये त्यांनी त्यांच्या मूळमाहितीच्या अर्जाची जनमाहिती अधिकारी व जनअपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची दखल न घेतल्याने त्यांच्यावर दंडात्मक कार्यवाही करण्याची मागणी केली आहे व त्याचबरोबर आपल्या मूळमाहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आज झालेल्या सुनावणीमध्ये वनविभागाचे अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मागितलेली माहिती दिनांक- २४-०१-२००७ रोजी दिल्याचे आयोगास सांगितले व सदर माहिती अपिलार्थीस मिळाल्याप्रित्यर्थ त्याची पोंचपावती आयोगाकडे सादर करण्यात आली.

अपिलार्थीने मागीतलेल्या माहितीचे स्वरुप व व्याप्ती पहाता अपिलार्थीस निश्चीतपणे काय माहिती हवी आहे, याचा बोध होत नाही. त्याचबरोबर अपिलार्थीस ही माहिती पुरविण्यामध्ये सार्वजनिक प्राधिकरणाची  साधन-सामूग्री प्रमाणाबाहेर वळवावी लागत आहे किंवा कसे याचाही बोध होत नाही.

अपिलार्थीस  जरी त्यांनी मागितलेली माहिती  मिळाली असली तरी ती दिनांक- २४-०१-२००७ रोजी मिळाल्याचे दिसते. म्हणजेच  सुमारे १० महिने २३ दिवस इतक्या उशिराने ही माहिती जनमाहिती अधिकारी यांच्याकडून पुरविली गेल्याचे

दिसून येत आहे. त्याचबरोबर जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या माहितीसाठीचा अर्ज प्राप्त झाल्यानंतर निश्चीत किती रक्कम भरावयाची , याचे मार्गदर्शन केले नाही. जनमाहिती अधिकारी यांचे दिनांक- ०४-०३-२००६ रोजीचे पत्र पाहिले असता, या पत्रामधील मूळतारीख दिनांक ०४-०२-२००७ हीच्यात खाडाखोड करुन ही तारीख दिनांक ०४-०३-२००६ अशी दर्शविण्यात आली आहे. तारखेतील खाडाखोडीकडे जरी दुर्लक्ष केले तरी या पत्रातील अपिलार्थीस दिलेल्या उत्तराचे स्वरुप म्हणजेच माहिती देण्याचे कसे टाळावे, याचा उत्तम नमूना असे म्हटल्यास वावगे होणार नाही.मात्र या उत्तरावरुन अपिलार्थीस जनमाहिती अधिकारी यांनी विहीत मुदतीत माहिती देण्याची टाळाटाळ केल्याचे मात्र सिध्द होत आहे. अशा प्रकरणी अपिलार्थीने मागितलेल्या मस्टररोलची प्रत जनमाहिती अधिकारी यांनी विभागीय कार्यालयात जावून त्याची झेरॉक्सप्रत काढून अपिलार्थीस पुरविणे, या कायद्यामध्ये अभिप्रेत आहे. याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

या प्रकरणातील सर्व घटनांचा घटनाक्रम पाहिला असता वनविभागातील क्षेत्रीय अधिका-यांना माहिती अधिकार अधिनियिम २००५ मधील तरतूदी / अंमलबजावणीच्या संदर्भात आवश्यक ते ज्ञान नसल्याचे आढळून आले आहे. तेव्हा याची दखल घेवून, प्रधान मुख्य वनसंरक्षक वनवृत्त विभाग, नागपूर, यांना आदेशीत करण्यात येते की, माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदी / अंमलबजावणी संदर्भात त्यांचे कार्यक्षेत्रातील सर्व क्षेत्रीय अधिकारी / कर्मचारी यांचे करिता वेळोवेळी कार्यशाळा / शिबीरे आयोजित करावीत.

आता अपिलार्थीस माहिती १० महिने २३ दिवस इतक्या विलंबाने जरी प्राप्त झाली तरी अपिलार्थीस ही माहिती देण्यास जो असमर्थनिय विलंब जनमाहिती अधिकारी यांनी लावला आहे. त्याबद्दल व त्याच बरोबर अपिलार्थीस माहिती देण्यासाठी टाळाटाळ केली असल्याचे सिध्द होत असल्याने त्यांच्यावर प्रधान मुख्य वनसंरक्षक वनवृत्त विभाग औरंगाबाद यांनी यथायोग्य प्रशासकीय कार्यवाही करावी, असे आदेशीत करण्यात येत आहे. वरील विवेंचनाच्या प्रार्श्वभूमीवर खालील प्रमाणे निर्णय पारीत करण्यात येत आहे.

## निर्णय

३. अपिल अंशतः मान्य करण्यात येत आहे.

४. अपिलार्थीस ही माहिती देण्यास जो असमर्थनिय विलंब जनमाहिती अधिकारी यांनी लावला आहे. त्याबद्दल त्यांच्यावर प्रधान मुख्य वनसंरक्षक, महाराष्ट्र-राज्य नागपूर, यांनी यथायोग्य प्रशासकीय कार्यवाही करावी.

३. प्रधान मुख्य वनसंरक्षक, महाराष्ट्र-राज्य,नागपूर, यांना माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदी / अंमलबजावणी संदर्भात त्यांचे कार्यक्षेत्रातील सर्व क्षेत्रीय अधिकारी / कर्मचारी यांचे करिता वेळोवेळी कार्यशाळा / शिबीरे आयोजित करावीत.

औरंगाबाद
दिनांक-१९ जून, २००७.

**(वि. बा. बोरगे)**
**राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद**

प्रति,

१ श्री.मामीलवाड मारोती नागोबा, रा.मुखेड, जिल्हा- नांदेड

२ जनमाहिती अधिकारी तथा वन परिक्षेत्र अधिकारी, मुखेड, जिल्हा- नांदेड, यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

३ जनअपिलीय अधिकारी तथा,सहायक वन संरक्षक (रोहयो) नांदेड , नांदेड, यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

४ प्रधान मुख्य वनसंरक्षक, महाराष्ट्रराज्य,नागपूर, वनभवन सिव्हील लाईन, नागपूर यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

५ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला, नविन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई- ३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यासाठी.

६ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/३७०

निर्णय दिनांक १९-०६-२००७

श्री. बंडे भालचंद्र माधवराव, : अपीलार्थी

जिल्हा कार्याध्यक्ष, भ्रष्टाचार विरोधी जन

आंदोलन, संपर्क कार्यालय व्हाईट हाऊस,

मेनरोड, मुखेड, तालुका मुखेड जिल्हा नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :

तथा सहाय्यक वन संरक्षक (रोहयो), वन

विभाग नांदेड जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा उप वन संरक्षक वन विभाग, गांधी

पुतळ्यामागे, नांदेड जिल्हा नांदेड

## विवेचन

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १९-०६-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपीलार्थी श्री. बंडे भालचंद्र माधवराव हे गैरहजर आहेत, तर जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक वन संरक्षक (रोहयो), वन विभाग नांदेड जिल्हा नांदेड श्री. बी. एस. देशमुख (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा उप वन संरक्षक वन विभाग, नांदेड जिल्हा नांदेड श्री. व्ही. जे. वरवंटे (यापुढे त्यांना जन अपीलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपीलार्थी यांनी सर्व प्रथम दिनांक ०६-०१-२००६ रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रातील कर्मचा-यांच्या बदल्या संदर्भात काही माहिती मागविली होती. या माहितीमध्ये - कर्मचारी कोठून कोठे, जेथे बदली झाली तेथे किती वर्षे काम त्यांनी केले, त्यांची प्रतिनियुक्ती पुर्वीच्याच ठिकाणी करण्यात आली काय, प्रतिनियुक्ती पुर्वीच्याच जागी असेल तर बदली का करण्यात आली, दोन वेळा बदली होऊनही परत त्याच ठिकाणी बदली का करण्यात आली. एकदाही बदली झाली नाही अशा कर्मचा-यांची बदली शासन परिपत्रक क्रमांक एसआर नि. १०९७/प्र.क्र. २०/९७/बारा दिनांक २७-१२-१९९७ च्या अ. क्र. ६ नुसार अद्याप बदली का केली नाही. काही कर्मचा-यांच्या ३ वेळा, काहींच्या २ तर काहींच्या १ वेळा बदल्या केल्या ह्यावेळी वरिल जी. आर. चे उल्लंघन करण्यात आले नाही का उल्लंघन केलेल्या वनपरिक्षेत्र अधिका-यावर कार्यवाही करुन अहवाल सादर करावा. - इ. माहितीचा समावेश आहे.

सदर माहिती अपीलार्थीने रजिस्टर्ड पोस्टाने मागविली असून माहितीचा कालावधी अपीलार्थीने सन १९९४ ते माहितीच्या अर्जावरील तारखेपर्यत म्हणजे दिनांक ०६-०१-२००६ पर्यत अशी १२ वर्षाची माहिती अपेक्षिली आहे.

अपीलार्थीस माहिती देण्याच्या दृष्टीने अपीलार्थीच्या सदर अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी कोणतीही कारवाई केल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागद पत्रावरुन दिसून येत नाही. जन माहिती अधिकारी यांच्याकडून विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्यामुळे अपीलार्थीने दिनांक २७-०२-२००६ रोजी जन अपीलीय अधिकारी यांच्याकडे माहिती अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) अन्वये प्रथम अपील केले.

या अपीलाची सुनावणी जन अपीलीय अधिकारी यांनी दिनांक २०-०१-२००७ रोजी म्हणजेच ११ महिने इतक्या उशीराने घेतली. या सुनावणीमध्ये अपीलार्थी यांनी त्यांना जन अपीलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २७-०२-२००६ रोजी केलेल्या अर्जा संदर्भात माहिती मिळाली असल्याने अर्ज निकाली काढावा अशी विनंती केल्याचे या अपीलाच्या सुनावणी टिपणावरुन दिसून येते. अपीलार्थीच्या या विनंतीनुसार अपीलार्थीचा अर्ज जन अपीलीय अधिकारी यांनी निकाली काढला आहे.

वरील प्रमाणे निर्णय होऊनही समाधान न झाल्याने अपीलार्थीने व्यथित होऊन राज्य माहिती आयोगाकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) अन्वये दिनांक ०३-०४-२००६ रोजी या मागणी संदर्भात व्दितीय अपील केले आहे.

आज झालेल्या युक्तीवादामध्ये अपीलार्थी यांनी मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप पाहता अपीलार्थीने बहुतेक सर्व माहिती प्रश्नार्थक स्वरुपात विचारली असून शासनाच्या दिनांक २७-१२-१९९७ च्या आदेशाचे उल्लंघन करणारे वन परिक्षेत्र अधिका-यावर कारवाई करण्याची अपेक्षा केली आहे. वन विभागाच्या अधिका-यांनी त्यांचा युक्तीवाद आयोगासमोर मांडतांना अपीलार्थीस आवश्यक ती माहिती त्यांनी दिल्याचे ते कागदोपत्री सिध्द करु शकले नाहीत. या प्रकरणामध्ये अपीलार्थीने प्रश्नार्थक स्वरुपात माहिती विचारणे व वन विभागाच्या अधिका-यांनी अपीलार्थीस माहिती दिल्याचे वन विभागाच्या अधिका-यांना सिध्द करता न येणे या दोन्ही बाबी त्यांनी केलेल्या युक्तीवादाशी विसंगत दिसत आहे. तेव्हा या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस त्यांचे मूळ अर्जातील माहिती अपीलार्थीस, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीस अनुसरुन योग्य ती माहिती हे आदेश प्रस्तुत झाल्यापासून १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी असे आदेशित करण्यात येत आहे. त्याच बरोबर जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीच्या प्रथम माहितीच्या अर्जावर विहित कालमर्यादेत कोणताही सकारात्मक प्रतिसाद न दिल्यामुळे त्यांच्यावर महाराष्ट्र नागरी सेवा नियम १९७९ (शिस्त व अपील) मधील तरतुदीनुसार योग्य ती प्रशासकीय कारवाई करावी असे प्रधान मुख्य वन संरक्षक (नागपूर) वन भवन, सिव्हील लाईन, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांना करण्यात येत आहे.

प्रसंगावशात वेळोवेळी झालेल्या सुनावणीमध्ये आयोगाच्या असे निदर्शनास आले आहे की, वन विभागाच्या क्षेत्रिय अधिका-यांना माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीच्या अंमलबजावणी संदर्भात त्यांच्या पदास किमान आवश्यक एवढेही ज्ञान त्यांना नाही तेव्हा या संदर्भात प्रधान मुख्य वन संरक्षक (नागपूर) वन भवन, सिव्हील लाईन, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांना सूचित करण्यात येते की त्यांनी या संदर्भात सर्व क्षेत्रिय अधिका-यांच्या वेळोवेळी कार्यशाळा / शिबीरे आयोजित कराव्यात.

वरील विवेचनाच्या पार्श्वभुमीवर हे अपील निकाली काढण्यात येत आहे.

## निर्णय

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस मूळ अर्जाप्रमाणे अपीलार्थीस, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीस अनुसरुन योग्य ती माहिती हे आदेश प्रस्तुत झाल्यापासून १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी

३. अपीलार्थीच्या प्रथम माहितीच्या अर्जासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस कोणताही सकारात्मक प्रतिसाद विहित कालमर्यादेत न दिल्यामुळे त्यांच्यावर महाराष्ट्र नागरी सेवा नियम १९७९ (शिस्त व अपील) मधील तरतुदीनुसार योग्य ती प्रशासकीय कारवाई प्रधान मुख्य वन संरक्षक (नागपूर) वन भवन सिव्हील लाईन, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी करावी व अनुपालन अहवाल आयोगास हे आदेश प्रस्तुत झाल्यानंतर दोन महिन्याचे आत पाठवावा.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक १९ जून २००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. बंडे भालचंद्र माधवराव, जिल्हा कार्याध्यक्ष, भ्रष्टाचार विरोधी जन आंदोलन, संपर्क कार्यालय व्हाईट हाऊस, मेनरोड, मुखेड, तालुका मुखेड जिल्हा नांदेड

२ जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक वन संरक्षक (रोहयो), वन विभाग नांदेड जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप वन संरक्षक वन विभाग, नांदेड जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य वन संरक्षक (प्रादेशिक) वन वृत्त औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ प्रधान मुख्य वन संरक्षक (नागपूर) वन भवन, सिव्हील लाईन, महाराष्ट्र राज्य नागपूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

७ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम**

**२००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/३७१

निर्णय दिनांक १९-०६-२००७

श्री. बंडे भालचंद्र माधवराव, : अपीलार्थी

जिल्हा कार्याध्यक्ष, भ्रष्टाचार विरोधी जन

आंदोलन, व्हाईट हाऊस, मेनरोड, मुखेड,

तालुका मुखेड जिल्हा नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :

तथा वन परिक्षेत्र अधिकारी, मुखेड

तालुका मुखेड जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा सहाय्यक वन संरक्षक (रोहयो) वन

विभाग, नांदेड

**विवेचन**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १९-०६-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपीलार्थी श्री. बंडे भालचंद्र माधवराव हे गैरहजर आहेत, तर जन माहिती अधिकारी तथा वन परिक्षेत्र अधिकारी, मुखेड तालुका मुखेड जिल्हा नांदेड श्री. मोहमद सिराजोद्दीन (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक वन संरक्षक (रोहयो) वन विभाग, नांदेड श्री. बी. एस. देशमुख (यापुढे त्यांना जन अपीलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपीलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक ०६-०१-२००६ रोजीच्या अर्जावरील जन माहिती अधिकारी यांच्याकडे खालील प्रमाणे माहितीची मागणी केली होती.

"(१) आपल्या कार्यालयाने मा. उप वन संरक्षक ह्यांना वन मजूर वर्ग ४ (३) च्या बदल्याबाबत जा. क्र. ३७१, दिनांक ०७-१०-२००५ चा अहवाल पाठवला व त्यानुसार बदल्या करण्यात आल्या त्या अहवालाची सांक्षांकित प्रत देणे.

(२) वरील अहवाल ज्या शासननिर्णय वा निकषाव्दारे बनविण्यात आला त्याची झेरॉक्स प्रत (सांक्षांकित) देणेबाबत."

सदर माहिती अपीलार्थीने टपालाने मागविली होती. या माहितीचा संबंधित कालावधी ऑगस्ट २००५ ते डिसेंबर २००५ असा आहे.

अपीलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ०४-०२-२००६ रोजी प्रथम उत्तर दिले. या पत्रामध्ये त्यांनी अपीलार्थीने मागणी केलेले पत्र क्रमांक ३७१ दिनांक ०७-१०-२००५ हे गोपनीय असल्यामुळे प्रस्तुत पत्राची प्रत त्यांना देता येत नसल्याचे कळविले आहे.

जन माहिती अधिकारी यांच्या वरील उत्तरावर समाधान न झाल्यामुळे अपीलार्थीने जन अपीलीय अधिकारी यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) अन्वये दिनांक १७-०२-२००६ रोजी प्रथम अपील केले. या अपीलामध्ये त्यांनी आपली माहितीची मूळ मागणी कायम ठेवली आहे.

तथापि या अपीलावर जन अपीलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी न घेता अपीलार्थीच्या या अपीलावर त्यांचेकडील पत्र क्रमांक ६७०८, दिनांक २०-०२-२००६ व पत्र क्रमांक ७४७४, दिनांक २२-०३-२००६ या पत्रान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडून अहवाल मागितला. वास्तविक पाहता जन अपीलीय अधिकारी यांनी त्यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या संदर्भात प्राप्त झालेल्या अपीलावर दोन्ही पक्षकारांना बोलावून त्यांची सुनावणी घेऊन अपील अंतीम करणे हे या कायद्याव्दारे अभिप्रेत आहे तथापि जन अपीलीय अधिकारी यांनी अशा प्रकारची कोणतीही कृती न करता त्यांनी या प्रकरणी अनावश्यक पत्रव्यवहार करुन सुनावणी घेण्याचे मुद्दाम टाळल्याचे आयोगास सादर करण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येते.

जन माहिती अधिकारी व जन अपीलीय अधिकारी यांनी या प्रकरणी कोणतीच कारवाई न केल्यामुळे व्यथित होऊन अपीलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) नुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १३-०४-२००६ (अपीलार्थीच्या अर्जावर दिनांक ०३-०४-२००६ अशी तारीख आहे.) रोजी व्दितीय अपील केले आहे.

आज झालेल्या युक्तीवादामध्ये असे आढळून आले आहे की, या प्रकरणी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) मधील तरतुदीनुसार अद्यापपावेतो कारवाई झालेली नाही. जन अपीलीय अधिकारी यांनी अपील सुनावणीस न घेण्याची कारणे ही उपलब्ध कागदपत्रावरुन कळून येत नाहीत. अपीलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप पाहता अपीलार्थीने मागणी केलेली माहिती, शासन आदेशाच्या प्रतीची मागणी वगळता, खरोखरच गोपनीय होती किंवा कसे व त्याच बरोबर या गोपनीयतेचे स्वरुप व व्याप्ती आयोगास कळण्यास मार्ग नाही त्यामुळे असे आदेशित करण्यात येते की जन अपीलीय अधिकारी यांनी या प्रकरणी सर्व प्रथम, अपीलार्थीच्या या प्रथम अपीलावर हे आदेश प्रस्तुत झाल्यापासून १५ दिवसाच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय द्यावा. (सोबत अपिलार्थीच्या दिनांक १७-०२-२००६ च्या प्रथम अपीलाची प्रत) जर अपीलार्थीचे या निर्णयाने समाधान झाले नाही तर अपीलार्थी या कायद्यातील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे पुन्हा अपील दाखल करु शकतील.

सबब खालील प्रमाणे निर्णय पारित करण्यात येत आहे.

## निर्णय

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक वन संरक्षक (रोहयो) वन विभाग, नांदेड यांनी अपीलार्थीच्या दिनांक १७-०२-२००६ च्या प्रथम अपिलावर हे आदेश प्रस्तुत झाल्यापासून १५ दिवसाच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय द्यावा.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक १९ जून २००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. बंडे भालचंद्र माधवराव, जिल्हा कार्याध्यक्ष, भ्रष्टाचार विरोधी जन आंदोलन, व्हाईट हाऊस, मेनरोड, मुखेड, तालुका मुखेड जिल्हा नांदेड

२ जन माहिती अधिकारी तथा वन परिक्षेत्र अधिकारी, मुखेड तालुका मुखेड जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक वन संरक्षक (रोहयो) वन विभाग, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी. (प्रथम अपिलाच्या प्रतीसह, सहपत्र : अपील दिनांक १७-०२-२००६)

४ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

५ निर्णय नस्ती

## राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/३२९

निर्णय दिनांक २०-०६-२००७

श्री. मुदखेडकर महमद एकबाल पि. महमद : अपीलार्थी
युसूफ, मुख्य संपादक, सा. सत्यवृत्त, मिल
कॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा मुख्याध्यापक इंदिराबाई देशमुख
हायस्कुल, हानेगाव, तालुका देगलूर, जिल्हा
नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा
परिषद, नांदेड

**विवेचन**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २०-०६-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपीलार्थी श्री. मुदखेडकर महमद एकबाल महमद युसूफ (यापुढे त्यांना अपीलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक इंदिराबाई देशमुख हायस्कुल हानेगाव तालुका देगलूर जिल्हा नांदेड श्री. शंकर किशनराव राठोड (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद नांदेड यांचे प्रतिनिधी अधीक्षक श्री. आर. बी. शिंदे (यापुढे त्यांना जन अपीलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी सर्व प्रथम अपीलार्थीने त्यांचे कडील अर्ज दिनांक १०-०२-२००६ अन्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडून इंदिराबाई देशमुख हायस्कुल मौजे हानेगाव तालुका देगलूर जिल्हा नांदेड या शाळेचे सह शिक्षकांचे संदर्भात खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

> " सह शिक्षक प्रल्हाद दामोधर जाधव, सह शिक्षिका कु. शोभा दामोधर जाधव या सह शिक्षकांच्या कायमस्वरुपी नियुक्ती मंजुरीची संचिका वर्तमानपत्राच्या जाहिरातीची तपशील व सत्यप्रत व सदरील सह शिक्षकांना शाळेच्या सेवेत सामावून घेण्यासाठी शिक्षण संस्था संचालकांच्या ठरावाची प्रत."

सदर माहितीचा कालावधी दिनांक ०१-०५-२००३ ते ०१-०८-२००३ असा दर्शविला असून ही माहिती अपीलार्थीने नोंदणीकृत टपालाव्दारे मागितली होती.

अपीलार्थीच्या या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी काहीही कारवाई केल्याचे दिसून येत नाही. जन माहिती अधिकारी यांनी सदर कारवाई न करण्याचे कारण विचारले असता त्यांना अपीलार्थीच्या या अर्जाची प्रत त्यांच्याकडे प्राप्त झाली नसल्याचे सांगितले.

विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने अपीलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (१) अन्वये दिनांक २४-०३-२००६ रोजी जन अपीलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. त्यावर कोणत्याही प्रकारची सुनावणी न घेता जन अपीलीय अधिकारी यांनी त्यांचेकडील पत्र क्रमांक ३४९८, दिनांक २८ मार्च २००६ अन्वये जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस त्यांनी मागितलेली माहिती देण्याचे सुचित केले. जन अपीलीय अधिकारी यांनी या प्रकरणी या अपीलावर कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतली नसल्याचे त्यांचे आज आयोगासमोर असलेले प्रतिनिधी यांनी मान्य केले आहे.

जन माहिती अधिकारी व जन अपीलीय अधिकारी यांच्याकडून कोणताही प्रतिसाद न मिळाल्यामुळे व्यथित होऊन अपीलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) अन्वये दिनांक २५-०४-२००६ रोजी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले. त्यामध्ये त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आज झालेल्या युक्तीवादामध्ये असे आढळून आले आहे की, अपीलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे केलेला अर्ज जन माहिती अधिकारी यांना प्राप्त झाला नाही असे ते आज सुनावणीमध्ये सांगत आहे. त्याच बरोबर जन अपीलीय अधिकारी यांनी त्यांना दिलेले दिनांक २८ मार्च २००६ चे पत्र देखील त्यांना प्राप्त झाले नसल्याचे त्यांनी आज सुनावणीमध्ये सांगितले. जन माहिती अधिकारी यांचे हे विधान आयोगास संशयास्पद वाटते. त्याच बरोबर जन अपीलीय अधिकारी यांची या प्रकरणी अपील न घेण्याची कृती, माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या मूळ उद्देशाला छेद देणारी आहे याचा येथे विशेष उल्लेख करणे गरजेचे आहे असे आयोगास वाटते. जन माहिती अधिकारी व जन अपीलीय अधिकारी यांनी या प्रकरणी अक्षम्य बेपर्वाई, निष्काळजी वृत्ती व माहिती अधिकार अधिनियम २००५ चे प्रती त्यांच्या मनात असलेला अनादर त्यांच्या या प्रकारच्या कृतीतून त्यांनी स्पष्ट केला आहे. जन अपीलीय अधिकारी यांनी या प्रकरणी दर्शविलेल्या वर्तनाची नोंद सचिव शालेय शिक्षण मंत्रालय मुंबई यांनी घ्यावी व त्याच बरोबर अपीलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागितलेली माहिती, जन माहिती अधिकारी यांनी, हे आदेश निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून ३ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी असे आदेशित करण्यात येत आहे. जर ही माहिती त्यांच्याकडे उपलब्ध नसेल तर त्यांनी या संदर्भिय शिक्षकांच्या नेमणुकीबाबत जी वस्तुस्थिती / सद्यस्थिती आहे ती अपीलार्थीस ३ दिवसाच्या आत कळवावी व याच बरोबर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती पुरविण्यासंदर्भात दाखविलेल्या निष्काळजीपणाबद्दल त्यांचे

वर संबंधित संस्थेच्या सचिवांनी यथायोग्य प्रशासकीय कार्यवाही करुन आयोगास आपला अनुपालन अहवाल सादर करावा.

वरील विवेचनाच्या पार्श्वभुमीवर हे अपील निकाली काढण्यात येत आहे.

## निर्णय

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागितलेली माहिती हे आदेश निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून ३ दिवसाच्या आत अपीलार्थीस विनामूल्य पुरवावी.

३. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती पुरविण्या संदर्भात दाखविलेल्या निष्काळजीपणा बद्दल त्यांचे वर संबंधित संस्थेच्या सचिवांनी यथायोग्य प्रशासकीय कार्यवाही करुन आयोगास आपला अनुपालन अहवाल सादर करावा.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक २० जून २००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. मुदखेडकर महमद एकबाल पि. महमद युसूफ, मुख्य संपादक, सा. सत्यवृत्त, मिल कॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक इंदिराबाई देशमुख हायस्कुल, हानेगाव, तालुका देगलूर, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव शालेय शिक्षण मंत्रालय मुंबई यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

६ निर्णय नस्ती

## राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/३५७

निर्णय दिनांक २०-०६-२००७

श्री. सदाशिव सटवा रायबोळे, : अपीलार्थी
व्दारा - ॲड जी. एस. रायबोळे,
सरस्वती कॉलनी (सिध्दार्थ कॉम्पलेक्स)
किनवट तालुका किनवट,
जिल्हा नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी,
नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा विभागीय समाजकल्याण अधिकारी,
लातूर विभाग लातूर

## विवेचन

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २०-०६-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपीलार्थी श्री. सदाशिव सटवा रायबोळे हे गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी तथा विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी नांदेड श्री. अविनाश रघुनाथ देवसटवार (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय समाजकल्याण अधिकारी लातूर विभाग लातूर श्री. शंकर बापुराव भंडारे (यापुढे त्यांना जन अपीलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपीलार्थीने सर्वप्रथम त्यांचेकडील दिनांक २६-१०-२००६ चे अर्जामध्ये जन माहिती अधिकारी यांच्याकडे सन २००५ ते २००६ या कालावधीतील खालील प्रमाणे माहिती शिघ्र पोस्टाव्दारे व्यक्तीशः मागितली होती. अपीलार्थी हे दारिद्र्य रेषेखालील आहे.

> “ सरस्वती विद्यामंदिर डि एड कॉलेज किनवट तालुका किनवट जिल्हा नांदेड येथील डि एड प्रथम वर्ष सन २००५ ते २००६ या कालावधीमध्ये शिक्षण घेत असलेल्या डि एड अनुसुचित जाती (एस. सी.) विद्यार्थी, विद्यार्थ्या साठी समाजकल्याण मंत्रालय मुंबई यांचे मार्फत डि एड अभ्यासक्रमाचे शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना शासनामार्फत दिलेल्या शिष्यवृत्तीची माहिती, डि एड प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्याचे नावागावासहीत त्यांना मंजूर झालेल्या शिष्यवृत्तीची माहिती तात्काळ देणे.”

सदर अर्ज जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात दिनांक ०१-११-२००६ रोजी प्राप्त झाल्याचे दिसून येते.

अपीलार्थीच्या या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत कारवाई केल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही.

तदनंतर अपीलार्थीने जन अपीलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०४-१२-२००६ रोजी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) अन्वये प्रथम अपील केले. (सदर दिनांक ०४-१२-२००६ अन्वये जन अपीलीय अधिकारी यांचेकडे केलेले हे अपील अपील जन अपीलीय अधिकारी यांचे कार्यालयाकडे दिनांक २१-१२-२००६ रोजी प्राप्त झाल्याचे दिसून येते) या अपीलामध्ये त्यांनी आपली माहितीची मूळ मागणी कायम ठेवली असल्याचे दिसून येते.

जन अपीलीय अधिकारी यांनी सदर अपील प्राप्त झाल्यानंतर त्यांचे कडील दिनांक ०२-०१-२००७ रोजीच्या पत्रान्वये जन माहिती अधिकारी यांना अपीलार्थीच्या या प्रकरणी स्पष्टीकरण विचारले व सदर माहिती १० दिवसाचे आत जन अपीलीय अधिकारी यांचे कार्यालयात सादर करण्याचे सुचित केले व त्याच बरोबर अपीलार्थीस, जन माहिती अधिकारी यांच्याकडून मागणी केलेली माहिती प्राप्त होताच त्यांच्याकडे पाठविण्यात येईल असे आश्वासित केले.

तथापि अपीलार्थीने या प्रकरणी राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १२-०२-२००७ रोजी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये व्दितीय अपील केले. या व्दितीय अपीलामध्ये त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आज झालेल्या युक्तीवादामध्ये जन अपीलीय अधिकारी यांनी राज्य माहिती आयोगास त्यांच्या शपथपुवर्क सादर केलेल्या म्हणण्यावरुन असे दिसून येते की,जन अपीलीय अधिकारी यांनी आदेश देऊनही जन माहिती अधिकारी यांनी जन अपीलीय अधिकारी यांच्याकडे माहिती सादर केली नाही त्यामुळे जन अपीलीय अधिकारी यांच्या कार्यालयातील श्री. आर. जी. सुर्यवंशी समाजकल्याण अधिकारी गट-ब, यांना जन अपीलीय अधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयात दिनांक १२-०२-२००७ रोजी पाठवून अर्जदाराने मागणी केलेली

माहिती समक्ष प्राप्त केली व प्राप्त केलेली माहिती अपीलार्थीस जन अपीलीय अधिकारी यांनी दिनांक १४-०२-२००७ रोजी पोस्टाव्दारे पाठविली.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, जन अपीलीय अधिकारी यांनी जरी विहित मुदतीत माहिती देण्यासंदर्भात कार्यवाही केली असली तरी त्यांनी यापुढे कोणतेही अपील ठरवितांना दोन्ही बाजुंच्या पक्षकारांना बोलावून, त्यांचे म्हणणे नोंदवून आपला अंतीम निर्णय द्यावयाचा असे या कायद्यात अभिप्रेत आहे. येथून पुढे त्यांनी अपीलाची सुनावणी घेतांना या पध्दतीचा अवलंब करावा असे त्यांना सुचविण्यात येत आहे. या प्रकरणात जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस माहिती देण्यासंदर्भात आपली उदासीन व बेपर्वावृत्ती प्रदर्शित केली आहे असे आयोगास वाटते. ही माहिती ज्या कर्मचा-याकडून त्यांच्याकडे यावयाची होती त्या कर्मचा-याच्या असहकारामुळे त्यांचेतील गलथानपणा व बेजबाबदार वृत्ती मुळे त्यांना ही माहिती अपीलार्थीस वेळेत देता आली नाही असे जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे आहे. तथापि त्यांचा हा युक्तीवाद, कोणत्याही प्रकारे त्यांची, अपीलार्थीस विहित मुदतीत माहिती न देण्याच्या कृतीचे, समर्थन करु शकत नाही. आपल्या हाताखालील कर्मचा-यावर त्यांनी यापुढे योग्य तो वचक ठेऊन त्यांच्याकडून विहित मुदतीत माहिती प्राप्त करुन ती अशा प्रकरणी अपीलार्थीस देणे हे त्यांचे प्रमुख कर्तव्य ठरते अशी समज त्यांना आयोगातर्फे देण्यात येत आहे. अपीलार्थीस विहित मुदतीत माहिती पुरविण्या कामी ज्या कर्मचा-याने अडथळा निर्माण करुन असहकार, बेपर्वाईचे प्रदर्शन केले आहे व वेळोवेळी जन माहिती अधिकारी यांना माहिती उपलब्ध करुन दिली नाही त्या कर्मचा-यांवर संचालक समाजकल्याण पुणे यांनी महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ अन्वये योग्य ती कारवाई करावी असे त्यांना सुचित करण्यात येत आहे. त्याच बरोबर जन माहिती अधिकारी यांनी यापुढे अशा प्रकरणी सदैव सतर्क राहावे अशी ताकीद त्यांना आयोगा तर्फे देण्यात येत आहे.

अपीलार्थीस आवश्यक ती माहिती आता मिळाली असल्यामुळे व अपीलार्थीची आज सुनावणीस असलेली अनुपस्थिती पाहता अपीलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे केलेले त्यांचे व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभुमीवर हे अपील निकाली काढण्यात येत आहे.

## निर्णय

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. अपीलार्थीस विहित मुदतीत माहिती पुरविण्याकामी ज्या कर्मचा-याने अडथळा निर्माण केला आहे व जन माहिती अधिकारी यांना माहिती उपलब्ध करुन दिली नाही त्या कर्मचा-यांविरुध्द संचालक समाजकल्याण पुणे यांनी महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ अन्वये योग्य ती प्रशासकीय कारवाई करावी व अनुपालन अहवाल आयोगास दोन महिन्यात पाठवावा.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक २० जून २००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. सदाशिव सटवा रायबोळे, व्दारा - ॲड जी. एस. रायबोळे, सरस्वती कॉलनी (सिध्दार्थ कॉम्पलेक्स) किनवट तालुका किनवट, जिल्हा नांदेड

२ जन माहिती अधिकारी तथा विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय समाजकल्याण अधिकारी, लातूर विभाग लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ संचालक समाजकल्याण संचालनालय, मध्यवर्ती इमारत, महाराष्ट्र राज्य, पुणे – ०१ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

६ निर्णय र्क्रेस्ती

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम**

**२००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/३६३

निर्णय दिनांक २०-०६-२००७

श्री. आनंद गणेश टाकळे, : अपीलार्थी

मु. पो. देगांव, तालुका नायगाव (खै.) जिल्हा

नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :

तथा मुख्याध्यापक जनता प्राथमिक शाळा

नायगाव, तालुका नायगाव, जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा

परिषद, नांदेड

**विवेचन**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २०-०६-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली.  सुनावणीच्या वेळेस अपीलार्थी श्री. आनंद गणेश टाकळे (यापुढे त्यांना अपीलार्थी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक जनता प्राथमिक शाळा, नायगाव तालुका नायगाव जिल्हा नांदेड हे गैरहजर आहेत.  जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद नांदेड श्री. अशोक शंकरराव पवार (यापुढे त्यांना जन अपीलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी सर्व प्रथम अपीलार्थीने त्यांचे कडील अर्ज दिनांक ११-०२-२००६ च्या पत्रान्वये दोन वेगवेगळ्या अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे जनता प्राथमिक शाळा नायगाव मध्ये कार्यरत असलेल्या सर्व अध्यापकांच्या विषयी खालील माहिती मागविली होती.

> “ (१) पगार पत्रक जनता प्राथमिक शाळा नायगाव माहे जुलै २००१ ते डिसेंबर २००३ पर्यतच्या पगार पत्रकाच्या नकला.
>
> (२) शाळेतील सर्व अध्यापक वर्गाचे प्रशिक्षण कोणत्या शैक्षणिक वर्षात पूर्ण केले त्याच्या नकला, सर्व शिक्षकांच्या वैयक्तीक मान्यतेची सत्यप्रत.
>
> (३) जनता प्राथमिक शाळेतील शिक्षकांच्या प्रवर्गनिहाय केलेल्या नेमणुका, त्याबरोबर जोडलेल्या जातीच्या प्रमाणपत्राच्या नकला व सदर जातीच्या प्रमाणपत्राची जात पडताळणी पथकाची प्रत प्रमाणपत्राच्या नकला.”

सदर माहितीचा कालावधी माहे जुलै २००१ ते डिसेंबर २००३ असा दर्शविला असून ही माहिती अपीलार्थीने रजिस्टर्ड टपालाव्दारे मागितली होती.

अपीलार्थीच्या या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस वरीलपैकी कोणतीही माहिती अपीलार्थीस दिली नाही.  त्यामुळे अपीलार्थीने माहिती अधिकार अधिनियम

२००५ मधील कलम १९ (१) नुसार दिनांक ०१-०३-२००६ अन्वये जन अपीलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले आहे.

अपीलार्थीचे सदर अपील प्राप्त झाल्यानंतर जन अपीलीय अधिकारी यांनी सदर संस्थेच्या सचिवांना, ते या प्रकरणी (शिक्षण संचालक पुणे यांचे परिपत्रक दिनांक १८-०१-२००६ नुसार संबंधित संस्थेचे सचिव जन अपीलीय अधिकारी आहेत.) जन अपीलीय अधिकारी असल्यामुळे या प्रकरणी अपीलार्थीस माहिती उपलब्ध करुन देण्यासाठी त्यांच्याकडील पत्र क्रमांक ३२३०, दिनांक २३ मार्च २००६ अन्वये कळविले.

तथापि संस्थेच्या सचिवाकडून या प्रकरणी काहीही कारवाई केल्याचे दिसून येत नाही. तदनंतर जन माहिती अधिकारी यांनी त्यांचेकडील पत्र क्रमांक ४०, दिनांक १२-०४-२००६ अन्वये अपीलार्थीस त्यांनी मागितलेली माहिती जात पडताळणी पत्रकाच्या नकला खेरीज उर्वरीत संपूर्ण माहिती अपीलार्थीस वरस्पर पाठविण्यात येत असल्याचे शिक्षणाधिकारी (प्राथमिक) शिक्षण विभाग जिल्हा परिषद नांदेड यांना कळविले. सदर माहिती अपीलार्थीस मिळाल्याची पोहोच जन अपीलीय अधिकारी यांनी आज आयोगास दाखविली.

तथापि ही माहिती मिळण्याच्या पुर्वीच म्हणजे दिनांक ०७-०४-२००६ रोजी अपीलार्थी ने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगा कडे या संदर्भात व्दितीय अपील केले होते.

आज झालेल्या युक्तीवादामध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस दिनांक १२-०४-२००६ रोजी माहिती पुरविल्याचे दिसून येते. त्याच बरोबर अपीलार्थीने मुख्य माहिती आयुक्त मुंबई यांचेकडे दिनांक ११-०२-२००६ रोजी देखील या प्रकरणी अपील केले होते व त्या अपीलामध्ये अपीलार्थीस माहिती पुरविण्याचे आदेश मुख्य माहिती आयुक्तांनी दिले होते. त्याचप्रमाणे अपीलार्थीस दिनांक ११-११-२००६ रोजी सदर माहिती प्राप्त झाल्याचे दिसून येते. तथापि अपीलार्थीचे आज सुनावणीमध्ये असे म्हणणे आहे की त्यांना या प्रती सांक्षांकित

करुन दिल्या नाहीत व श्री. नागठाणे शंकर शिवलींग सह शिक्षक ज. प्रा. शाळा नायगाव व शोभा श्रीराम जमादार सह शिक्षिका ज. प्रा. शाळा नायगाव या दोन शिक्षकांच्या जात प्रमाण पत्राच्या झेरॉक्स प्रती दिल्या नाहीत.

अपीलार्थी व जन अपीलीय अधिकारी यांचा युक्तीवाद ऐकून घेतला असता असे आदेशित करण्यात येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस अद्यापही न दिलेली वरील श्री. नागठाणे शंकर शिवलींग सह शिक्षक ज. प्रा. शाळा नायगाव व शोभा श्रीराम जमादार सह शिक्षिका ज. प्रा. शाळा नायगाव या दोन शिक्षकांच्या संदर्भातील माहिती हे आदेश निर्गमित झाल्यापासून ३ दिवसांच्या आत साक्षांकित करुन विनामूल्य द्यावी. याबाबत शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद नांदेड यांनी संबंधित जन माहिती अधिकारी हे ३ दिवसात आवश्यक ती माहिती अपीलार्थीस देतील याकडे वैयक्तीक लक्ष पुरवावे असे त्यांना सुचित करण्यात येते. त्याच बरोबर अपीलार्थीस यापुर्वी पाठविण्यात आलेल्या माहितीच्या झेरॉक्स प्रती साक्षांकित करुन द्याव्यात.

या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस माहिती पुरविण्याबाबत केलेल्या विलंबासंदर्भात त्यांचेवर सदर संस्थेचे सचिव यांनी यथायोग्य प्रशासकीय कारवाई करुन आपला अनुपालन अहवाल आयोगास एक महिन्याच्या आत सादर करावा.

वरील विवेचनाच्या पार्श्वभुमीवर अपीलार्थीचे हे अपील निकाली काढण्यात येत आहे.

**निर्णय**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. अपीलार्थीस यापुर्वी पाठविण्यात आलेल्या माहितीच्या झेरॉक्स प्रती साक्षांकित करुन द्याव्यात.

३. जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस अद्यापही न दिलेली श्री. नागठाणे शंकर शिवलींग सह शिक्षक ज. प्रा. शाळा नायगाव व शोभा श्रीराम जमादार सह शिक्षिका

ज. प्रा. शाळा नायगाव या दोन शिक्षकांच्या संदर्भातील माहिती हे आदेश निर्गमित झाल्यापासून ३ दिवसांच्या आत विनामूल्य द्यावी.

४. शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद नांदेड यांनी जन माहिती अधिकारी हे ३ दिवसात आवश्यक ती माहिती अपीलार्थीस देतील याकडे वैयक्तीक लक्ष पुरवावे.

५. जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस माहिती पुरविण्याबाबत केलेल्या विलंबा संदर्भात त्यांचेवर सदर संस्थेचे सचिव यांनी यथायोग्य प्रशासकीय कारवाई करुन आपला अनुपालन अहवाल आयोगास एक महिन्याच्या आत सादर करावा.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )
दिनांक २० जून २००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. आनंद गणेश टाकळे, मु. पो. देगांव, तालुका नायगाव (खै.) जिल्हा नांदेड

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक जनता प्राथमिक शाळा नायगाव, तालुका नायगाव, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ अध्यक्ष / सचिव, एज्युकेशन सोसायटी, नायगाव तालुका नायगाव जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेब साईट वर

प्रसिध्द करण्यासाठी.

६ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

अपील क्रमांक- २००७/ ३६९/रामाआ/औ'बाद
निर्णय दिनांक २० जून ,२००७

| | | |
|---|---|---|
| १. श्री. बत्तिन सायन्ना गंगाराम गौड,<br>सेवानिवृत्त जकात अधिक्षक तथा<br>करअधिक्षक, नांदेड वाघाळा<br>महानगरपालिका नांदेड<br>व्दारा/- रा. घर क्रमांक ३-२-२५२<br>गंगाधाम गवळीपुरा- नांदेड. | .. | अपिलार्थी. |

विरुध्द

| | | |
|---|---|---|
| १. जनमाहिती अधिकारी तथा<br>सहायक आयुक्त,<br>नांदेड वाघाळा शहर म.न.पा.<br>नांदेड. | .. | प्रतिवादी |
| २. जनअपिलिय अधिकारी तथा<br>उप आयुक्त,<br>नांदेड वाघाहा शहर म.न.पा.<br>नांदेड. | .. | |

## विवेचन

वरील प्रकरणाची सुनावणी दिनांक- १९ जून,२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, श्री.बत्तिन सायन्ना गंगाराम गौड (येथून पुढे अपिलार्थी असे संबोधण्यात येईल.), जनमाहिती अधिकारी तथा सहायक आयुक्त, नांदेड वाघळा शहर महानगरपालिका नांदेड, श्री.एम.एस.जोंधळे ( येथून पुढे जनमाहिती अधिकारी, असे संबोधण्यात येईल ) व जनअपिलीय अधिकारी, तथा उप आयुक्त, नांदेड वाघळा शहर महानगरपालिका नांदेड, श्री.दिलीप गुट्टे ( येथून पुढे जनअपिलीय अधिकारी, असे संबोधण्यात येईल ) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक- ०७-०१-२००६ रोजीच्या अर्जान्वये जनमाहिती अधिकारी यांच्याकडे " जकात चेकर्स / निरीक्षक वरीष्ठ लिपीक यांना मा.आयुक्त यांचे आदेश क्रमांक- आस्था-४/११७६७/ २००५ , दिनांक- १५-१२-२००५ अन्वये पारीत केलेले आदेश व त्यातील संदर्भ क्रमांक १ ते ३ चे प्रमाणित प्रत " याची माहिती मागविली होती.

त्याचबरोबर माहितीचा विषय म्हणून महानगरपालिकेतील सहायक आयुक्त कारकुन व वसूली कारकुन यांना कालबध्द पदोन्नती दिली होती व त्याप्रमाणे अपिलार्थीचे वेतन माझे वेतनश्रेणी निश्चित करतांना योग्य प्रकारे हताळणी केली नाही, असे अपिलार्थीने या माहितीच्या अर्जात उल्लेख केला आहे.

अपिलार्थीच्या सदर अर्जातील माहितीचा विषय व अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती याचा परस्पर संबंध नसल्याचे आज सुनावणीमध्ये जनअपिलीय अधिकारी यांनी सांगितले.

अपिलार्थीस प्राप्त झालेलया दिनांक- ०७-०१-२००६ च्या अर्जाची प्रत जनअपिलीय अधिकारी यांच्याकडेही दिली होती. अपिलार्थीच्या या अर्जास अनुसरुन जनअपिलीय अधिकारी यांनी जनमाहिती अधिकारी यांना दिनांक- ०९-०१-२००६

रोजी. अपिलार्थीस आवश्यक ती माहिती देण्याचे सूचीत केले तदनंतर अपिलार्थी यांनी त्यांना आवश्यक असलेली माहितीपैकी काही माहितती दिनांक- १३-०१-२००६ रोजी जनमाहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त करुन घेतली. या माहितीवर अपिलार्थीचे समाधान न झाल्यामूळे अपिलार्थीने दिनांक- १७-०२-२००६ रोजी जनअपिलीय अधिकारी यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम (१) च्या तरतूदी अन्वये प्रथम अपिल केले. अपिलार्थीच्या प्रथम अपिलाची प्रत पहाता अपिलार्थीने या प्रकरणी वेगवेगळया वेळी नांदेड वाघळा शहर महानगरपालिका नांदेड यांच्या आस्थापना विषयक प्रश्नासंदर्भात वेळोवेळी अर्ज / अपिले दाखल केल्याचे दिसून येते.

या अपिलामध्ये अपिलार्थी यांनी जनमाहिती अधिकारी यांच्याकडे केलेल्या दिनांक- ०७-०१-२००६ रोजीच्या अर्जाचा कोणताही उल्लेख नाही. तथापि अपिलार्थीने त्यांच्या दिनांक- ०७-०१-२००६ रोजी दिलेल्या अर्जातील माहिती व या अपिलाव्दारे मागणी केलेली माहिती ही एकाच स्वरुपाची असल्याचे दिसून येते.

अपिलार्थीच्या या अपिलावर जनअपिलीय अधिकारी यांनी दिनांक- २७-०२-२००६ रोजी सुनावणी घेतली. या सुनावणीमध्ये अपिलार्थीस जी माहिती अद्यापही देणे शक्य आहे ती माहिती, जनमाहिती अधिकारी यांनी तात्काळ पुरवावी, असे जनमाहिती अधिकारी यांना सूचीत केले व अपिलार्थीचे अपिल निकाली काढले.

या अपिलावरील निर्णया नंतर दिनांक- १३-०४-२००६ रोजी जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ही माहिती देण्यापोटी येणारा खर्च म्हणून आवश्यक ते शुल्क भरण्या बाबत कळविले.  या पत्रामध्ये एकूण दोन बाबी निदर्शनास येतात. पहिली बाब म्हणजे अपिलार्थीस, जनअपिलीय अधिकारी यांनी निर्णय देवूनही सुमारे दीड महिना इतक्या विलंबाने  दोन ओळीचे अर्धवट पत्र लिहीणे व दूसरी म्हणजे, या

पत्रामध्ये अपिलार्थी यांनी नक्की कोठे फी भरावी, ती किती भरावी, कोणत्या शिर्षाखाली भरावी इत्यादी माहितीचा अभाव असणे. या पत्राचे अवलोकन केले असता, जनमाहिती अधिका-यास अपिलार्थीस माहिती देण्याची खरोखरच इच्छा होती काय, याबद्दल प्रश्न पडतो. अपिलार्थीस दिलेल्या या दिनांक- १३-०४-२००६ रोजीच्या पत्रातील मजकूर पहाता, जनमाहिती अधिकारी हे अपिलार्थीस माहिती देण्याकरिता जाणूनबुजून टाळाटाळ करीत असल्याचे सिध्द होते.

जनअपिलीय अधिकारी / जनमाहिती अधिकारी यांच्याकडील वरील पत्रास अपिलार्थीने कोणताही प्रतिसाद दिला नसल्याचे जनमाहिती अधिकारी यांनी आज सुनावणीमध्ये सांगितले.

शेवटी या प्रकरणी व्यथीत होवून अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दिनांक- १५-०४-२००६ रोजी व्दितीय अपिल केले. या अपिलामध्ये देखील अपिलार्थीने मूळमाहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आज झालेल्या युक्तीवादामध्ये या प्रकरणाची प्रार्श्वभूमी समजावून घेतली असता, अपिलार्थी हे नांदेड वाघळा शहर महानगरपालिका नांदेड चे सेवानिवृत्त कर्मचारी असून ते नियत वयोमानानूसार सेवानिवृत्त झाल्यानंतर त्यांच्यावर अनियमीतपणे व एकतर्फी विभागीय चौकशीची कारवाई करण्यात आल्याचे अपिलार्थी यांनी आयोगासमोर सांगितले. त्याचबरोबर अपिलार्थीस त्यांचे म्हणणे मांडण्याची कोणतीही संधी न देता त्यांच्या दरमहाच्या सेवानिवृत्ती वेतनामधून १००/- रुपये इतकी कपात करण्याचे आदेश उपायुक्त नांदेड वाघळा शहर महानगरपालिका नांदेड यांनी दिले आहेत. अपिलार्थीस माहिती मिळू नये म्हणून प्रशासनातील काही अधिकारी / कर्मचारी यांनी अपिलार्थीच्या माहिती मिळविण्याच्या या प्रक्रियेमध्ये

अडथळे आणले, असेही अपिलार्थीने आपले म्हणणे आयोगासमोर मांडले. अपिलार्थीस, नांदेड वाघळा शहर महानगरपालिका नांदेड यांच्या स्तरावर दिलेला प्रतिसाद पहाता, अपिलार्थी यांच्या म्हणण्यात तथ्यांश दिसतो. अपिलार्थीने आयोगासमोर सादर केलेल्या त्यांच्या या तक्रारीमध्ये आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड यांनी वेळीच लक्ष घालण्याची आयोगाची आयुक्तांना शिफारस आहे.

आज झालेल्या युक्तीवादामध्ये जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस आता आवश्यक असलेली उर्वरीत माहिती अपिलार्थीस एका दिवसाच्या आत देण्याचे जनमाहिती अधिकारी यांनी कबुल केले आहे. अपिलार्थीस जनमाहिती अधिकारी यांनी देवू केलेली माहिती पहाता, त्यातील काही पृष्ठे वाचता न येण्याजोगी अशी आहेत. तेंव्हा असे आदेशीत करण्यात येते की, जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांनी मूळअर्जात मागणी केलेली जी माहिती अद्याप द्यावयाची आहे, ती संपूर्णपणे, स्पष्ट स्वरुपात व अपिलार्थीस वाचता येईल, अशा टाईपमध्ये हे आदेश निर्गमीत झाल्यापासून एक दिवसाच्या आत, सदर प्रती स्वाक्षांकित करुन, विनामुल्य पुरवावी.

त्याचबरोबर असेही आदेशीत करण्यात येते की, ज्या माहिती अधिका-याने / कर्मचा-यांनी अपिलार्थीस त्यास आवश्यक असलेली माहिती देण्यास विलंब लावलेला आहे, त्या सर्व अधिकारी / कर्मचा-यांवर आयुक्त, नांदेड वाघळा शहर महानगरपालिका नांदेड, यांनी महाराष्ट्र नागरी सेवा ( शिस्त व अपिल ) नियम १९७९ अन्वये योग्यती प्रशासकीय कार्यवाही करुन आपला अनुपालन अहवाल आयोगास हे आदेश निर्गमीत झाल्यापासून दोन महिन्याच्या आत सादर करावा. वरील प्रार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपिल अंशतः मान्य करण्यात येत आहे. सबब खालील प्रमाणे  निर्णय पारीत करण्यात येत आहे.

## निर्णय

५. अपिल अंशतः मान्य करण्यात येत आहे.

६. जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मूळअर्जात मागणी केलेली जी माहिती अद्याप द्यावयाची आहे, ती संपूर्णपणे, स्पष्ट स्वरुपात व अपिलार्थीस वाचता येईल, अशा टाईपमध्ये व प्रती स्वाक्षांकित करुन हे आदेश निर्गमीत झाल्यापासून एक दिवसाच्या आत विनामुल्य माहिती पुरवावी.

७. ज्या माहिती अधिका-याने / कर्मचा-यांनी अपिलार्थीस त्यास आवश्यक असलेली माहिती देण्यास विलंब लावलेला आहे, त्या सर्व अधिकारी / कर्मचा-यांवर आयुक्त, नांदेड वाघळा शहर महानगरपालिका नांदेड, यांनी महाराष्ट्र नागरी सेवा ( शिस्त व अपिल ) नियम १९७९ अन्वये योग्यती प्रशासकीय कार्यवाही करुन आपला अनुपालन अहवाल आयोगास हे आदेश निर्गमीत झाल्यापासून दोन महिन्याच्या आत सादर करावा.

औरंगाबाद **(वि. बा. बोरगे)**

दिनांक- २० जून, २००७. **राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद**

प्रति,

१ श्री.बत्तिन सायन्ना गंगाराम गौड, सेवानिवृत्त जकात अधिक्षक तथा करअधिक्षक, नांदेड वाघाहा महानगरपालिका, नांदेड व्दारा/- राहणार घर क्रमांक- ३-२-२५२, गंगाधाम, गवळीपूरा, नांदेड.

२ जनमाहिती अधिकारी तथा सहायक आयुक्त, नांदेड वाघळा शहर महानगर पालिका, नांदेड, यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

३ जनअपिलीय अधिकारी तथा, उप आयुक्त, नांदेड वाघळा शहर महानगर पालिका, नांदेड, यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

४ आयूक्त,नांदेड वाघाळा महानगरपालिका नांदेड यांना योग्य त्या प्रशासकीय कार्यवाहीस्तव देण्यात येते.

५ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला, नविन प्रशासकीय

इमारत मंत्रालया समोर, मुंबई- ३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यासाठी.

६ निर्णय नस्ती.

<table>
<tr><td colspan="4">राज्य माहीती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधिल कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.</td></tr>
<tr><td></td><td></td><td colspan="2">अपील क्रमांक - २००७/२७१/ रामाआ/औ.बाद</td></tr>
<tr><td></td><td></td><td colspan="2">निर्णय दिनांक २१ जुन २००७</td></tr>
<tr><td>१.</td><td>प्रदिप मधुकरराव सराफ,<br>परिमल शाळे जवळ,<br>विवेकानंदपूरम, लातूर.<br><br><u>विरुध्द</u></td><td>:-</td><td>अपिलार्थी</td></tr>
<tr><td>१</td><td>जनमाहीती अधिकारी तथा<br>मुख्याध्यापक,<br>संस्कार वर्धिनी माध्यमिक विद्यालय,<br>लातूर.</td><td>:-</td><td>प्रतिवादी</td></tr>
<tr><td>२</td><td>जनअपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणधिकारी (मा), जिल्हा परिषद,<br>ता.जि.लातूर.</td><td>:-</td><td></td></tr>
<tr><td></td><td colspan="3">विवेचन</td></tr>
<tr><td></td><td colspan="3">वरील प्रकरणाची सुनावणी दिनांक २१ जून २००७ रोजी लातूर येथे घेण्यांत आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी,श्री. प्रदिप मधुकरराव सराफ ( येथून</td></tr>
</table>

| | |
|---|---|
| | पुढे अपिलार्थी असे संबोधण्यांत येईल.) हे हजर आहेत जनमाहीती अधिकारी तथा मुख्याध्यापक,संस्कार वर्धिनी माध्यमिक विद्यालय, लातूर ( येथून पुढे जनमाहिती अधिकारी, असे संबोधण्यात येईल) हे गैरहजर आहेत. जनअपिलीय अधिकारी, तथा शिक्षणधिकारी (मा), जिल्हा परिषद,ता.जि.लातूर श्री.जे. डी. साळुंखे ( येथून पुढे जनअपिलिय अधिकारी, असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत. |
| | या प्रकरणी सर्व प्रथम अपिलार्थी यांनी त्यांच्याकडील अर्ज दिनांक १०-०२-२००६ अन्वये जनमाहिती अधिकारी यांच्याकडे संस्कार वर्धिनी माध्यमिक विद्यालय, लातूर यांच्याकडील शिक्षक हजेरीपत्रकाचे संदर्भात काही माहिती मागविली होती. सदर माहिती १९९७ ते २००१ या कालावधीमधील आहे. अपिलार्थीने या कालावधीतील शिक्षक हजेरीपत्रकाच्या सत्यप्रतीची मागणी या माहितीच्या अर्जाव्दारे जनमाहिती अधिकारी यांच्याकडे केली होती. |
| | अपिलार्थीच्या या अर्जास अनुसरुन जनमाहिती अधिकारी यांनी माहिती पुरविल्याचे आयोगास सांगितले. तथापि ही माहिती अपिलार्थीस नक्की कोणत्या तारखेस पाठविली, याचा जनमाहिती अधिकारी खुलासा करु शकले नाहीत. जनमाहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या कथीत माहितीने अपिलार्थीचे समाधान न झाल्याने अपिलार्थी यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीस अनुसरुन अपिलार्थीने जनअपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक- १७-०३-२००६ रोजी प्रथम अपिल केले. सदर अपिलाचे कारण म्हणजे जनमाहिती अधिकारी यांनी दिलेली माहिती ही खोटी, खाडाखोड व |

| | |
|---|---|
| | बनावट असलेली दिली. असे दर्शविले आहे. |
| | सदर अपिलावर कोणत्याही प्रकारे सुनावणी न घेता जनअपिलीय अधिकारी यांनी, मुख्याध्यापकाने शाळेत असलेल्या अभिलेखाच्या सत्यप्रती दिल्या असल्यामूळे आपले अपिल निकाली काढले असल्याचे अपिलार्थीस दिनांक- १७-०३-२००६ रोजी त्यांच्या कार्यालयाकडून पत्र क्रमांक ४५/ ०६ ने कळविले. या निर्णयामूळे व्यथीत होवून अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक- १२-०५-२००६ रोजी व्दितीय अपिल दाखल केले आहे. या अपिलामध्ये अपिलार्थी यांनी त्यांना मिळालेली माहिती अपूर्ण व खोटी असल्याचे नमूद केले असून त्यात काही माहितीतील त्रुटी खालील प्रमाणे निर्देशित केल्या आहेत.<br><br>संपूर्ण १२ महिन्याचीं माहिती देण्या ऐवजी प्रत्येक वर्षाच्या जून आणि मार्च या महिन्याची माहिती देण्यात आली, शासकीय हजरीपत्रकातील श्री.अनिल दरेकर यांच्या हुद्याची खोटी माहिती देण्यात आली. श्री.अजीत गायकवाड,पी.एम.सराफ, अनिल दरेकर, सौ. रत्नमाला कोथळीकर व सौ. सुर्यसरगंगा केंद्रे या शिक्षकांच्या / कर्मचा-यांचे ते कार्यरत असलेल्या दिनांकामध्ये ते दिनांक खोटे दाखविले आहेत, असे अपिलार्थीचे म्हणणे आहे. |
| | दोन्हीहि बाजूचा युक्तीवाद ऐकला असता व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेलया कागदपत्राची पहाणी करता असे आदेशित करण्यात येते की, शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांनी अपिलार्थीस वरीलप्रमाणे उपस्थित केलेल्या |

| | | |
|---|---|---|
| | मुद्यावर त्यांनी सखोल चौकशी करुन आपला अहवाल आयोगास सादर करावा. जर अपिलार्थीने केलेल्या आरोपामध्ये तथ्य असेल तर सदर शैक्षणीक संस्थेवर त्यांनी योग्य ती प्रशासकीय कारवाई प्रस्तावीत करावी व आपला चौकशीचा अहवाल त्यांनी हे आदेश प्रस्तूत झाल्यापासून दोन महिन्याच्या आत आयोगास पाठवावा. वरील विवेंचनासह अपिलार्थीचे अपिल निकाली काढण्यात येत आहे. | |
| | निर्णय | |
| १. | अपिलार्थीचे  अपील निकाली काढण्यात येत आहे. | |
| २. | अपिलार्थीने केलेल्या तक्रार अर्जाची  शिक्षणाधिकारी (मा.) यांनी चौकशी करुन अपिलार्थीच्या अर्जामधील आरोपामध्ये तथ्य असेल तर सदर शैक्षणिक संस्थेवर शिक्षणाधिकारी (माध्यमिक)जिल्हापरिषद, लातूर यांनी योग्य ती प्रशासकीय कारवाई प्रस्तावीत करावी व आपला चौकशीचा अहवाल त्यांनी हे आदेश प्रस्तूत झाल्यापासून दोन महिन्याच्या आत आयोगास पाठवावा. | |
| | लातूर<br>दिनांक-२१ जून,२००७ | **(वि.बा.बोरगे)**<br>**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद.** |
| प्रत- | | |
| १. | श्री.प्रदिप मधुकरराव सराफ, परिमल शाळे जवळ लातूर जिल्हा- लातूर. | |
| २. | जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, संस्कार वर्धिनी माध्यमिक विद्यालय, लातूर, यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी. | |
| ३. | जनअपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हापरिषद, लातूर, यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी. (सोबत अपिलार्थीच्या तक्रारीची प्रत जोडली आहे.) | |
| ४. | सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला, नविन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई-३२ यांना सदन निर्णय शासनाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यासाठी. | |
| ५. | निर्णय नस्ती. | |

| | |
|---|---|
| | |
| | |

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

अपील क्रमांक- २००७/ ३७५/रामाआ/औ'बाद
निर्णय दिनांक २१ जून ,२००७

१. पाटील विनायक बसवंतराव .. अपिलार्थी.
मु.टाकळी (वलांडी) पो.वलांडी,
ता.देवणी, जि.लातूर

विरुध्द

१. जनमाहिती अधिकारी तथा .. प्रतिवादी
मुख्याध्यापक, राष्ट्रीय विद्यालयटाकळी (वलांडी)
ता.देवणी, जि.लातूर.

२. जनअपिलिय अधिकारी तथा ..
शिक्षणाधिकारी (मा),जिल्हा परिषद,
ता.जि.लातुर.

## विवेचन

वरील प्रकरणाची सुनावणी दिनांक- २१ जून,२००७ रोजी लातूर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, पाटील विनायक बंसतराव, (येथून पुढे

अपिलार्थी असे संबोधण्यात येईल.) हे गैरहजर आहेत. जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, राष्ट्रीय विद्यालय, टाकळी (वलांडी) तालूका- देवणी जि.लातूर, श्री.सौदागर एन.जे. ( येथून पुढे जनमाहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल ) व जनअपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (मा.) जिल्हा परिषद, ता.जि. लातूर, श्री.जे.डी.सांळुखे ( येथून पुढे जनअपिलीय अधिकारी तथा संबोधण्यात येईल ) हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम जनमाहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्याकडील दिनांक- १४-०८-२००६ रोजीच्या अर्जान्वये खालील माहितीची मागणी केली होती.

" (१) मुख्याध्यापक, राष्ट्रीय विद्यालय टाकळी (वलांडी) तालूका- देवणी, जिल्हा-लातूर या शाळेतील वर्ग ५ व ६ व ७ या वर्गाची विद्यार्थी संख्या, प्रत्येक विद्यार्थ्याची जन्मतारीख व पूर्ण पत्यासह देणेबाबत ई.स.२००४, २००५, २००६ ची माहिती मिळणे बाबत.

(२) शिक्षक हजेरी पत्रक मू.अ. च्या स्वाक्षरीने जून २००५ ते २००६ व २००६ ते २००७ या दोन शैक्षणीक वर्षाचे शिक्षक हजेरी पत्रकाची सत्यप्रती करुन मू.अ.ची स्वाक्षरी करुन देणे. "

अपिलार्थीच्या या माहितीच्या मागणीस अनुसरुन जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक- ०७-०९-२००६ रोजी माहिती पुरविली. या माहितीमध्ये त्यांनी इयत्ता पाचवी ते सातवी च्या वर्गातील विद्यार्थ्याची पटसंख्या व उपस्थिती कळविली. तथापि

अपिलार्थीने मागितलेली विद्यार्थ्यांची जन्मतारीख, पुर्ण पत्ते व शिक्षक हजेरीपत्रकाची प्रत या बरोबर अपिलार्थीस पाठविली नसल्याचे दिसून येते.

सदर माहितीने समाधान न झाल्यामुळे अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक- ११-०९-२००६ रोजी प्रथम अपिल केले. या अपिलामध्ये त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे. अपिलार्थीचे या अपील अर्जावर जनअपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी न घेता जनमाहिती अधिकारी यांना, त्यांचेकडील पत्र क्रमांक ४९६/ ०७, दिनांक- १९-०९-२००६ अन्वये, अपिलार्थीनी मागितलेली पुर्ण माहिती त्वरीत देण्या संबंधात सूचीत केले व जनमाहिती अधिका-यास पुरविलेल्या पत्राची प्रत अपिलार्थीना अग्रेषीत केली. तथापि अपिलार्थीस अर्धवट माहिती मिळाल्यामुळे व्यथीत होवून राज्य माहिती आयोगाकडे दिनांक- ०४-०२-२००६ रोजी व्दितीय अपील केले. या व्दितीय अपिलामध्ये त्यांनी आपली मूळची मागणी कायम ठेवली आहे.

आज झालेल्या युक्तीवादामध्ये जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील पत्र क्रमांक- ४७/२००७, दिनांक- ०७-०९-२००६ अन्वये माहिती पाठविल्याचे सांगितले. तथापि त्यांनी पाठविलेल्या माहितीचे अवलोकन करता, त्यांनी फक्त इयत्ता पाचवी ते सातवीच्या विद्यार्थ्याची पटावरील संख्या ही माहिती पुरविल्याचे दिसून येते. तथापि अपिलार्थीने मागितलेल्या हजरीपत्रकाच्या झेरॉक्स प्रती विद्यार्थ्याची जन्मतारीख, पूर्ण पत्ते, ही माहिती अपिलार्थीस दिली नसल्याचे दिसून येते. थोडक्यात जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अर्धवट माहिती पाठविल्याचे सिध्द होत आहे.

आयोगास सादर करण्यात आलेल्या कागदपत्रावरुन अपिलार्थी यांची या शाळा व्यवस्थापना बाबत तक्रार असून सदर संस्थेचे मुख्याध्यापक पटपडताळणीला येणा-या अधिका-यांशी संगनमत करुन विद्यार्थी नसतांना वर्ग चालविले जातात व अनेक डीएड, बीएड शिक्षकांना डोनेशनची मागणी करुन फसविले जाते व पालकांची, विद्यार्थ्याची, शिक्षण खात्याची व शासनाची दिशाभूल केली जाते. अशा अर्थाचा अर्ज शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हापरिषद, लातूर यांच्याकडे अपिलार्थीने दिल्याचे दिसून येते.

अपिलार्थीने मागितलेली माहिती मुद्दाम अर्धवट देणे, व अपिलार्थी यांच्या या शाळेच्या कारभारा विषयी गंभीर तक्रारी असणे व  सकृतदर्शनी त्यात तथ्यांश आढळणे, हे पहाता, शिक्षण उपसंचालक, लातूर यांना आदेशित करण्यात येते की अपिलार्थीने शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हापरिषद, लातूर यांच्याकडे केलेल्या तक्रार अर्जाची (प्रती सोबत जोडल्या आहेत.) सखोल चौकशी करुन अपिलार्थीच्या तक्रार अर्जामध्ये तथ्य आढळल्यास संबंधित शिक्षण संस्थेवर माध्यमिक शाळा संहिते प्रमाणे योग्यती कार्यवाही करावी व त्याचबरोबर जनमाहिती अधिकारी यांना असेही आदेश त करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीने मागितलेली संपूर्ण माहिती हे आदेश निर्गम त झाल्यापासून अपिलार्थीस सात दिवसाच्या आत विनामुल्य द्यावी. सदर जनमाहिती अधिकारी हे अपिलार्थीस विहित म दतीत माहिती देतील याची खात्री शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हापरिषद, लातूर यांनी करावी.

वरील प्रकरणामध्ये जनमाहिती अधिकारी यांच्या या प्रकरणीच्या भुमीकेमध्ये संशय घेण्यास भरपूर वाव असल्यामूळे असे आदेशित करण्यात येते की, त्यांच्यावर

सदर शिक्षण संस्थेने यथा योग्य प्रशासकीय कार्यवाही करावी. सदर जनमाहिती अधिकारी यांच्यावर ही प्रशासकीय कार्यवाही केली आहे, याची खात्री करुन घेवून, त्यांचा अनुपालन अहवाल हे आदेश निर्गमीत झाल्यापासून दोन महिन्याच्या आत शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांनी आयोगास पाठवावा. सबब खालील प्रमाणे निर्णय पारीत करण्यात येत आहे.

## निर्णय

८. अपिलार्थीचे अपिल अंशतः मान्य करण्यात येते.

९. अपिलार्थीने मागितलेली संपूर्ण माहिती हे आदेश निर्गमीत झाल्यापासून अपिलार्थीस सात दिवसाच्या आत विनामूल्य द्यावी. सदर जनमाहिती अधिकारी हे अपिलार्थीस विहीत मुदतीत माहिती देतील याची खात्री शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, लातूर यांनी करावी.

१०. जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अर्धवट माहिती पुरवून त्यांच्यातील कर्तव्य परायणतेचा अभाव सिध्द केला असल्यामूळे त्यांच्यावर सदर शिक्षण संस्थेने प्रचलीत सेवा नियमानूसार यथायोग्य प्रशासकीय कारवाई करावी. सदर जनमाहिती अधिकारी यांच्यावर ही प्रशासकीय कारवाई केल्याची खात्री करुन घेवून, त्यांचा अनुपालन अहवाल हे आदेश निर्गमीत झाल्यापासून दोन महिन्याच्या आत शिक्षणाधिकारी (मा.) यांनी आयोगास पाठवावा.

११. अपिलार्थीने शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हापरिषद, लातूर यांच्याकडे केलेल्या तक्रार अर्जाची (प्रती सोबत जोडल्या आहेत.) सखोल चौकशी करुन अपिलार्थीच्या तक्रार अर्जामध्ये तथ्य आढळल्यास संबंधित शिक्षण संस्थेवर माध्यमिक शाळा संहितेप्रमाणे योग्य ती कारवाई करावी.

लातूर **(वि. बा. बोरगे)**

दिनांक-२१ जून, २००७. **राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद**

प्रति,

१ श्री.पाटील विनायक बंसतराव मु.टाकळी, पो.वलांडी, तालूका- देवणी, जि.लातूर

२ जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक,राष्ट्रीय विद्यालय,टाकळी (वलांडी)तालूका- देवणी, जिल्हा लातूर, यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

३ जनअपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक)जिल्हापरिषद,लातूर , यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

४ शिक्षण उपसंचालक, लातूर, यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

५ शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हापरिषद, लातूर यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

६ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला, नविन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई- ३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यासाठी.

७ निर्णय नस्ती.

## राज्य माहीती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधिल कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

**अपील क्रमांक - २००७/३७७/**
**रामाआ/औ.बाद**
**निर्णय दिनांक २१ जुन २००७**

१. श्री.नागनाथ ग्यानबा जाधव, :- **अपिलार्थी**
नायब तहसीलदार (निवडणूक)
राहणार औसा, जिल्हा-लातूर.

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २ | जनमाहीती अधिकारी तथा<br>नायब तहसीलदार (महसूल)<br>अहमदपूर, जिल्हा- लातूर. | :- | **प्रतिवादी** |
| ३ | जनअपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, अहमदपूर<br>जिल्हा- लातूर. | :- | |

**विवेचन**

वरील प्रकरणाची सुनावणी दिनांक २१ जून २००७ रोजी लातूर येथे घेण्यांत आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी,श्री. नागनाथ ग्यानबा जाधव ( येथून पुढे अपिलार्थी असे संबोधण्यांत येईल.),जनमाहीती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल) अहमदपूर,श्रीमती बी.एस.माने ( येथून पुढे जनमाहिती अधिकारी, असे संबोधण्यात येईल) व जनअपिलीय अधिकारी, तथा तहसीलदार,अहमदपूर, श्री.बी.एम.देशमूख, ( येथून पुढे जनअपिलिय अधिकारी, असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थी यांनी त्यांचे कडील माहितीचा अर्ज दिनांक- १७-०८-२००६ रोजीच्या अर्जान्वये जनमाहिती अधिकारी यांचेकडे त्यांची जुलै १९९९ ते डिसेंबर, १९९९ च्या मासिक दैनंदिनीची प्रत, सबमेशनची प्रत , टी.ए.बीलाची प्रत, जनमाहिती अधिकारी यांचेकडून मागितली आहे.

सदर माहिती अपिलार्थीने टपाव्दारे अपेक्षिली आहे.

अपिलार्थीच्या या माहितीच्या अर्जावर जनमाहिती अधिकारी यांनी माहिती त्यांचेकडील पत्र क्रमांक ७२१, दिनांक- ०७-०९-२००६ अन्वये अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची प्रत त्यांच्या कार्यालयात दिसून येत नाही व अपिलार्थीने नमूद केलेल्या कालावधीचे अभिलेखे त्यांच्या कार्यालयात उपलब्ध नसल्याबद्दल त्यांना कळविले. या उत्तरावर अपिलार्थी यांचे समाधान न झाल्यामूळे अपिलार्थी यांनी दिनांक- २७-०९-२००६ रोजी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतूदी अन्वये जनअपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपिल केले. सदर अपिलामध्ये अपिलार्थीने, त्यांनी मागणी केलेली कागदपत्रे तहसीलदार, अहमदपूर यांच्याकडे असल्याचे सिध्द करण्याचा प्रयत्न केला आहे व त्याचबरोबर आपल्या माहितीची मूळ मागणी कायम ठेवली आहे. सदर अपिलाची अंतीम सुनावणी जनअपिलीय अधिकारी यांनी दिनांक- २०-१०-२००६ रोजी घेवून अपिलार्थी यांचे अपील नामंजूर केले. जनअपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीचे हे अपिल नामंजूर करतांना अपिलार्थीने मागीतलेली माहिती त्यांच्या कार्यालयात त्यावेळी उपलब्ध नव्हती. म्हणजेच एका मुद्यावरुन केले. अपिलार्थीस त्यावेळी आवश्यक असलेली माहिती प्राप्त करुन देण्याकरिता या अपिल निर्णयामध्ये कोणत्याही सूचना नाहीत. तथापि अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेली माहिती देण्याकरिता जनमाहिती अधिकारी यांनी लेखा विभाग, अभिलेख विभाग, आस्थापना विभाग व पुरवठा विभाग या सर्व विभागांना पत्रे लिहून ही माहिती प्राप्त करुन घेण्याचा प्रयत्न करण्यात आला असल्याचे जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले व या सर्व विभागानी त्यांच्याकडे माहिती उपलब्ध नाही, असे जनमाहिती अधिकारी यांना कळविल्यावरुन जनमाहिती अधिकारी हे अंतिमः ही माहिती

अपिलार्थीस ही माहिती देवू शकले नाहीत.

वरीलप्रमाणे प्रयत्न करुन अपिलार्थीस माहिती न मिळाल्यामूळे व्यथीत होवून अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक- ०५-१२-२००६ रोजी व्दितीय अपिल केले आहे. या अपिलामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आज झालेल्या युक्तीवादामध्ये या प्रकरणाची पार्श्वभूमी समजावून घेतली असता, असे दिसून आले की, अपिलार्थी हे स्वतः सध्या औसा येथे नायब तहसीलदार या पदावर कार्यरत आहे. जुलै ते डिसेंबर, १९९९ मध्ये त्यांची नेमणूक अहमदपूर तहसीलदार कार्यालयात नायब तहसीलदार (पुरवठा) म्हणून झाली. या पदावर कार्यरत असतांना दिनांक- २५ जून, १९९९ रोजी ते जळकोट येथे प्रतिनियुक्तीवर रुजू झाले. डिसेंबर, १९९९ पर्यंत अपिलार्थी हे जळकोट येथे नायब तहसीलदार या पदावर कार्यरत होते. या कालावधीतील आपली प्रवासदैनंदिनी व प्रवासभत्ता बील जिल्हा पुरवठा अधिकारी, लातूर यांचेकडे तहसीलदार, अहमदपूर यांचे मार्फत सादर केले होते.

या प्रकरणात आता सुमारे आठ वर्षाचा कालावधी व्यपगत झाला असल्याने अपिलार्थीची प्रवास दैनंदिनी जिल्हा पुरवठा अधिकारी यांचेकडे उपलब्ध असल्याचे दिसून येत नाही. किंबहूना ती त्यांच्या कार्यालयाकडून गहाळ झाली, हे म्हणणे संयुक्तीक ठरेल. अपिलार्थीस हव्या असलेल्या प्रवासभत्याच्या बीलाच्या संदर्भात या

बीलाची प्रत  जिल्हा पुरवठा अधिकारी, लातूर यांचेकडे उपलब्ध असून त्यांनी ती अपिलार्थीस दिनांक- ०५-०९-२००६ रोजी पुरविली असून अपिलार्थीस या बीलावर आधारीत त्यांची दैनंदिनीची प्रत तयार करण्याविषयी सूचीत केले आहे. जिल्हा पुरवठा अधिकारी यांच्या या सूचनेस अनुसरुन अपिलार्थी यांनी त्यांची प्रवासदैंनदिनी तयार करुन दिनांक- २३-०३-२००७ रोजी जिल्हा पुरवठा अधिकारी यांच्याकडे सादर केले आहे. तथापि आजमितीसही  त्यांचे जिल्हा पुरवठा अधिकारी यांचेकडे बील मंजूर झाले नसल्याचे त्यांनी आयोगासमोर स्पष्ट केले.

दोन्हीहि पक्षाचा युक्तीवाद ऐकला असता, अपिलार्थीस आता महसूल विभागाच्या अधिका-याकडून त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती मिळाली असल्याचे दिसून येते. या माहितीच्या आधारे व जिल्हा पुरवठा अधिकारी यांच्या सूचने प्रमाणे अपिलार्थी यांचे प्रवासभत्ता बील जिल्हा पुरवठा अधिकारी यांनी दिनांक- २३ मार्च, २००७ रोजी सादर केले. तथापि ते अद्यापही मंजूर झाले नाही, ही अपिलार्थी यांची खंत आहे.

अपिलार्थीस आता माहिती उपलब्ध झाली असल्यामूळे अपिलार्थीचे अपिल निकाली काढण्यात आले आहे व त्याचबरोबर अपिलार्थीस जिल्हा पुरवठा अधिकारी यांच्याकडे सादर केलेल्या दिनांक- २३-०३-२००७ चे प्रवासभत्ता बील जिल्हा पुरवठा अधिकारी यांनी, अपिलार्थीस, सर्व प्रकारच्या आवश्यक त्या मंजू-या घेवून हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ४५ दिवसाच्या आत मंजूर करुन  या प्रवासभत्याच्या बीलाची रक्कम अपिलार्थी यांना मिळेल या दृष्टीने कार्यवाही करावी व आयोगास तद्नंतर पंधरा दिवसाच्या आत आपला अनुपालन अहवाल सादर

करावा, असेही पुढे आदेशित करण्यात येत आहे. सबब खालीलप्रमाणे निर्णय पारीत करण्यात येत आहे.

## निर्णय

१. अपिलार्थीचे अपिल निकाली काढण्यात येत आहे.

२. अपिलार्थीस जिल्हा पुरवठा अधिकारी यांच्याकडे सादर केलेल्या दिनांक- २३-०३-२००७ चे प्रवासभत्ता बील जिल्हा पुरवठा अधिकारी यांनी अपिलार्थीस, सर्व प्रकारच्या आवश्यक त्या मंजू-या घेवून हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ४५ दिवसाच्या आत मंजूर करुन या प्रवासभत्याच्या बीलाची रक्कम अपिलार्थी यांना मिळेल या दृष्टीने कार्यवाही करावी व आयोगास तद्नंतर पंधरा दिवसाच्या आत आपला अनुपालन अहवाल सादर करावा,

लातूर, ( वि.बा.बोरगे)
दिनांक- २१ जून, २००७ राज्य माहिती आयुक्त,औरंगाबाद.

प्रत-
१. श्री.नागनाथ ग्यानबा जाधव, नायब तहसीलदार (निवडणूक) रा.औसा, जि.लातूर.
२. जनमाहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल)अहमदपूर,ता.अहमदपूर जिल्हा-लातूर, यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.
३. जनअपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, अहमदपूर, यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.
४. जिल्हा पुरवठा अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, लातूर, यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.
५. सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला, नविन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई-३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यासाठी.
५. निर्णय नस्ती.

**राज्य माहीती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधिल कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक - २००७/३७८/**
**रामाआ/औ.बाद**
**निर्णय दिनांक २१ जुन २००७**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.राघोबा निवृत्तीराव माने,<br>झिंगनप्पा गल्ली, अग्रसेनभवनजवळ<br>लातूर, तालूका- लातूर<br>जिल्हा- लातूर. | :- | **अपिलार्थी** |
| | **विरुध्द** | | |
| २ | जनमाहीती अधिकारी तथा<br>आगार व्यवस्थापक (क) रा.प.<br>उदगीर आगार, तालूका- उदगीर<br>जिल्हा- लातूर. | :- | **प्रतिवादी** |
| ३ | जनअपिलीय अधिकारी तथा<br>विभाग नियंत्रक राज्य परिवहन<br>विभाग, लातूर. | :- | |

**विवेचन**

वरील प्रकरणाची सुनावणी दिनांक २१ जून २००७ रोजी लातूर येथे घेण्यांत आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी,श्री. राघोबा निवृत्तीराव माने ( येथून पुढे अपिलार्थी असे संबोधण्यांत येईल.),जनमाहीती अधिकारी तथा आगार प्रमूख

राज्य परिवहन आगार, उदगीर, श्री.डी.डी.जाधव, ( येथून पुढे जनमाहिती अधिकारी, असे संबोधण्यात येईल) व जनअपिलीय अधिकारी, तथा विभाग नियंत्रक राज्य परिवहन विभाग, लातूर, श्री.आर.के.जाधव, ( येथून पुढे जनअपिलिय अधिकारी, असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थी यांनी सर्व प्रथम जनमाहिती अधिकारी यांच्याकडे महाराष्ट्रराज्य परिवहन मंडळातील लातूर विभागातील उदगीर बस आगारातील वाहक श्री.एस.पी.क्रजेवाड, वाहक, उदगीर यांनी वरिष्ठास मारहाण केल्यामूळे त्वरीत निलंबीत करण्यासाठीचे पत्र विभागीय आगार कार्यालय, लातूर येथून दिनांक- ०१-०७-२००६ रोजी पाठविले असतांना देखील त्यांना त्वरीत निलंबीत करण्याऐवजी पुढे सलग २२ दिवस का कामावर ठेवण्यात आले. या खुलाशाची प्रत व निलंबनाची प्रत, अशी माहिती मागविली होती.

सदर माहिती अपिलार्थीने व्यक्तीशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या माहितीच्या अर्जावर जनमाहिती अधिकारी यांनी माहिती तयार करुन अपिलार्थीस देण्याकरिता दिनांक- २४-०७-२००६ रोजी तयार करुन ठेवली होती. तथापि अपिलार्थी हे जनमाहिती अधिकारी यांचेकडे व्यक्तीशः उपस्थित न झाल्यामूळे अपिलार्थीस ही माहिती ते देवू शकले नाहीत, असे त्यांचे म्हणणे आहे. अपिलार्थीस विहीत मुदतीत माहिती न मिळाल्यामूळे अपिलार्थीने दिनांक- १२-०८-२००६ रोजी जनअपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले.

या अपिलावर अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी

घेतल्याचे आयोगास उपलब्ध करुन दिलेल्या पत्रावरुन दिसून येत नाही. तथापि त्यांनी अपिलार्थीस त्याने वरील अर्जाव्दारे मागितलेली माहिती तयार असून ती त्यांनी उदगीर येथे हजर राहून घेण्याचे अपिलार्थीस तोंडी सूचीत केले असल्याचे ते आज सुनावणीमध्ये सांगत आहे. जनअपिलीय अधिकारी यांच्या या विधानास अपिलार्थी यांनी आज सुनावणीमध्ये अपिलार्थी यांनी पृष्ठी दिली आहे.

तद्‌नंतर अपिलार्थी यांनी त्यांना आवश्यक असलेली माहिती मिळविण्याच्या संदर्भात उदगीर येथे हजर  न राहता राज्य माहिती आयोगाकडे दिनांक- १७-११-२००६ रोजी व्दितीय अपिल  केले आहे.

आज झालेल्या युक्तीवादामध्ये जनमाहिती अधिकारी व जनअपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस सदर माहिती दिनांक- १९-०६-२००७ रोजी दिल्याच्या पृष्ठयर्थ अपिलार्थी यांचे एक पत्र सादर केले आहे. अपिलार्थी यांनी आजच्या सुनावणीमध्ये दिनांक- १९-०६-२००७ रोजी अपेक्षीत असलेली माहिती मिळाल्याचे कबूल केले आहे.

अपिलार्थी यांनी या प्रकरणामध्ये माहितीची व्यक्तिशः अपेक्षा करणे व अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती जनमाहिती अधिकारी व जनअपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस देण्या संदर्भात कोणतीही सकारात्मक कार्यवाही न करणे, अपिलीय अधिका-याने सुनावणी न घेता अपिलार्थीस तोंडी सूचना देणे, या सर्व बाबी माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या अंमलबजावणीस पूरक नाहीत, असे आयोगाचे मत आहे. या प्रकरणी जनमाहिती अधिकारी यांनी माहिती तयार

झाल्यावर लागलीच अपिलार्थीस त्याप्रमाणे कळवून ही माहिती त्यांच्या कार्यालयाकडून लेखीपत्र पाठवयास हवे होते. तथापि त्यांनी अशी कृती केली नाही. त्याचबरोबर अपिलार्थीने देखील त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त करुन घेण्याकरिता जनमाहिती अधिकारी यांच्याकडे काही प्रयत्न केल्याचे उपलब्ध कागदपत्रावरुन दिसून येत नाही.

अपिलार्थी हे एस.टी.कामगार युनीयनचे अध्यक्ष आहेत. त्यांची जनमाहिती अधिकारी व जनअपिलीय अधिकारी यांची सर्वसाधारण परिस्थीतीत, एक वर्षभर भेट झाली नाही, यावर विश्वास ठेवणे अवघड आहे. तेंव्हा या पुढे माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वये जे माहितीचे अर्ज जनमाहिती अधिकारी यांच्याकडे दाखल होतील, त्या अर्जावर जनमाहिती अधिकारी यांनी अर्जदारांना माहिती उपलब्ध करुन देण्यांच्या दृष्टीने त्वरीत कार्यवाही करावी व त्याचबरोबर त्यांनी मागितलेली माहिती विहित मुदतीत कशी पुरविण्यात येईल याकडे विशेष लक्ष द्यावे, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. वरील विवेंचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येत आहे. सबब खालीलप्रमाणे निर्णय पारीत करण्यात येत आहे.

## **निर्णय**

१. अपिलार्थीचे अपिल निकाली काढण्यात येत आहे.

लातूर, ( वि.बा.बोरगे)
दिनांक- २१ जून, २००७ राज्य माहिती आयुक्त,औरंगाबाद.

प्रत-

१. श्री.राघोबा निवृतीराव माने, झिंगनप्पा गल्ली, अग्रसेन भवन जवळ, लातूर,

२. जनमाहिती अधिकारी तथा आगार प्रमुख, राज्य परिवहन आगार, उदगीर, जिल्हा-लातूर, यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

३. जनअपिलीय अधिकारी तथा विभाग नियंत्रक, राज्य परिवहन विभाग, लातूर, यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

४. सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला, नविन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई-३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यासाठी.

५. निर्णय नस्ती.

**क्षराज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

अपील क्रमांक- २००७/२७४/रामाआ/औ'बाद
निर्णय दिनांक २२ जून, २००७.

१. श्री.सय्यद अकबरुल्ला बाबामिया .. अपिलार्थी.
व्दारा/- काझीसर, गणेश किराणा प्रोव्हीजनल, एन.डी.१२०, इंदिरागांधी कॉलेज समोर सिडको-१२०, नविन नांदेडजिल्हा- नांदेड.

विरुध्द

१. जनमाहिती अधिकारी तथा .. प्रतिवादी
मुख्याध्यापीका,
शहाना उर्दू प्राथमिक शाळा, औसा,
तालूका- औसा, जिल्हा लातूर.

२. जनअपिलिय अधिकारी तथा ..
शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
जिल्हापरिषद, लातूर.

३. सचिव, ..
कादरीया एज्युकेशन वेलफेअर
सोसायटी,औसा,जिल्हा-लातूर.

## विवेचन

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक- २२ जून,२००७ रोजी लातूर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, श्री.सय्यद अकबरुल्ला बाबामिया (येथून पुढे अपिलार्थी असे संबोधण्यात येईल.) हे गैरहजर आहेत. तर जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका, शहाना ऊर्दू प्राथमिक शाळा, औसा, जिल्हा लातूर, श्रीमती पठाण कमरुनीसा (येथून पुढे जनमाहिती अधिकारी या संबोधण्यात येईल) हया हजर आहेत. जन अपिलिय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हापरिषद, लातूर, श्री.आर.बी.लगड ( येथून पुढे जनअपिलिय अधिकारी असे संबोधण्यात येईल ) हे गैरहजर असून त्यांचेकडील प्रतिनिधी

श्री.आर.एन.गारकल, उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक) हे हजर आहेत. शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हापरिषद लातूर यांची सुनावणीस अनुपस्थित राहण्याची आयोगाने सखेद दखल घेतली आहे.

अपिलार्थीचा दिनांक-११-०२-२००६ रोजीचा अर्ज जनमाहिती अधिकारी यांच्याकडे प्राप्त झाला नाही, असे जनमाहिती अधिकारी यांनी शपथपत्रावर आयोगासमोर कबूल केले आहे. अपिलाथी यांना जनमाहिती अधिकारी यांच्याकडून विहित मुदतीत कोणतीही माहिती प्राप्त न झाल्यामूळे अपिलार्थीने जनअपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक- ३१-०३-२००६ रोजी याच माहितीच्या संदर्भात अपील केले आहे.

जनअपिलीय अधिकारी यांनी या अपिलावर दिनांक- ०५-०५-२००६ व २४-०५-२००६ रोजी सुनावणी ठेवल्याचे आयोगास उपलब्ध करुन दिलेल्या कागदपत्रावरुन दिसून येते. तथापि या प्रकरणी प्रत्यक्ष सुनावणी ठेवून काय निर्णय झाला, याबाबत या प्रकरणी कागदपत्रे या नस्तीमध्ये उपलब्ध नाहीत.

जनमाहिती अधिकारी व जनअपिलीय अधिकारी यांच्याकडून कोणताही प्रतिसाद न मिळाल्यामूळे व्यथीत होवून अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक- ११-०७-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे. या व्दितीय अपिलामध्ये अपिलार्थीने मूळमाहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आज झालेल्या युक्तीवादामध्ये असे आढळून आले की, अपिलार्थीस त्याने दिनांक-११-०२-२००६ रोजी मागणी केलेली माहिती त्याला आजपावेतो देखील मिळाली नाही.

अपिलार्थी यांना आवश्यक असलेली माहिती पुरविण्यामध्ये शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, लातूर हे अपयशी ठरल्याचे दिसून येते.

आज सुनावणीस सदर संस्थेचे सचिव, डॉ. ए.एच.कादरी, कादरीया एज्यूकेशन ॲण्ड वेलफेअर सोसायटी, औसा, जिल्हा- लातूर, हे उपस्थित आहेत. आज रोजी त्यांच्याकडे अपिलार्थीने मागणी केल्याप्रमाणे सर्व शाळेतील कर्मचा-यांची सिव्हीललिस्ट तयार आहे, केवळ जनमाहिती अधिकारी यास अपिलार्थी यांच्याकडून केलेला अर्ज प्राप्त न झाल्यामूळे ही माहिती देणे प्रलंबित असल्याचे त्यांनी सुनावणीमध्ये सांगितले. जमाहिती अधिकारी व सदर संस्थेचे सचिव यांनी मांडलेली बाजू पहाता, असे आदेशित करण्यात येते की, जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांनी मूळमाहितीच्या अर्जामध्ये मागणी केलेली माहिती, त्यांनी हे आदेश निर्गमित झाल्यापासून सात दिवसाच्या आत , माहितीच्या सर्व प्रती स्वाक्षांकित करुन विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी व याचा अनुपालन अहवाल शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हापरिषद, लातूर यांनी आयोगास सादर करावा. शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हापरिषद, लातूर यांनी अपिलार्थीस ही माहिती विहित मुदतीत पोहचेल, असे पहावे वरील विवेंचनाच्या पार्श्वभूमीसह अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येत आहे सबब खालील प्रमाणे निर्णय पारीत करण्यात येत आहे.

## <u>निर्णय</u>

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मूळमाहितीच्या अर्जामध्ये मागणी केलेली माहिती हे आदेश निर्गमित झाल्यापासून सात दिवसाच्या आत , माहितीच्या सर्व प्रती स्वाक्षांकित करुन विनामूल्य द्यावी.

३. वरिल परिच्छेद क्रमांक-२ मधील आदेशाचा अनुपालन अहवाल शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हापरिषद, लातूर यांनी हे आदेश निर्गमित झाल्यापासून एक महिन्याचे आत आयोगास सादर करावा.

**लातूर**
दिनांक २२ जून,२००७

**(वि. बा. बोरगे)**
**राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद**

प्रति,

१ श्री.सय्यद अकबरुल्ला बाबामिया,
व्दारा/- काझीसर, गणेश किराणा प्रोव्हीजनल, एन.डी.१२०, इंदिरागांधी कॉलेज समोर सिडको-१२०, नविन नांदेडजिल्हा- नांदेड.

२ जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापीका, शहाना उर्दू प्राथमक शाळा, औसा, यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

३ जनअपिलिय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हापरिषद, लातूर यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

४ सचिव, कादरिया एज्यूकेशन ॲण्ड वेलफेअर सोसायटी, औसा, जिल्हा-लातूर यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी

५ मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर यांनी शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हापरिषद, लातूर यांना योग्य त्या कार्यवाहीस्तव देण्यात येते.

६ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला, नविन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई-३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यासाठी.

७ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

अपील क्रमांक- २००७/३१९/रामाआ/औ'बाद
निर्णय दिनांक २२ जून, २००७.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.बाबु नामदेव गबाळे,<br>राहणार- भवानी नगर,<br>तालूका- कंधार, जिल्हा- नांदेड. | .. | अपिलार्थी. |

विरुध्द

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जनमाहिती अधिकारी तथा<br>उपविभागीय अभियंता,<br>लघुपाटबंधारे (स्थानिकस्तर<br>उपविभाग, अहमदपूर<br>जिल्हा- लातूर | .. | प्रतिवादी |
| २. | जनअपिलिय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता,<br>लघुपाटबंधारे (स्थानिकस्तर) विभाग<br>लातूर. | .. | |

## विवेचन

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक- २२ जून,२००७ रोजी लातूर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्री. बाबु नामदेव गबाळे, (येथून पुढे अपिलार्थी असे संबोधण्यात येईल.) हे गैरहजर आहेत. तर जनमाहिती अधिकारी तथा

उपविभागीय अभियंता, लघूपाटबंधारे (स्थानिकस्तर) उपविभाग, अहमदपूर, श्री.एस.एम.हिपाळे, (येथून पुढे जनमाहिती अधिकारी या संबोधण्यात येईल) व जन अपिलिय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिकस्तर) विभाग, लातूर, श्री.आर.जे.कांबळे ( येथून पुढे जनअपिलिय अधिकारी असे संबोधण्यात येईल ) हे हजर आहेत.

या प्रकरणी सर्व प्रथम अपिलार्थीने त्यांच्याकडील दिनांक १६-०१-२००६ रोजीच्या अर्जान्वये जनमाहिती अधिकारी यांच्याकडे केकतसिंवगी तालूका- जळकोट येथील पाझर तलाव क्रमांक ८ ची माहिती देण्या संदर्भात अर्ज केला होता. अपिलार्थीने केलेल्या या अर्जामध्ये एकूण १४ मुद्यांवर माहिती विचारली आहे. या मुद्यामध्ये या तलावाच्या प्रशासकीय मान्यतेची प्रत, तांत्रिक मान्यतेची प्रत ज्या शेतक-याच्या जमिनी या तलावाखाली गेल्या त्या शेतक-यांच्या जमिनी संबंधातील तपशील, कामाची एकूण किंमत, कुशल व अकुशल कामाची तरतूद, शेतक-यांच्या संमतीपत्राची सत्यप्रत, काम सुरु होण्याचा दिनांक, कामावर झालेला खर्च, कुशल व अकुशल कामावर झालेला खर्च, मजूरांना दिलेल्या पेमेंट मस्टरची झेरॉक्सप्रत, कंत्राटदारा मार्फत काम करण्यात येत असल्यास गुत्तेदाराच्याकडून संबंधीत निविदा ज्या वर्तमानपत्रात जाहिर झाल्या आहेत, त्या निविदामधील अटींची माहिती, तसेच पाझर तलावाच्या नकाशाची प्रत, याचा समावेश आहे.

अपिलार्थीच्या या माहितीच्या अर्जावर जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक- २५-०१-२००६ रोजीच्या पत्रान्वये ही माहिती देण्यापोटी लागणारा खर्च म्हणून रुपये ३,६२०/- इतके शुल्क त्यांच्या कार्यालयात जमा करण्या

विषयी सूचीत केले होते. सदर पत्र अपिलार्थीस पोहचले का, असे जनमाहिती अधिकारी यांना विचारले असता त्यांनी सदर पत्र अपिलार्थीस पोंहचले असल्याचे कबुल करुन अपिलार्थीने या पत्राचा संदर्भ त्यानंतर त्यांच्या कार्यालयाकडे झालेल्या पत्रव्यवहारामध्ये उल्लेखीला आहे, असे सांगितले.

जनमाहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्यामूळे अपिलार्थीने जनअपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक- ०२-०५-२००६ रोजी प्रथम अपील करुन आपल्या माहितीची मूळ मागणी कायम ठेवली आहे.

या अपीलावर जनअपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतली नसल्याचे दिसून येते. जनअपिलीय अधिकारी यांची ही कृती चुकीची आहे. जनअपिलीय अधिकारी यांनी दोन्हीही पक्षकारांना बोलावून घेवून त्यांचे म्हणणे ऐकून घेवून त्यांचा अंतिम निर्णय सुनावणी आदेशामध्ये देणे, हे सुनावणीच्या प्रक्रियेमध्ये अभिप्रेत आहे, असे जनअपिलीय अधिकारी यांना सुनावणीच्या वेळी सांगण्यात आले.

सदर अपिलावर सुनावणी न घेतल्यामूळे अपिलार्थीने व्यथीत होवून राज्य माहिती आयोगाकडे दिनांक- २८-०६-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपिलामध्ये त्यांना नक्की काय हवे आहे, याचा बोध होत नाही. त्यांनी फक्त अपिलीय अधिका-याने सुनावणी घेतली नाही व माहिती अधिका-याने माहिती दिली नाही, असे उल्लेखित केले आहे. यावरुन अपिलार्थीने त्यांची मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे. असे अनुमान काढण्यास हरकत नाही.

आज झालेल्या सुनावणीमध्ये जनमाहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तीवाद मांडण्यात आला की, त्यांनी अपिलार्थीच्या माहिती मागणीच्या अर्जावर अपिलार्थीस विहित मुदतीत म्हणजेच अपिलार्थीचा अर्ज प्राप्त झाल्या पासून पाच दिवसाच्या आत अपिलार्थीस ही माहिती देण्यापोटी लागणारा खर्च म्हणून रुपये ३,६२०/- इतकी रक्कम भरणा त्यांच्या कार्यालयात करण्यास सांगितले. तथापि अपिलार्थीने सदर रक्कमेचा भरणा जनमाहिती अधिकारी यांच्या कार्यालयात करण्याऐवजी त्यांच्याकडील दिनांक- २८-०२-२००६ रोजीच्या पत्रान्वये त्यांना रक्कम भरण्या बाबतचे पत्र उशिरा मिळाले म्हणून ते ती रक्कम Under Protest भरण्यास तयार आहे, असे कळविले, असे कळवून ही रक्कम आजतागायत सदर रक्कम भरण्या संदर्भात अपिलार्थी यांनी कोणतीही कार्यवाही केली नाही. सदर माहती आजही जनमाहिती अधिकारी यांच्या कडे तयार आहे. अपिलार्थी यांने सदर माहिती देण्यापोटी येणा-या खर्चाची रक्कम शासकीय तिजोरीत भरल्यास ही माहिती अपिलार्थीस ताबडतोब देण्यात येईल, असेही जनमाहिती अधिकारी व जनअपिलीय अधिकारी यंनी आयोगाच्या निदर्शनास आणले आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने माहिती घेण्यासाठी आवश्यक असणारे शुल्क अद्याप पर्यंत भरले नसल्याने, अपिलार्थीस माहितीची आवश्यकता असल्यास अपिलार्थीने जनमाहिती अधिकारी यांच्या कार्यालयात आवश्यक ते शुल्क भरुन सदर माहिती हस्तगत करावी, असे अपिलार्थी यांना सूचीत करण्यात येत आहे. त्याचबरोबर अपिलार्थी यांनी जनअपिलीय अधिकारी यांच्याकडे केलेले हे अपील अपिलाची मुदत टळून गेल्यानंतर केलेले आहे. त्यामूळे हे प्रथम अपील कालबाहय ठरते. वरील

विवेंचनासह अपिलार्थीचे अपील फेटाळण्यात येत आहे. सबब खालील प्रमाणे निर्णय पारीत करण्यात येत आहे.

## निर्णय

४. अपील फेटाळण्यात येत आहे.

५. अपिलार्थीस माहितीची आवश्यकता असल्यास अपिलार्थीने जनमाहिती अधिकारी यांच्या कार्यालयात आवश्यक ते शुल्क भरुन सदर माहिती हस्तगत करावी.

**लातूर** **(वि. बा. बोरगे)**
दिनांक २२ जून,२००७ **राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद**

प्रति,

१ श्री.बाबु नामदेव गबाळे, राहणार- भवानी नगर, तालूका- कंधार, जिल्हा- नांदेड.

२ जनमाहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता,लघुपाटबंधारे (स्थानिकस्तर) उपविभाग, अहमदपूर, यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

३ जनअपिलिय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिकस्तर) विभाग,लातूर,यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

४ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला, नविन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई – ३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यासाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

अपील क्रमांक- २००७/३८२/रामाआ/औ'बाद
निर्णय दिनांक २२ जून, २००७.

१. श्री.बिरादार व्यंकटराव खंडेराव .. अपिलार्थी.
मु.पो. नागलगाव तालूका- उदगीर,
जिल्हा लातूर.

विरुध्द

१. जनमाहिती अधिकारी तथा .. प्रतिवादी
आगार व्यवस्थापक,
राज्य परिवहन, उदगीर बस आगार
राज्य परिवहन महामंडळ, उदगीर.

२. जनअपिलिय अधिकारी तथा ..
विभाग नियंत्रक,
राज्य परिवहन, लातूर.

**<u>विवेचन</u>**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक- २२ जून,२००७ रोजी लातूर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्री.बिरादार व्यंकटराव खंडेराव (येथून पुढे अपिलार्थी असे संबोधण्यात येईल.) ,जनमाहिती अधिकारी तथा आगार व्यवस्थापक, श्री.जी.डी.जाधव, (येथून पुढे जनमाहिती अधिकारी या संबोधण्यात येईल) व जन अपिलिय अधिकारी तथा विभाग नियंत्रक,राजय परिवहन, लातूर,

श्री.आर.के.जाधव, ( येथून पुढे जनअपिलिय अधिकारी असे संबोधण्यात येईल ) हे हजर आहेत.

या प्रकरणी सर्व प्रथम अपिलार्थीने त्यांच्याकडील दिनांक- ०४-०८-२००६ रोजीच्या अर्जान्वये जनमाहिती अधिकारी यांच्याकडे खालील प्रमाणे माहिती मागविली होती.

" १) चालक वाहकाचे दैनदिन डयुटी अलोकेशनच्या प्रती
( ७/४/०६ ते ११/४/०६)

२) वाहतुक नियत्रकाचे डयुटी अलोकेशनच्या प्रती
(दि. ७/४/०६ ते ११/४/०६)

३) तसेच दि. ८/४/०६ रोजी उदगीर- बोरीवली गाडीचे वाहक माने क्र. ५०६ या सदरच्या वाहकाचे मार्गपत्रकाचे दोन्ही बाजूचे झेरॉक्स प्रती पाहीजेत.

४) चालक नागपूर्णे क्र ४३४६ व चालक हूंडेकरी क्र १८४९१ यांचे दि.७/४/०६ ते ११/४/०६ पर्यंत कार्य कर्तव्य केले त्याची माहीती द्यावी. "

अपिलार्थीने वरील माहिती दिनांक- ०७-०४-०६ ते ११-०४-०६ या कालावधी मधील, प्रत्यक्षात अपेक्षिली आहे.

अपिलार्थीच्या या अर्जावर जनमाहिती अधिकारी यांनी त्यांचेकडील पत्र क्रमांक- जाक्र. राप/आप्र/उद./वाह/ ०६-६०२, दिनांक ३१-०८-२००६ रोजीच्या पत्रान्वये ‘ आपण मागितलेली माहिती ईतर कर्मचा-यांची गोपनिय माहिती असून सदर माहिती दिल्याने कर्मचा-यांतील आपसातील वैमनस्यात वाढ होण्याची शक्यता विचारात घेऊन व औद्योगिक शांततेस धोका निर्माण होवून त्यांचे परिणाम महामंडळावर नुकसानकारक होण्याची शक्यता आहे.’ असे अपिलार्थीस कळविले.

जनमाहिती अधिकारी यांच्या या निर्णयावर समाधान न झाल्यामूळे, अपिलार्थीने जनअपिलीय अधिकारी यांचेकडे दिनांक- ०७-०९-२००६ रोजी प्रथम अपील केले. या अपीलामध्ये अपिलार्थीने मुळमाहितीची मागणी कायम ठेवली आहे.

सदर अपिलावर जनमाहिती अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी न घेता जनमाहिती अधिकारी यांना त्यांचेकडील दिनांक- १२-०९-२००६ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस त्यांनी मागितलेली माहिती देण्याचे सूचीत केले. वास्तविकतः या प्रकरणी जनअपिलीय अधिकारी यांनी दोन्ही पक्षकारांना बोलावून, दोघांचेही म्हणणें ऐकून, जनअपिलीय अधिकारी यांनी त्यांचा निर्णय देणे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनूसार अभिप्रेत आहे. तथापि जनअपिलीय अधिकारी यांनी तसे न करता त्यांचे दिनांक- १२-०९-२००६ रोजीच्या पत्रान्वये जनमाहिती अधिकारी यांना अपिलार्थी यांनी मागितलेली सर्व माहिती देण्याचे सूचीत केले.

यावर जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक- २०-०९-२००६ रोजी त्यांनी मागितलेली माहिती दिली. तथापि सदर माहिती अर्धवट असल्याचे अपिलार्थी

यांनी सुनावणीमध्ये सांगितले. अपिलार्थीस दिनांक- २०-०९-२००६ रोजी प्राप्त झालेल्या माहितीमध्ये त्यांनी मागितलेली माहितीमधील चार मुद्यांपैकी दोन मुद्यांचा त्या माहितीमध्ये समावेश होता.

उर्वरीत दोन मुद्यांची माहिती अपिलार्थीस त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपिल केल्यानंतर अपिलार्थीस दाखविण्यात आले. सदर माहिती अपिलार्थीने मागितली असतांना फक्त अपिलार्थी यांना दाखविण्यात का आली, असे जनमाहिती अधिकारी व जनअपिलीय अधिकारी यांना सुनावणीमध्ये विचारले असता, सदर माहिती विस्तृतस्वरुपाची असल्यामूळे, अपिलार्थीस ती दाखविण्यात आली व त्यातील अपिलार्थीस हवी असलेल्या भागाची अपिलार्थी यांनी पहाणी केली असून, अपिलार्थीने ती माहिती, जनअपिलीय अधिकारी यांच्या निदर्शनास आणून दिली व या प्रकरणातील त्रुटी विभागीय नियंत्रक, राज्य परिवहन, लातूर यांच्या निदर्शनास आणल्यामूळे, विभाग नियंत्रक, राज्य परिवहन, लातूर यांनी राज्य परिवहन मंडळातील झालेल्या नुकसानभरपाईच्या वसूली संदर्भात कार्यवाही चालू केली आहे, असे अपिलार्थीने पुढे सुनावणीमध्ये सांगितले.

अपिलार्थीस मिळालेल्या माहितीमूळे अपिलार्थी आज समाधानी आहेत असे त्यांनी आज सुनावणीमध्ये सांगितले.

जनअपिलीय अधिकारी यांच्याकडून आदेश होवूनही अपिलार्थीस अर्धवट माहिती मिळाल्यामूळे अपिलार्थीने व्यथीत होवून राज्य माहिती आयोगाकडे दिनांक- १७-११-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे.

या प्रकरणाची पार्श्वभूमी समजावून घेतली असता, उदगीर स्थानकातून निघालेल्या बसच्या वाहनचालकाला उदगीरहून इंदापूर येथे जाण्याचे आदेश देण्यात आले होते व त्याचवेळी सदर बसच्या त्याच वाहनचालकाला उदगीर ते शेगाव अशाही मार्गावर जाण्याचे आदेश देण्यात आले होते.

उदगीर बसस्थानाकातून निघालेली बस उदगीर ते इंदापूर, बोरावली या मार्गाने मुंबई कडे जाणार होती. तथापि वाहनचालकास शेगाव येथून इंदापूर बोलाविले, असे दोन्हीही एकाच वेळी आदेश दिल्याने सदर वाहनचालक इंदापूर येथून शेगाव येथील मार्गावर निघून गेला व उदगीर स्थानकातून निघालेली बस इंदापूर येथे विना वाहनचालकाची तीन दिवस उभी राहीली व या प्रक्रियेमध्ये राज्य मार्ग परिवन महामंडळाचे नुकसान झाले. या नुकसानीस जबाबदार असणा-या अधिकारी / कर्मचारी यांच्यावर कारवाई करणे कसे आवश्यक आहे, हे या माहितीव्दारे अपिलार्थीने माहिती घेवून वाहतुक नियंत्रक, राज्य परिवहन, लातूर यांच्या निदर्शनास आणले. या बाबीवर आता विभाग नियंत्रक राज्य परिवहन, लातूर यांच्या मार्फत या प्रकरणातील संबंधीत दोषी कर्मचारी / अधिकारी यांच्या विरुध्द विभागीय चौकशी चालू झाली असून एसटी महामंडळाच्या नुकसानीस जबाबदार कोण आहेत. याची निश्चीती केली जाईल, असे अपिलार्थीस आता खात्री वाटत आहे.

आज झालेल्या युक्तीवादामध्ये जनमाहिती अधिकारी व जनअपिलीय अधिकारी यांनी त्यांची बाजू लेखी शपथपत्रावर आयोगास सादर करुन अपिलार्थीस दिनांक- २०-०९-२००६ व २१-११-२००६ रोजी माहिती दिल्याचे कबुल केले आहे. अपिलार्थीस उर्वरीत माहिती मिळण्यापूर्वीच अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोगाकडे

व्दितीय अपिल केले आहे. अपिलार्थीने उर्वरीत माहितीकरिता राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १७-११-२००६ रोजी व्दितीय अपिल केले व उर्वरीत माहिती त्यांना नंतर चार दिवसात म्हणजेच दिनांक- २१-११-२००६ रोजी मिळाली व त्या माहितीवर ते समाधानी आहेत, अपिलार्थीस हवी असलेली माहिती आता मिळाली आहे. त्याच बरोबर जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मूळ माहितीच्या मागणीच्या अर्जावर विहित मुदतीच्या आत प्रतिसाद दिला आहे. हे पहाता, अपिलार्थीने आयोगाकडे दाखल केलेले व्दितीय अपिल निकाली काढण्यात येत आहे. सबब खालील प्रमाणे निर्णय पारीत करण्यात येत आहे.

## निर्णय

६. अपील निकाली काढण्यात येत आहे.

**लातूर** **(वि. बा. बोरगे)**
दिनांक २२ जून,२००७ **राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद**

प्रति,

१ श्री.बिरादार व्यंकटराव खंडेराव, मु.पो. नागळगांव, तालूका- उदगीर, जिल्हा-लातूर

२ जनमाहिती अधिकारी तथा आगार प्रमूख, राज्य परिवहन उदगीर बस आगार उदगीर, यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

३ जनअपिलिय अधिकारी तथा विभाग नियंत्रक राज्य परिवहन महामंडळ लातूर,यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

४ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला, नविन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई – ३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यासाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

अपील क्रमांक- २००७/३७९/रामाआ/औ'बाद
निर्णय दिनांक २२ जून, २००७.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.बिरादार नरेश भगवानराव,<br>पत्रकार 'दैनिक सामना'<br>मु.पो. वलांडी, तालूका-देवणी<br>जिल्हा-लातूर. | .. | अपिलार्थी. |

विरुध्द

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जनमाहिती अधिकारी तथा<br>ग्रामविकास अधिकारी,<br>ग्रामपंचायत वलांडी, ता.देवणी,<br>जिल्हा-लातूर. | .. | प्रतिवादी |
| २. | जनअपिलिय अधिकारी तथा<br>गटविकास अधिकारी,<br>पंचायत समिती, देवणी<br>जिल्हा-लातूर. | .. | |

**<u>विवेचन</u>**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक- २२ जून,२००७ रोजी लातूर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्री.बिरादार नरेश भगवानराव (येथून पुढे अपिलार्थी असे संबोधण्यात येईल.), तर जनमाहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत, वलंडी, श्री. एस.एस.सुर्यवंशी, (येथून पुढे जनमाहिती

अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलिय अधिकारी तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती देवणी, श्रीमती यु.पी.बिरादार, ( येथून पुढे जनअपिलिय अधिकारी असे संबोधण्यात येईल ) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांचे दिनांक- १०-११-२००६ रोजीच्या माहितीच्या अर्जान्वये जनमाहिती अधिकारी यांच्याकडे १२ व्या वित्त आयोगा अंतर्गत आलेली शासकीय रक्कमेच्या जमा खर्चाची मागणी केली होती. या माहितीच्या मुद्यामध्ये १२ व्या वित्त आयोगाकडून प्राप्त झालेली रक्कम, खर्च झालेली रक्कम व शिल्लक रक्कम व त्याचबरोबर खर्च झालेल्या रक्कमेचा काम निहाय तपशील. त्यांनी या अर्जाव्दारे मागितला होता.

सदर माहिती अपिलार्थीने व्यक्तिशः अपेक्षिली होती.

आज झालेल्या युक्तीवादामध्ये सुरुवातीस अपिलार्थी यांनी आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मागे घेत असल्याचे सांगून सदर माहिती, जनमाहिती अधिकारी यांच्याकडून आता प्राप्त झाली असल्याचे त्यांनी आयोगाच्या निदर्शनास आणले आहे. त्या प्रित्यर्थ त्यांनी आयोगापुढे एक शपथपत्र सादर केले आहे. या शपथपत्राचे अवलोकन करता अपिलार्थी यांनी आयोगाकडे दाखल केलेले व्दितीय अपिल मागे घेण्याची त्यांनी परवानगी मागितली आहे. अपिलार्थीस अपिल मागे घेण्याची आता परवानगी देण्यात येत आहे व अपिलार्थीचे आयोगाकडे सादर केलेले व्दितीय अपिल खारीज करण्यात येत आहे. सबब खालील प्रमाणे निर्णय पारीत करण्यात येत आहे.

## निर्णय

७. अपील खारीज करण्यात येत आहे.

**लातूर** **(वि. बा. बोरगे)**

दिनांक २२ जून,२००७ **राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद**

प्रति,

१ श्री.बिरादार नरेश भगवानराव, पत्रकार 'दैनिक सामना' मु.पो.वलांडी, तालूका- देवणी, जिल्हा- लातूर.

२ जनमाहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी,ग्रामपंचायत वलांडी, तालूका- देवणी, जिल्हा- लातूर, यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

३ जनअपिलिय अधिकारी तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती, देवणी, जिल्हा- लातूर,यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

४ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला, नविन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई – ३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यासाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

अपील क्रमांक- २००७/ ३८२ /रामाआ/औ'बाद

निर्णय दिनांक २२ जून, २००७.

१. श्री.बिरादार व्यंकटराव खंडेराव .. अपिलार्थी.
मु.पो.नागलगाव तालूका- उदगीर
जिल्हा- लातूर

विरुध्द

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जनमाहिती अधिकारी तथा<br>आगार व्यवस्थापक,<br>राजय परिवहन उदगीर बस आगार<br>राज्य परिवहन महामंडळ, उदगीर. | .. | प्रतिवादी |
| २. | जनअपिलिय अधिकारी तथा<br>विभाग नियंत्रक,<br>राज्य परिवहन, लातूर. | .. | |

## विवेचन

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक- २२ जून,२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्रह. बिरादार व्यंकटराव खंडेराव (येथून पुढे अपिलार्थी असे संबोधण्यात येईल.),जनमाहिती अधिकारी तथा आगार व्यवस्थापक, श्री.जी.डी.जाधव, (येथून पुढे जनमाहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलिय अधिकारी तथा विभाग नियंत्रक, राज्य परिवहन, लातूर, श्री.आर.के.जाधव, ( येथून पुढे जनअपिलिय अधिकारी असे संबोधण्यात येईल ) हे हजर आहेत.

या प्रकरणी सर्व प्रथम अपिलार्थीने त्यांच्याकडील ०४-०८-२००६ रोजीच्या अर्जान्वये जनमाहिती अधिकारी यांच्याकडे खालील प्रमाणे माहिती मागविली होती.

“ १) चालक वाहकाचे दैनदिन डयुटी अलोकेशनच्या प्रती

( ७/४/०६ ते ११/४/०६)

२)     वाहतुक नियत्रकाचे डयुटी अलोकेशनच्या प्रती
(दि. ७/४/०६ ते ११/४/०६)

३)     तसेच दि. ८/४/०६ रोजी उदगीर- बोरीवली गाडीचे वाहक माने क्र. ५०६ या सदरच्या वाहकाचे मार्गपत्रकाचे दोन्ही बाजूचे झेरॉक्स प्रती पाहीजेत.

४)     चालक नागपूर्णे क्र ४३४६ व चालक हूंडेकरी क्र १८४९१ यांचे दि.७/४/०६ ते ११/४/०६ पर्यंत कार्य कर्तव्य केले त्याची माहीती द्यावी. ”

अपिलार्थीने वरील माहिति दिनांक- ०७-०४-०६ ते ११-०४-०६ या कालावधीतील मागितली असून ती व्यक्तीशः अपेक्षिली आहे.

अपिलार्थीच्या या अर्जावर जनमाहिती अधिकारी यांनी त्यांचेकडील पत्र क्रमांक- जाक्र. राप/आप्र/उद./वाह/ ०६-६०२, दिनांक ३१-०८-२००६ रोजीच्या पत्रान्वये ‘ आपण मागितलेली माहिती ईतर कर्मचा-यांची गोपनिय माहिती असून सदर माहिती दिल्याने कर्मचा-यांतील आपसातील वैमनस्यात वाढ होण्याची शक्यता विचारात घेऊन व औद्योगिक शांततेस धोका निर्माण होवून त्यांचे परिणाम महामंडळावर नुकसानकारक होण्याची शक्यता आहे.’ असे अपिलार्थीस कळवून अप्रत्यक्षरित्या माहिति देण्याचे नाकारले.

जनमाहिती अधिकारी यांच्या या निर्णयावर समाधान न झाल्यामूळे, अपिलार्थीने जनअपिलीय अधिकारी यांचेकडे दिनांक- ०७-०९-२००६ रोजी प्रथम अपील केले. या अपीलामध्ये अपिलार्थीने मुळमाहितीची मागणी कायम ठेवली आहे.

सदर अपिलावर जनमाहिती अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी न घेता जनमाहिती अधिकारी यांना त्यांचेकडील दिनांक- १२-०९-२००६ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस त्यांनी मागितलेली माहिती देण्याचे सूचीत केले. वास्तविकतः या प्रकरणी जनअपिलीय अधिकारी यांनी दोन्ही पक्षकारांना बोलावून, दोघांचेही म्हणणें ऐकून, जनअपिलीय अधिकारी यांनी त्यांचा निर्णय देणे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनूसार अभिप्रेत आहे. तथापि जनअपिलीय अधिकारी यांनी तसे न करता त्यांचे दिनांक- १२-०९-२००६ रोजीच्या पत्रान्वये जनमाहिती अधिकारी यांना अपिलार्थी यांनी मागितलेली सर्व माहिती देण्याचे सूचीत केले.

यावर जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक- २०-०९-२००६ रोजी त्यांनी मागितलेली माहिती दिली. तथापि सदर माहिती अर्धवट असल्याचे अपिलार्थी यांनी सुनावणीमध्ये सांगितले. अपिलार्थीस दिनांक- २०-०९-२००६ रोजी प्राप्त झालेल्या माहितीमध्ये त्यांनी मागितलेली माहितीमधील चार मुद्यांपैकी दोन मुद्यांचा त्या माहितीमध्ये समावेश होता.

जनअपिलीय अधिकारी यांच्याकडून आदेश होवूनही अपिलार्थीस अर्धवट माहिती मिळाल्यामूळे अपिलार्थीने व्यथीत होवून राज्य माहिती आयोगाकडे दिनांक- १७-११-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे.

या प्रकरणाची पार्श्वभूमी समजावून घेतली असता, उदगीर स्थानकातून निघालेल्या बसच्या वाहनचालकाला उदगीरहून इंदापूर मार्गे बोरिवली येथे जाण्याचे व त्याचवेळी सदर बसच्या त्याच वाहनचालकाला इंदापूर ते शेगाव अशाही मार्गावर जाण्याचे आदेश देण्यात आले होते.

उदगीर बसस्थानाकातून निघालेली बस उदगीर ते इंदापूर, बोरावली या मार्गाने मुंबई कडे जाणार होती. तथापि इंदापूर येथील वाहनचालकास दोन्हीही आदेश एकाच वेळी दिल्याने सदर वाहनचालक इंदापूर येथून शेगाव येथील मार्गावर निघून गेले व उदगीर स्थानकातून निघालेली बस इंदापूर येथे विना वाहनचालकाची तीन दिवस उभी राहीली व या प्रक्रियेमध्ये राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे नुकसान झाले. या नुकसानीस जबाबदार असणा-या अधिकारी / कर्मचारी यांच्यावर कारवाई करणे कसे आवश्यक आहे, हे या माहितीव्दारे अपिलार्थीने माहिती घेवून वाहतुक नियंत्रक, राज्य परिवहन, लातूर यांच्या निदर्शनास आणले. या बाबीवर आता विभाग नियंत्रक राज्य परिवहन, लातूर यांच्या मार्फत या प्रकरणातील संबंधीत दोषी कर्मचारी / अधिकारी यांच्या विरुध्द विभागीय चौकशी चालू झाली असून एसटी महामंडळाच्या नुकसानीस जबाबदार कोण आहेत. याची निश्चीती केली जाईल, असे अपिलार्थीस आता खात्रीपूर्वक वाटत असल्याचे त्यांनी आयोगा समोर सांगितले.

आज झालेल्या युक्तीवादामध्ये जनमाहिती अधिकारी व जनअपिलीय अधिकारी यांनी त्यांची बाजू लेखी शपथपत्रावर आयोगास सादर करुन अपिलार्थीस दिनांक-२०-०९-२००६ व २१-११-२००६ रोजी माहिती दिल्याचे व अपिलार्थीने ती मिळाल्याचे कबुल केले आहे. अपिलार्थीस उर्वरीत माहिती मिळण्यापूर्वीच अपिलार्थी

यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपिल केले आहे. अपिलार्थीने उर्वरीत माहितीकरिता राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १७-११-२००६ रोजी व्दितीय अपिल केले व  उर्वरीत माहिती त्यांना नंतर चार दिवसात म्हणजेच दिनांक- २१-११-२००६ रोजी मिळाली व त्या माहितीवर ते समाधानी आहेत, अपिलार्थीस हवी असलेली माहिती आता मिळाली आहे. त्याच बरोबर जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मूळ माहितीच्या मागणीच्या अर्जावर विहित मुदतीच्या आत प्रतिसाद दिला आहे. हे पहाता, अपिलार्थीने आयोगाकडे दाखल केलेले व्दितीय अपिल निकाली काढण्यात येत आहे. सबब खालील प्रमाणे निर्णय पारीत करण्यात येत आहे.

## निर्णय

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

**लातूर** **(वि. बा. बोरगे)**
दिनांक २२ जून,२००७ **राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद**

प्रति,

१ श्री.बिरादार व्यंकटराव खंडेराव, मु.पो.नागळगांव, तालुका- उदगीर, जिल्हा-लातूर

२ जनमाहिती अधिकारी तथा आगार प्रमूख, राज्य परिवहन उदगीर बस आगार उदगीर, यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

३ जनअपिलिय अधिकारी तथा विभाग नियंत्रक, राज्य परिवहन महामंडळ लातूर,यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

४ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला, नविन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई- ३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यासाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ (१) अन्वये दाखल झालेले अपील.**

अपील क्रमांक- २००७/ ८४४/रामाआ/औ'बाद
निर्णय दिनांक २५ जून ,२००७

१. श्री.आनंदा नागाराव भोपाळे .. अपिलार्थी.
मु.पो.ता.कळमनुरी
जिल्हा-हिंगोली.

विरुध्द

१. जनमाहिती अधिकारी तथा .. प्रतिवादी
उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.)
जिल्हा परिषद, हिंगोली.

२. जनअपिलिय अधिकारी तथा ..
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, हिंगोली.

**विवेचन**

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक- २५ जून,२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, श्री. आनंदा नागोराव भोपाळे, (येथून पुढे अपिलार्थी असे संबोधण्यात येईल.), जनमाहिती अधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, हिंगोली, श्री.शाम चव्हाण ( येथून पुढे जनमाहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल ) व जनअपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,हिंगोली, श्री.संजीव कूमार ( येथून पुढे जनअपिलीय अधिकारी तथा असे संबोधण्यात येईल ) तसेच उप आयुक्त (विकास

आस्थाना) विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद, श्री. पारस बोथरा, हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या दिनांक- ०२-०५-२००६ रोजीच्या व्दितीय अपिलावर आयोगाकडे सुनावणी झाली होती व अपिलार्थीचे अपिल मान्य करण्यात आले होते. तथापि आयोगाचा निर्णय होवूनही अपिलार्थीस त्यांनी मागितलेल्या माहितीच्या दोन मुद्यावर अपेक्षित असलेली माहिती मिळाली नसल्यामूळे अपिलार्थीने दिनांक- ०८ मार्च, २००७ रोजी आयोगाकडे तक्रार केली होती. त्या तक्रारीच्या संदर्भात ही सुनावणी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ (१) अन्वये घेण्यात येत आहे.

आयोगाने आदेश देवूनही अपिलार्थी यांनी जिल्हा परिषदेकडे हजर राहून आवश्यक त्या नस्तीची पहाणी केली नसल्याचे आज अपिलार्थी यांनी सादर केलेल्या शपथपत्रावरुन दिसून येते. तथापि तद्‌नंतर कक्ष अधिकारी (साप्रवि) जिल्हा परिषद, हिंगोली यांनी अपिलार्थीस दिलेल्या तोंडी सूचनेप्रमाणे ते जिल्हा परिषद, हिंगोली यांच्या सामान्य प्रशासन विभागाचे कार्यालयात दिनांक- १३-०६-२००७ रोजी हजर झाले. त्यावेळी त्यांना आवश्यक असलेल्या दोन मुद्यावरील माहिती जिल्हा परिषदेच्या जनमाहिती अधिकारी यांनी लेखी स्वरुपात पुरविली व त्याचबरोबर अपिलार्थीस हव्या असलेल्या संचिका त्यांच्या पहाणीसाठी उपलब्ध करुन देण्यात आल्या.

आता अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती मिळाली असल्यामूळे, त्यांची कोणतीही तक्रार राहीलेली नाही, असे त्यांनी आयोगा पुढे शपथपत्रा व्दारे सादर केले आहे.

अपिलार्थीच्या मूळ माहितीच्या अर्जाचे प्रयोजन पूर्ण झाले असल्यामूळे अपिलार्थी यांनी आयोगाकडे केलेला तक्रारअर्ज निकाली काढण्यात येत आहे. सबब खालील प्रमाणे निर्णय पारीत करण्यात येत आहे.

## निर्णय

१. अपिलार्थीचा तक्रारअर्ज निकाली काढण्यात येत आहे.

औरंगाबाद **(वि. बा. बोरगे)**
दिनांक-२५ जून, २००७. **राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद**

प्रति,

१ अपिलार्थी, श्री.आनंदा नागोराव भोपाळे, मु.पो.ता.कळमपुरी, जिल्हा-हिगोंली.

२ जनमाहिती अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य)जिल्हा परिषद, हिंगोली, यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

३ जनअपिलीय अधिकारी तथा,मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, हिंगोली यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

४ उपआयुक्त (विकास) विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद, यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

५ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला, नविन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई- ३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यासाठी.

६ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

अपील क्रमांक- २००७/ १४६/रामाआ/औ'बाद
निर्णय दिनांक २६ जून, २००७.

१. ॲड.अजीत एम.देशमूख .. अपिलार्थी.
व्दारा/- गजानन किराणा स्टोअर्स,
कारंजा रोड, बीड तालूका जिल्हा-बीड.

विरुध्द

१. जनमाहिती अधिकारी तथा .. प्रतिवादी
पोलीस उपअधिक्षक, बीड.

२. जन अपिलिय अधिकारी तथा ..
जिल्हा पोलीस अधिक्षक, बीड.

**विवेचन**

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक-२६ जून,२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी ॲड.अजित एम.देशमुख (येथून पुढे अपिलार्थी असे संबोधण्यात येईल.) व जनअपिलीय अधिकारी तथा पोलीस अधिक्षक, बीड, ( येथून पुढे त्यांना जनअपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल ) हे गैरहजर आहेत. जनमाहिती अधिकारी तथा पोलीस उपअधिक्षक, बीड, श्री.टी.ए.घोगळे, ( येथून पुढे जनअपिलिय अधिकारी असे संबोधण्यात येईल.) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांचेकडील माहितीच्या अर्जान्वये दिनांक- २३-०१-२००६ अन्वये जनमाहिती अधिकारी यांच्याकडे खालील प्रमाणे माहिती मागविली होती.

> “ या कायद्याच्या कलम ४ (१) प्रमाणे व सामान्य प्रशासन विभागाच्या परिपत्रक क्रमांक- केंमाअ/ २००५/ प्र.क्र.१९०/ ०५/५, मंत्रालय, मुंबई-३२, दिनांक- १८-०६-२००५ अन्वये १७ कामे सर्व प्राधीकरणांनी / आपल्या कार्यालयाने करणे बंधनकारक करण्यात आले होते. यासह केंद्र शासनाचा दि. २६ मे २००५ चा आदेशही आपणाकडे शासनाने दिले आहेत. या १७ कामांची (आपण मुदतीत केलेल्या) परिपूण्र माहिती मुद्देनिहाय फीससह कळवावी.”

अपिलार्थीने वरील माहिती, माहिती अधिकार कायदा लागू झाल्यानंतर ते १२ ऑक्टोंबर, २००५ पूर्वी चार महिने या कालावधीतील मागितली असून ती शिघ्र टपालाव्दारे अपेक्षिली आहे.

अपिलार्थीच्या या अर्जावर जनमाहिती अधिकारी यांनी कोणतीही कार्यवाही न केल्यामूळे याच माहिती करिता अपिलार्थीने जनअपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक- ३१-०३-२००६ रोजी प्रथम अपील केले. तथापि त्यांनी मार्च २००६ मध्ये (या पत्रावर तारीख नाही ) अपिलार्थीस ही माहिती तयार करण्यासाठी विलंब लागत असल्याने आपल्या प्रकरणात मुदत वाढविण्यात येत असून माहिती तयार होताच पुरवीत आहे, असे जनमाहिती अधिकारी यांनी एकतर्फी आश्वासीत केले. या

अपीलामध्ये अपिलार्थीने त्यांच्या मूळ माहितीच्या अर्जातील मागणी कायम ठेवून अपिलार्थीस माहिती नाकारणा-या जनमाहिती अधिकारी यांच्या विरुध्द शास्ती लावण्याचे जनअपिलीय अधिकारी यांना विनंती केली आहे. जनअपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या अर्जावर कोणत्याही प्रकारची सुनावणी न घेता अपिलार्थीला प्रथम दिनांक- १८-०४-२००६ रोजी त्यांच्याकडे पत्राने अपिलार्थीस नेमक्या कोणत्या शासकिय अधिकारी यांच्याकडून माहिती आवश्यक आहे. याचा बोध होत नसल्याने त्यांना नक्की कोणत्या माहिती अधिका-याकडून त्यांना माहिती हवी आहे, याचा खुलासा केल्यानंतर त्यांनी, अपिलार्थीस योग्य ती माहिती देण्याची तयारी दर्शविली आहे.

तद्नंतर जनअपिलीय अधिकारी यांनी त्यांच्याकडील पत्र क्रमांक- १०६०६, दिनांक- २१-०५-२००६ अन्वये जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेले उत्तर योग्य असून अपिलार्थीचे अपील फेटाळण्यात येत आहे, असे अपिलार्थीस कळविले.

जनमाहिती अधिकारी व जनअपिलीय अधिकारी यांच्याकडून मिळालेल्या अशा प्रकारच्या प्रतिसादामूळे अपिलार्थीने व्यथीत होवून दिनांक- २६-०६-२००६ रोजी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपिल केले आहे.

या अपिलामध्ये त्यांनी जनमाहिती अधिकारी यांच्यावर माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील नियम २० (२) प्रमाणे शिस्तभंगाची कार्यवाही प्रस्तावित करण्याचे व प्रथम अपिलीय अधिकारी यांना प्रशिक्षण देण्याचे आदेश देण्याची विनंती केली आहे.

आज झालेल्या युक्तीवादामध्ये असे आढळून आले आहे की, अपिलार्थी यांनी जनमाहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक २३-०१-२००६ रोजी ( सदर अर्ज जनमाहिती अधिकारी यांच्या कार्यालयात दिनांक- २४-०२-२००६ रोजी प्राप्त झाला, असे त्यांचे म्हणणे आहे.) काही माहिती मागविली होती. ही माहिती, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ४ ( b ) मधील तरतुदीनूसार प्रत्येक शासकीय प्राधिकरणाने जी माहिती स्वयंप्रेरीत म्हणून घोषीत करावयाची होती, ती होती. सदर माहिती प्रत्येक शासकीय कार्यालयाकडे दिनांक- १५ ऑक्टोंबर, २००६ रोजी अगर तत्पूर्वी असणे, शासनाने काढलेल्या परिपत्रका नुसार व माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ४ मधील तरतुदीनूसार आवश्यक होती. तथापि या प्रकरणी जनमाहिती अधिकारी यांच्या कार्यालयाने अशा प्रकारची स्वयंप्रेरणेने घोषीत करावयाची कोणत्याही प्रकारची माहिती विहित कालावधी लोटून गेल्यानंतरही माहिती तयार करुन ठेवली नव्हती, हे या प्रकरणी सिध्द झाले आहे.

जी माहिती शासकीय आदेश/ अधिनियमा प्रमाणे तयार ठेवणे आवश्यक होती. ती माहिती तयार न ठेवता अपिलार्थीस उडवाउडवीची उत्तरे देणे व तद्‌नंतर जनअपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीचे अपीलामध्ये सुनावणी न घेता फेटाळणे, या दोन्हीही कृती माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीला छेद जाणा-या आहेत.

या प्रकरणी जनअपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी व जनमाहिती अधिकारी या दोघानाही बोलावून त्यांचे म्हणणे ऐकून,त्यानंतर आपला निर्णय जाहीर करणे

अपेक्षित होते. तथापि जनअपिलीय अधिकारी यांनी अशा प्रकारची कोणतीही कार्यवाही केली नाही.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्राची पहाणी करता जनमाहिती अधिकारी व जनअपिलीय अधिकारी यांना माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतूदीच्या अंमलबजावणीच्या संदर्भात आवश्यक ते किमान ज्ञान प्राप्त नाही, असे दिसून येते. यास्तव असे आदेशित करण्यात येते की, सचिव (गृह) यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील सर्व अधिकारी / कर्मचारी यांचे करिता, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतूदीच्या अंमलबजावणी संदर्भात, वेळोवेळी कार्यशाळा, शिबीरे आयोजीत करावीत.

अपिलार्थीने जनअपिलीय अधिकारी यांच्या अपील निर्णयाच्या पत्रावर काही आक्षेप नोंदविले आहेत. या संदर्भात जनअपिलीय अधिकारी यांनी राज्य माहिती आयोगाकडे आपले म्हणणे सादर केले. त्यामध्ये सध्याचे जनअपिलीय अधिकारी हे ज्या वेळी बीड येथे पोलीस अधिक्षक म्हणून रुजू झाले, त्यांच्या पूर्वीच्या जिल्हा पोलीस अधिक्षकाने या अपीलावर निर्णय आधीच तयार करुन ठेवला होता. परंतू त्यावर स्वाक्षरी केली नव्हती. सदर अपील निर्णय अर्जावर सध्याचे जनअपिलीय अधिकारी यांनी दिनांक- २१-०६-२००६ रोजी स्वाक्षरी केली व तो निर्णय पारीत केला. या निर्णय पत्रावर दिनांक- २१-०५-२००६ या तारखेचा उल्लेख करण्यात आला आहे. ती चूक लिपीकाच्या नजरचुकीने झाली असून, ती तारीख २१-०६-२००६ अशी वाचावी. असे त्यांनी आयोगापुढे दाखल केलेल्या शपथपत्रात म्हटले आहे. या मध्येही त्यांनी अपिलार्थीचे म्हणणे न ऐकल्याचे अप्रत्यक्षरित्या कबुली दिली

आहे. त्यांची ही कृती बरोबर नसून त्यांनी अपिलार्थीस बोलावून घेवून त्यांचे म्हणणे ऐकून घेवून प्रथम अपिलाचा निर्णय पारीत करणे गरजेचे होते.

आज आयोगा समोर उपस्थित असलेले जनमाहिती अधिकारी हे आता अपिलार्थीने मागितलेली संपूर्ण माहिती त्यांच्याकडे तयार असल्याचे सांगत आहेत. त्यांना आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीने विचारलेली, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ४ ( b ) नूसार सर्व माहिती अपिलार्थीस हे आदेश पारीत झाल्यापासून तीन दिवसाच्या आत विनामुल्य व स्वाक्षाकिंत करुन पुरवावी.

अपिलार्थीस आता जरी माहिती मिळण्याच्या टप्प्यावर असली तरी जी माहिती ज्या कायद्यान्वये १५ ऑक्टोंबर, २००५ रोजी तयार करुन ठेवणे आवश्यक होते. ती दिडवर्षाचा कालावधी लोटून गेल्या नंतरही तयार होवू शकत नाही, ही या कायद्याच्या अंमलबजावणीची मोठी शोकांतिका आहे, असे म्हणल्यास वावगे ठरणार नाही.

त्याचबरोबर संबंधित जनमाहिती अधिकारी व त्यांचे सहाय्यक यांनी ही माहिती वेळेत तयार न करता जनतेस उपलब्ध न करुन देण्याच्या त्यांच्या कृती मध्ये, त्यांच्यामधील असलेला कर्तव्य परायणतेचा अभाव व या अधिनियमाप्रति असलेला अनादर स्पष्टपणे सिध्द होत आहे. या पार्श्वभूमीवर सदर अधिका-यां विरुध्द माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० (२) नूसार कार्यवाही करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

तेंव्हा असे आदेशित करण्यात येते की, सचिव (गृह) मंत्रालय, मुंबई यांनी या प्रकरणी जे जनमाहिती अधिकारी जबाबदार असतील त्या अधिका-यावर व त्याचप्रमाणे माहिती अधिकारी अधिनियम २००५ मधील कलम ५ (५) प्रमाणे

त्यांच्या सहायकाविरुध्द प्रचलीत महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील ) नियम १९७९ प्रमाणे योग्य ती प्रशासकीय कार्यवाही करावी / प्रस्तावित करावी व तसे केल्याचा अहवाल आयोगास तीन महिन्याच्या आत सादर करावा. वरील विवेंचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येत आहे.

## <u>निर्णय</u>

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. सचिव (गृह) मंत्रालय, मुंबई यांनी या प्रकरणी जे जनमाहिती अधिकारी जबाबदार असतील त्या अधिका-यावर व त्याचप्रमाणे माहिती अधिकारी अधिनियम २००५ मधील कलम ५ (५) प्रमाणे त्यांच्या सहायकाविरुध्द प्रचलीत महाराष्ट्र नागरी सेवा ( शिस्त व अपील ) नियम १९७९ प्रमाणे योग्य ती प्रशासकीय कार्यवाही करावी / प्रस्तावित करावी व तसे केल्याचा अहवाल आयोगास तीन महिन्याच्या आत सादर करावा.

३. अपिलार्थीने मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली सर्व माहिती अपिलार्थीस हे आदेश पारीत झाल्यापासून तीन दिवसाच्या आत विनामुल्य व स्वाक्षाकिंत करुन पुरवावी.

४. सचिव (गृह) यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील सर्व कर्मचारी / अधिकारी यांचे करिता, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीच्या अंमलबजावणी संदर्भात, वेळोवेळी कार्यशाळा, शिबीरे आयोजीत करावीत.

औरंगाबाद<br>
दिनांक २६ जून,२००७

**(वि. बा. बोरगे)**<br>
**राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद**

प्रति,

१ ॲड.अजित एम.देशमुख, व्दारा/- गजानन किराणा स्टोअर्स, कारंजा रोड, बीड, तालूका जिल्हा- बीड.

२ जनमाहिती अधिकारी तथा पोलीस उपअधिक्षक, बीड यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

३ जनअपिलिय अधिकारी तथा पोलीस अधिक्षक, बीड यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

४ सचिव, गृह विभाग, महाराष्ट्र-राज्य, मंत्रालय, मुंबई-३२ यांना योग्य त्या कार्यवाहीस्तव देण्यात येते.

५ श्री. दौड, सचिव मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला, नविन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई - ३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यासाठी.

६ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१४८

निर्णय दिनांक २६-०६-२००७

श्री. मनोहर पिलप्पा भवानकर, : अपीलार्थी

रा. बसबेश्वर कॉलनी, सा. कारखाना रोड

वसमतनगर, तालुका वसमत

जिल्हा हिंगोली

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :

तथा कार्यकारी अभियंता,

पुर्णा पाटबंधारे मंडळ वसमतनगर,

तालुका वसमतनगर जिल्हा हिंगोली

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा अधीक्षक अभियंता नांदेड पाटबंधारे

मंडळ नांदेड जिल्हा नांदेड

## विवेचन

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २६-०६-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपीलार्थी श्री. मनोहर पिलप्पा भवानकर (यापुढे त्यांना अपीलार्थी असे संबोधण्यात येईल) व जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, पुर्णा पाटबंधारे मंडळ वसमतनगर, तालुका वसमतनगर श्री. ग. न. व्यवहारे (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता नांदेड पाटबंधारे मंडळ नांदेड जिल्हा नांदेड हे अनुपस्थित आहेत.

या प्रकरणी अपीलार्थीने त्यांच्याकडील दिनांक ०२-०१-२००६ अन्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे एक अर्ज केला होता. या अर्जामध्ये त्यांनी दिनांक ०१-०७-१९६८ ते २-१९८६ पर्यतची त्यांची थकबाकी त्यांना मिळाली नसल्याने ती त्यांना त्वरीत अदा करण्या विषयी विनंती केली आहे.

या अर्जात पुढे अपीलार्थीने त्यांची केलेली चुकीची पदावनती व दिनांक १६-०२-१९८६ रोजी सुधारुन केलेल्या सुधारीत वेतननिश्चिती यानुसार त्यांना थकीत रकम अदा न करण्याच्या कारणाची मागणी अर्जाव्दारे केली आहे.

अपीलार्थीच्या या अर्जावरुन अपीलार्थीस निश्चितपणे काय हवे आहे याचा बोध होत नाही तथापि अपीलार्थीस त्यांच्या वेतनातील दिनांक ०१-०७-१९६८ ते ०१-०२-१९८६ या कालावधीतील थकीत रकम हवी असल्याचे दिसून येते.

अपीलार्थीच्या या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १८-०१-२००६ रोजी एक पत्र पाठवून या पत्रामध्ये त्यांनी अपीलार्थीस कोणतीही माहिती दिली नाही मात्र अपीलार्थी शासकीय सेवेत असतांना त्यांनी सदरील मागणी का केली नाही असे त्यांचे उलट स्पष्टीकरण विचारले.

जन माहिती अधिकारी यांच्या अशा प्रकारच्या प्रतिसादावर अपीलार्थीचे समाधान न झाल्याने त्यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (१) अन्वये दिनांक ०३-०५-२००६ रोजी जन अपीलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले व सदर अपीलामध्ये आपल्या वेतन फरकाची मागणी कायम ठेवली आहे.

अपीलार्थीच्या या अपीलावर जन अपीलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतल्याचे उपलब्ध कागदपत्रावरुन दिसून येत नाही. यावरुन त्यांची त्यांच्याकडील कर्मचा-यांच्या प्रती असलेली अनास्था व बेपर्वाई स्पष्ट होते. त्यांनी आपल्या कृतीने केवळ त्यांच्या मनात असलेली कर्मचा-यांची केवळ अनास्थाच प्रगट केली असे नव्हे तर माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कायद्याविषयी बेपर्वाई दर्शविली आहे. त्यांच्या अशा

प्रकारच्या बेफिकीर व कर्तव्यपरायणतेचा अभाव असलेल्या वर्तनाची सचिव जलसंपदा यांनी यथायोग्य नोंद घ्यावी असे त्यांना सुचित करण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी व जन अपीलीय अधिकारी यांच्याकडे प्रयत्न करुन अपीलार्थीचे उदिष्ट साध्य न झाल्याने अपीलार्थीने व्यथित होऊन माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०५-०६-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे. सदर अपील पोस्टाने राज्य माहिती आयोगाच्या कार्यालयास दिनांक ०१-०७-२००६ रोजी प्राप्त झाले आहे. सदर अर्जामध्ये कोणत्याही विशिष्ट माहितीची मागणी केली नसून त्यांची वैयक्तीक कैफियत या अर्जाव्दारे त्यांनी आयोगा समोर मांडली आहे. सबब हा अर्ज माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये तक्रार अर्ज म्हणून दाखल करुन घेण्यात येत आहे.

आज झालेल्या सुनावणीमध्ये या प्रकरणाची पार्श्वभुमी समजावून घेतली असता आयोगास जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे अशी माहिती देण्यात आली की अपीलार्थी यांची जलसंपदा खात्यामध्ये दिनांक ०८-०९-१९६७ पासून कालवा निरीक्षक म्हणून नेमणूक झाली होती. तदनंतर त्यांना दिनांक ०१-०७-१९६८ रोजी नाला किपर म्हणून पदावनत केले व त्यांना परत दिनांक ०१-०१-१९६९ रोजी कालवा निरीक्षक या मूळ पदावर नेमण्यात आले. सदर पदावनती पुढे वेतन पडताळणी पथकाने घेतलेल्या आक्षेपामुळे चुकीची ठरली व पुढे त्यांचे वेतन दिनांक १६-०२-१९८६ रोजी सुधारीत करुन निश्चित करण्यात आले. या संपूर्ण कालावधीतील वेतन निश्चितीचा फरक अद्यापही अपीलार्थी यांना मिळाला नाही. याकरिता अपीलार्थी हे वेगवेगळ्या पातळीवर वेळोवेळी प्रयत्न करीत आहेत तथापि या घटनेस आता बराच काळ (अंदाजे २० वर्षे) लोटल्यामुळे जुने अभिलेख सापडत नाहीत व अपीलार्थी ची वेतन निश्चित होऊ शकत नाही असे जन माहिती अधिकारी यांच्याकडूल सांगण्यात आले

तथापि आता अपीलार्थीने त्यांना या कालावधीतील थकबाकीची रकम मिळाली नाही असे बंधपत्र लिहून दिल्यास अपीलार्थीस ही थकबाकी देण्यासंदर्भातील प्रस्ताव तयार करुन तो शासन मान्यतेकरिता पाठविण्याचे त्यांनी आयोगासमोर कबूल केले आहे. उपलब्ध कागदपत्रा ची पाहणी करुन असे आदेशित करण्यात येते की, जन माहिती अधिकारी यांनी हा प्रस्ताव हे आदेश निर्गमित झाल्यापासून ३ महिन्याच्या आत शासनाकडे पाठवावा व नंतरच्या ३ महिन्या मध्ये शासनाकडून या प्रस्तावासंदर्भात योग्य ते आदेश प्राप्त करुन घेऊन अपीलार्थीस आपला अंतीम निर्णय कळवावा म्हणजे अपीलार्थीस आवश्यक वाटल्यास त्याला योग्य त्या प्राधिकरणा कडे जाता येईल. सचिव (जलसंपदा) यांनी या प्रकरणी वैयक्तीक लक्ष घालून अपीलार्थीच्या या प्रस्तावाची प्राधान्याने तपासणी करुन त्यावर शासनाचा अंतीम निर्णय, हा प्रस्ताव, त्यांचे कडे प्राप्त झाल्यानंतर ३ महिन्याच्या आत, द्यावा असे त्यांना सुचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभुमीवर अपीलार्थीचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

**<u>निर्णय</u>**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीने मागील कालावधीतील थकबाकीची रकम मिळाली नाही असे बंधपत्र लिहून दिल्यास अपीलार्थीस ही थकबाकी देण्यासंदर्भातील प्रस्ताव तयार करुन तो प्रस्ताव शासन मान्यतेकरिता हे आदेश निर्गमित झाल्यापासून ३ महिन्याच्या आत शासनाकडे पाठवावा व नंतरच्या ३ महिन्या मध्ये शासनाकडून या प्रस्तावासंदर्भात योग्य ते आदेश प्राप्त करुन घेऊन अपीलार्थीस आपला अंतीम निर्णय कळवावा. सचिव जलसंपदा यांनी या प्रकरणी वैयक्तीक लक्ष घालून अपीलार्थीच्या या प्रस्तावाची प्राधान्याने तपासणी करुन त्यावर शासनाचा अंतीम निर्णय सदर प्रस्ताव प्राप्त झाल्या नंतर ३ महिन्याच्या आत द्यावा.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक २६ जून २००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. मनोहर पिलप्पा भवानकर, रा. बसबेश्वर कॉलनी, सा. कारखाना रोड वसमतनगर, तालुका वसमत जिल्हा हिंगोली

२ जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, पुर्णा पाटबंधारे मंडळ वसमतनगर, तालुका वसमतनगर जिल्हा हिंगोली या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता नांदेड पाटबंधारे मंडळ नांदेड जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव जलसंपदा विभाग मंत्रालय मुंबई – ३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

६ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

अपील क्रमांक- २००७/ २२२/रामाआ/औ'बाद
निर्णय दिनांक २६ जून, २००७.

१. महंमद एकबाल पि.मो.युसूफ मुदखेडकर, मुख्यसंपादक, साप्ताहिक सत्यवृत, मिल कॉर्नर, बसस्टॅण्ड, नांदेड. .. अपिलार्थी.

विरुध्द

१. जनमाहिती अधिकारी तथा तालुका कृषी अधिकारी, नांदेड. .. प्रतिवादी

२. जनअपिलिय अधिकारी तथा ..
उपविभागीय अधिकारी कृषी, नांदेड.

## विवेचन

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक- २६ जून,२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी महमद एकबाल पि.मो.युसूफ (येथून पुढे अपिलार्थी असे संबोधण्यात येईल.), जनमाहिती अधिकारी तथा तालुका कृषी अधिकारी, नांदेड, श्री. एम.के.सोनटक्के, (येथून पुढे जनमाहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलिय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी कृषी, नांदेड, श्री.एस.के.पवार ( येथून पुढे जनअपिलिय अधिकारी असे संबोधण्यात येईल ) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थी यांनी सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक- ०८-०२-२००६ रोजीच्या अर्जान्वये जनमाहिती अधिकारी यांना त्यांच्या कार्यक्षेत्रातील अतिवृष्टीमूळे नुकसान झालेल्या शेतक-यांना शासनाकडून दिल्या गेलेल्या अनुदानाच्या वाटपा संदर्भात काही माहिती विचारली होती.

> “ अपिलार्थीने मागणी केलेली माहिती नांदेड, लिंबगाव, अर्धापूर, मुदखेड, बारड या क्षेत्रातील अतिवृष्टीमूळे शेताचे नुकान झालेल्या शेतक-यांना शासनाकडून दिले गेलेल्या अनुदानाच्या वाटप रजिस्टराची शेतक-यांच्या नावाची यादी, बॅकेचे नाव, शेतक-यांना दिले गेलेल्या देयकांची क्रमांक तसेच त्यांना देयक देतेवेळेस आपल्या सहाय्यक कृषि अधिकारी यांनी घेतलेली

ओळख व शेतक-याचे शेतीचे मुळ मालक असलेले शेतीचे पुरावे तसेच मस्टरवर घेतलेले साक्षीदार किंवा जामीनदार व स्व शेतक-यांचे सहया / आंगठे घेतलेल्या मस्टरची छायांकितप्रती मिळणे बाबत."

अपिलार्थीने वरील माहिती माहे डिसेंबर, २००५ ते माहे फेब्रुवारी २००६ या कालावधीतील मागितली असून ती नोंदणीकृत टपालाव्दारे अपेक्षिली आहे.

अपिलार्थी यांच्या या माहितीच्या अर्जावर जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक- ०८-०३-२००६ रोजी अपिलार्थीस माहिती पुरविली आहे. अपिलार्थीस, सदर माहिती दिनांक- ०८-०३-२००६ रोजी मिळाल्याची पोंचपावती जनमाहिती अधिकारी यांनी आयोगासमोर सादर केली. अपिलार्थीस दिलेली माहिती पहाता, ही माहिती सर्वसाधारण स्वरुपाची असून त्यामध्ये शेतक-यांना अनुदान दिलेल्या वाटप रजिस्टरची प्रत व शेतक-यांच्या नावाची यादी या सोबत जोडली नसल्याचे दिसून येते.

तथापि जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे असे आहे की, दिनांक- ०८-०३-२००६ रोजीच अपिलार्थीस अपेक्षित असलेले अनुदान वाटपाचे रजिस्टरची प्रत देवू केली होती व ती देण्यापोटी लागणारे शुल्क म्हणून रुपये ३८००/- अपिलार्थीस जनमाहिती अधिकारी यांच्या कार्यालयात भरण्याविषयी त्याच दिवशी सूचीत केले होते. तथापि हे पत्र अपिलार्थीस मिळाले नाहीत, असे अपिलार्थी आज सांगत आहेत. त्याचबरोबर अपिलार्थीस हे पत्र प्राप्त झाल्याची पोंच जनमाहिती अधिकारी यांच्याकडे नाही.

जनमाहिती अधिकारी यांच्याकडून अर्धवट माहिती प्राप्त झाल्याने अपिलार्थीने जनअपिलीय अधिकारी यांच्याकडे  दिनांक- १७-०३-२००६ रोजी प्रथम अपील केले. सदर अपील जनअपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयात प्राप्त झाल्याचा पुरावा म्हणून त्यांच्या कार्यालयाचा शिक्का व संबंधित व्यक्तीची स्वाक्षरी अपिलार्थी यांच्या मूळप्रतीवर असल्याचे अपिलार्थी यांनी आयोगास दाखविले. अपिलार्थी यांचेकडून सदर अपिल दाखल होवूनही जनअपिलीय अधिकारी यांनी या प्रकरणी या अपिलाची कोणत्याही प्रकारची दखल घेतली असल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत आहे. जनअपिलीय अधिकारी यांच्या या बेपर्वा वर्तनाची नोंद सचिव, कृषी, महाराष्ट्रराज्य मुंबई यांनी घ्यावी. असे त्यांना सूचीत करण्यात येत आहे. जनमाहिती अधिकारी व जनअपिलीय अधिकारी यांच्याकडून  मिळालेल्या अशा प्रकारच्या प्रतिसादामूळे व्यथीत होवून अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोगाकडे दिनांक- २६-०४-२००६ रोजी  व्दितीय अपिल केले आहे.

सदर अपिलाचे कारण म्हणून जनमाहिती अधिकारी यांच्याकडून जाणूनबुजून करण्यात येत असलेला विलंब व माहिती देण्याचे टाळाटाळ, असे दर्शविले आहे.

आज झालेल्या युक्तीवादामध्ये असे आढळून आले आहे की, अपिलार्थीने माहितीची मागणी केल्यानंतर दिनांक- ०८-०२-२००६ रोजी प्रथम माहितीची मागणी केल्यानंतर दिनांक- ०८-०३-२००६ रोजी जनमाहिती अधिकारी यांच्या तर्फे सर्वसाधारण स्वरुपाची माहिती मोफत देण्यात आली आहे. सदर माहिती फक्त सहा पानाची असल्याने, ही माहिती अपिलार्थीस मोफत दिली आहे. असे जनमाहिती अधिकारी यांनी आयोगा समोर  सांगितले. जनमाहिती अधिकारी यांची अपिलार्थीस

सदर माहिती मोफत देण्याची ही कृती चूक आहे. या माहिती बरोबर अपिलार्थीस अपेक्षित असलेल्या रजिष्टरच्या झेरॉक्सप्रती व शेतक-यांच्या नावाची यादी मात्र जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिली नाही, असे अपिलार्थीचे म्हणणे आहे. अपिलार्थीच्या या म्हणण्यात तथ्यांश असल्याचे, अपिलार्थीस जनमाहिती अधिकारी यांच्याकडून पुरविल्या गेलेल्या माहितीचे अवलोकन करता स्पष्ट होते. या प्रकरणी अपिलार्थीस प्रथमतः अर्धवट माहिती पाठविल्या बद्दल जनमाहिती अधिकारी यांना आयोगातर्फे समज देण्यात येत आहे.

जनमाहिती अधिकारी यांनी आज आयोगा समोर असा युक्तीवाद मांडला की, दिनांक- ०८-०३-२००६ रोजी अपिलार्थीस अपेक्षित असलेली माहिती १९०० पृष्ठांची असून त्या पोटी अपिलार्थीने त्यांच्या कार्यालयात ३८००/- भरण्याचे त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयातील पत्र दिनंक ०८-०३-२००६ व्दारे सूचीत केले होते. तथापि सदर पत्र अपिलार्थीस पोंचले नाही, असे अपिलार्थी यांचे म्हणणे आहे. त्याचबरोबर अपिलार्थीस हे पत्र पोंचल्याची कोणतीही पावती जनमाहिती अधिकारी हे आयोगास सादर करु शकले नाहीत.

दोन्हीही बाजूचा युक्तीवाद ऐकला असता व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्राची पाहणी करता असे आदेशित करण्यात येते की जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहिती पैकी अद्याप जी माहिती द्यावयाची आहे, ती स्पष्टस्वरुपात हे आदेश निर्गमीत झाल्यापासून दोन दिवसाच्या आत रजिष्टर पोष्टाने विनामूल्य पाठवावी. वरील विवेंचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपिल अंशतः मान्य करण्यात येत आहे.

## निर्णय

१.	अपिल अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२.	जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहिती पैकी अद्याप जी माहिती द्यावयाची आहे, ती पूर्णपणे स्पष्ट स्वरुपात हे आदेश निर्गमीत झाल्यापासून दोन दिवसाच्या आत रजिष्टर पोष्टाने विनामूल्य पाठवावी.

३.	जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस प्रथमतः अर्धवट माहिती पुरविल्या बद्दल जनमाहिती अधिकारी यांना आयोगातर्फे समज देण्यात येत आहे.

औरंगाबाद
दिनांक २६ जून,२००७

**(वि. बा. बोरगे)**
**राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद**

प्रति,

१	महंमद एकबाल पि.मो.युसूफ, मुदखेडकर,
मुख्यसंपादक, साप्ताहिक सत्यवृत, मिल कॉर्नर, बसस्टॅण्ड, नांदेड.

२	जनमाहिती अधिकारी तथा तालूका कृषी अधिकारी, नांदेड,यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

३	जनअपिलिय अधिकारी तथा उपविभागीय कृषी अधिकारी, नांदेड यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

४	सचिव, कृषी, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.-३२. यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठु.

५	श्री. दौड, सचिव मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला, नविन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई – ३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यासाठी.

६	निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२२७

निर्णय दिनांक   २६-०६-२००७

ॲड गुरुलिंग मन्मथप्पा काळे, : अपीलार्थी
रा. बोरी, तालुका जिल्हा लातूर
शिवकन्या निवास, भवरे वाडा, खोरी गल्ली,
लातूर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा उप अभियंता सार्वजनिक बांधकाम
विभाग, लातूर

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम
विभाग लातूर

**विवेचन**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २६-०६-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपीलार्थी ॲडव्होकेट श्री. गुरुलिंग मन्मथप्पा काळे (यापुढे त्यांना अपीलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग, लातूर श्री. यु. बी. झगडे (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक

बांधकाम विभाग लातूर श्री. आर. आर. हांडे (यापुढे त्यांना जन अपीलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपीलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक १०-०१-२००६ च्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

> "मौजे चामेवाडी - बोरी येथील मांजरा नदी पुलावरील संरक्षण लोखंडी अँगल पुरात वाहून गेलेल्या (Pipe Release) करण्यासाठीचे निविदा व अंदाजपत्रकाचे माहिती बाबत सद्या चालू असलेल्या कामाबाबतच्या निविदा व अंदाजपत्रकाच्या प्रतीची मागणी केली होती."

सदर माहितीचा कालावधी सन २००५-२००६ असा दर्शविला असून ही माहिती अपीलार्थीने टपालाव्दारे मागितली होती.

अपीलार्थीच्या या मागणीवर जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस त्यांचे कडील दिनांक १६-०२-२००६ रोजीच्या पत्रान्वये ही माहिती देण्यापोटी लागणारे शुल्क म्हणजे रुपये ६१ चे भरणा त्यांच्या कार्यालयात करण्याविषयी सुचित केले. त्याप्रमाणे अपीलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात दिनांक २२-०२-२००६ रोजी ६१ रुपये इतक्या रकमे चा भरणा केला. सदर रकम जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयाने स्विकृत करुन अपीलार्थीस पावती क्रमांक १३३५६२० या क्रमांकाने अपीलार्थीस पोहोच दिली.

अपीलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या वरील माहितीने त्यांचे समाधान न झाल्याने त्यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (१) अन्वये जन अपीलीय अधिकारी यांच्याकडे त्यांचे कडील दिनांक २१-०२-२००६ च्या अर्जान्वये प्रथम अपील केले आहे. अपीलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून दिनांक २३-०२-२००६ रोजी माहिती देण्यात आली. सदर माहिती मिळण्यापुर्वीच अपीलार्थीने प्रथम अपील जन अपीलीय अधिकारी यांच्याकडे केले आहे.

अपीलार्थीच्या या अपीलावर जन अपीलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी न घेता अपीलार्थीस ०७ मार्च २००६ च्या पत्राव्दारे आपणास माहिती दिनांक २३-०२-२००६ रोजी दिली असल्यामुळे आपण केलेले अपील दाखल करुन घेण्याची आवश्यकता नाही असे कळविले.

जन अपीलीय अधिकारी यांच्या या कृतीमुळे व्यथित होऊन अपीलार्थी यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २७-०४-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपीलामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्यावर माहिती न दिल्याबद्दल व जन अपीलीय अधिकारी यांच्यावर बेकायदेशीर आदेश पारीत केल्यामुळे त्यांच्याविरुध्द कारवाई करण्याची आयोगास विनंती केली आहे.

आज झालेल्या युक्तीवादामध्ये असे आढळून आले आहे की, अपीलार्थीने प्रथम अर्ज हा दिनांक १०-०१-२००६ रोजी केला त्यावर जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस प्रथम प्रतिसाद दिला तोच मुळी दिनांक १६-०२-२००६ रोजी म्हणजे ३६ दिवस इतक्या उशीराने. दिनांक १६-०२-२००६ रोजी त्यांनी अपीलार्थीस त्यांना आवश्यक असणारी माहिती मिळण्या पोटीचे शुल्क म्हणून रुपये ६१ शासकीय तिजोरीत भरण्याविषयी सुचित केले. तदनंतर अपीलार्थीने दिनांक २२-०२-२००६ रोजी शासकीय तिजोरीत रुपये ६१ इतक्या शुल्काचा भरणा केला. तदनंतर अपीलार्थीस दिनांक २३-०२-२००६ रोजी माहिती पुरविण्यात आली. अपीलार्थीस पुरविण्यात आलेल्या माहितीचे अवलोकन करता असे दिसून आले की अपीलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी फक्त अपीलार्थीने संदर्भित केलेल्या कामाचे अंदाज पत्रक देण्यात आलेले आहे. सदर कामाच्या निविदेची प्रत अपीलार्थीस हवी होती व ते त्या करिता लागणारे सर्व शुल्क भरण्यासही तयार होते तथापि ही माहिती अपीलार्थीस का देण्यात आली नाही याचे कारण सध्याचे जन माहिती अधिकारी सांगू शकत नाहीत. जन माहिती अधिकारी यांच्या या कृतीवरुन त्यांनी अपीलार्थीस अर्धवट माहिती दिल्याचे सिध्द होते.

त्याच प्रमाणे जन अपीलीय अधिकारी यांनी अपीलार्थीने त्यांच्याकडे केलेले दिनांक २१-०२-२००६ रोजीचे अपील स्विकारण्यास नकार दिला ही बाब तर जन अपीलीय अधिकारी यांच्या मनात माहिती अधिकार अधिनियम २००५ बद्दल असलेला अनादर व त्यांची बेपर्व वृत्ती स्पष्ट करते. त्यांच्या या वर्तनाची यथायोग्य नोंद सचिव सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी घ्यावी असे त्यांना सुचित करण्यात येते. त्याच बरोबर अपीलार्थीने मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीच्या निविदेची सत्यप्रत अपीलार्थीस हे आदेश पारीत झाल्यापासून २ दिवसाच्या आत विनामूल्य देण्यात यावी व जन माहिती अधिकारी यांनी ही माहिती अपीलार्थीस अर्धवट दिल्याबद्दल त्यांच्यावर मुख्य अभियंता सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग औरंगाबाद यांनी यथायोग्य, प्रचलीत सेवा नियमाप्रमाणे, प्रशासकीय कारवाई करावी असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे. या आदेशांचा अनुपालन अहवाल मुख्य अभियंता सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग औरंगाबाद यांनी आयोगास दोन महिन्याच्या आत पाठवावा.

सबब खालील प्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहेत.

**<u>निर्णय</u>**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. अपीलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या निविदेची सत्यप्रत जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस हे आदेश पारीत झाल्यापासून २ दिवसाच्या आत विनामूल्य द्यावी.

३. जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस अर्धवट माहिती दिल्याबद्दल मुख्य अभियंता सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग औरंगाबाद यांनी त्यांच्यावर, प्रचलीत सेवा नियमाप्रमाणे, यथायोग्य प्रशासकीय कारवाई करावी व केलेल्या कार्यवाहीचा अनुपालन अहवाल आयोगास दोन महिन्याच्या आत पाठवावा.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक २६ जून २००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ ॲड गुरुलिंग मन्मथप्पा काळे, रा. बोरी, तालुका जिल्हा लातूर शिवकन्या निवास, भवरे वाडा, खोरी गल्ली, लातूर

२ जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव सार्वजनिक बांधकाम विभाग मंत्रालय मुंबई यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ मुख्य अभियंता सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

७ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

अपील क्रमांक- २००७/ ३८३/रामाआ/औ'बाद
निर्णय दिनांक २७ जून, २००७.

१. श्री.अनिल मांगिलाल खिवसंरा, .. अपिलार्थी.
मु.पो.ता.दिंडोरी, जिल्हा- नाशिक.
विरुध्द

१. जनमाहिती अधिकारी तथा .. प्रतिवादी
ग्रामविकास अधिकारी,
ग्रामपंचायत, दिंडोरी
पंचायत समिती, दिंडोरी,
जिल्हा-नाशिक.

२. जनअपिलिय अधिकारी तथा ..
गटविकास अधिकारी,
पंचायत समिती, दिंडोरी
जिल्हा-नाशिक.

## विवेचन

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक- २७ जून,२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, श्री. अनिल मांगीलाल खिंवसरा, (येथून पुढे अपिलार्थी असे संबोधण्यात येईल.), जनमाहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत दिंडोरी, पंचायत समिती, दिंडोरी,श्री.धनंजय बबनराव, झेंडे (येथून पुढे जनमाहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जनअपिलीय अधिकारी तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती, दिंडोरी, श्री.भालचंद्र बदू बहिरम, (येथून पुढे जनअपिलिय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थी यांनी सर्व प्रथम जनमाहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कडील अर्ज दिनांक- ०४-०१-२००६ अन्वये खालील प्रमाणे माहितीची मागणी केली होती.

“१. ग्रामपंचायतीने ज्या बांधकामास परवानगी दिली आहे ते बांधकाम करतांना सार्वजनिक जागेवर अतिक्रमण झाले आहे का ? हे पाहण्याची जबाबदारी कोणाची आहे?

२. ग्रामपंचायतीने ज्या बांधकामास परवानगी दिली आहे ते बांधकाम करतांना सार्वजनिक जागेवर झालेले अतिक्रमण काढण्याची जबाबदारी कोणाची आहे.”

अपिलार्थीने वरील माहिती मागवितांना माहितीचा कालावधी ‘नाही’ असा दर्शविला असून ती व्यक्तीशः अपेक्षिली आहे.

अपिलार्थीच्या या अर्जास अनुसरुन जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांचेकडील पत्र दिनांक- १३-०२-२००६ रोजी खुलासा केला. या खुलाशामध्ये त्यांनी अपिलार्थी यांनी विचारलेला प्रश्न क्रमांक-१ चे उत्तर म्हणून सार्वजनिक जागेवर अतिक्रमण नियमित करण्यासाठीची जबाबदारी ग्रामपंचायतीचे आहे, असे म्हटले आहे व अपिलार्थीने विचारलेला प्रश्न क्रमांक-२ च्या संदर्भात त्यांनी सहा महिन्याच्या आतील अतिक्रमण असल्यास ते काढण्याची जबाबदारी ग्रामपंचायतची आहे, असे उत्तर दिले.

वरील उत्तराने समाधान न झाल्यामूळे अपिलार्थीने जनअपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक- २०-०२-२००६ रोजी प्रथम अपील केले. हे अपील करण्याचे

कारण म्हणून अपिलार्थीस अपूर्ण माहिती प्राप्त झाली असल्याचे त्यांनी नमूद केले आहे. या अपिलामध्ये देखील अपिलार्थी यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

अपिलार्थी यांच्या या अपील अर्जावर कोणत्याही प्रकारची सुनावणी न घेता जनअपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक- ०३-०३-२००६ रोजी एक पत्र लिहून ग्रामपंचायतचे अधिनियम १९५८ मधील कलम ५२ अन्वये करावयाच्या सिमेतील कोणत्याही सार्वजनिक जागेवर ग्रामपंचायतच्या पूर्वपरवानगी शिवाय बांधकाम करता येत नाही. तथापि बांधकाम करुन अतिक्रमण झाल्यास ते अतिक्रमीत बांधकाम तोडून काढून टाकण्याची जबाबदारी ग्रामपंचायतची आहे, असे कळविले.

सदर पत्र दिल्यानंतर जनअपिलीय अधिकारी यांनी परत त्यांच्याकडील पत्र दि.०७-०३-०६अन्वये अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयात चर्चेला बोलाविले अपिलार्थीच्या अपीलावर कोणत्याही प्रकारची सुनावणी न घेता अंतिमतः दि.२१-०३-२००६ रोजी एक पत्र लिहून, “ अपिलार्थीने कोणत्याही प्रकारची माहिती न मागता कायद्याचे

मत जाणून घेण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामूळे अपिलार्थीची मागणी फेटाळण्यात येत आहे, असे कळविले. ही सुनावणी फेटाळतांना जनअपिलीय अधिकारी यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ८ (१) (ख) हया कलमातील तरतुदी अन्वये अपिलार्थीची मागणी फेटाळली आहे.

जनअपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथीत होवून अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक- १७-०५-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपीलामध्ये त्यांनी जनअपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या अपील अर्जाचा काळजीपूर्वक विचार केला नाही. हा मुद्दा मांडला व त्याचबरोबर एक वेगळया कागदावरती एकूण पाच मुद्दे उपस्थित केले आहेत. या पाचही मुद्यामध्ये जनमाहिती अधिकारी व जनअपिलीय अधिकारी यांच्या पत्रातील विसंगती व जनअपिलीय अधिकारी यांच्या कृतीतील त्रुटी त्यांनी आयोगा समोर स्पष्ट केल्या आहेत. अपिलार्थी यांनी सदर अपील ठरवितांना त्यांच्या या मुद्यावर विचार करुन अपील ठरवावे, अशी आयोगास विनंती केली आहे.

आज झालेल्या युक्तीवादामध्ये व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन असे स्पष्ट होते की, मूळात अपिलार्थीने मूळ अर्जाव्दारे प्रश्नार्थक स्वरुपाची माहिती विचारली आहे व जनमाहिती अधिकारी यांनी त्यांच्या प्रश्नावर खुलासा केला आहे. या खुलाशात विसंगती आढळल्यामूळे अपिलार्थी यांनी जनअपिलीय अधिकारी यांच्याकडे अपील केले आहे. जनअपिलीय अधिकारी यांनीही प्रथम दिनांक- ०३-०३-२००६ रोजी खुलासा करुन नंतर अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयात चर्चा करण्यासाठी दिनांक- ०७-०३-२००६ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे व अंतिमतः अपिलार्थीचे अपील माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ८ (ख) अन्वये अपिलार्थी यांची माहितीची मागणी फेटाळली. अपिलार्थीने उपस्थित केलेल्या मुद्याची तपासणी करता, या प्रकरणी जनअपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारे सुनावणी न घेता अपिलार्थी यांच्या बरोबर पत्रव्यवहार करणे, अपिलार्थीस खुलासा देणे, या बाबी चुकीच्या आहेत. असे आयोगाचे मत आहे.

त्याचबरोबर अपिलार्थीस त्यांनी मागितलेली माहिती  नाकारताना दिलेले कारण या प्रकरणी लागू होत नाही, कारण कलम ८ (ख) मधील तरतूदीमध्ये  " कोणत्याही न्यायालयाने किंवा न्यायाधीकरणाने  जी प्रकाशीत करण्यास स्पष्टपणे मनाई केली, किंवा जी प्रकट केल्यामूळे  न्यायालयाचा अवमान होवू शकेल," अशी माहिती देण्यास जनमाहिती अधिका-यास प्रतिबंध केला आहे.  अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप पहाता ही माहिती सर्वसाधारण स्वरुपाची असून ती देण्यास न्यायालयाने मनाई करण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. त्यामूळे जनअपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस ८ (ख) मधील  तरतुदीनुसार माहिती  देण्याचे नाकारणे, ही त्यांची कृती चुकीची ठरते.

अपिलार्थीने आयोगास सादर केलेली कागदपत्रे व सुनावणीसाठी उपस्थित असलेले जनमाहिती अधिकारी व जनअपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तीवाद पहाता, जनमाहिती अधिकारी यांनी निश्चीत स्वरुपाची व अचूक माहिती, अपिलार्थीस, हे आदेश निर्गमीत झाल्यापासून दोन दिवसाच्या आत विनामुल्य द्यावी, असे आदेशित करण्यात येत आहे.

प्रसंगावशात असे आढळून आले आहे की,  जिल्हापरिषद नाशिक यांचे कार्यक्षेत्रातील कर्मचा-यांना/ अधिका-यांना माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीच्या अंमलबजावणीच्या संदर्भात किमान आवश्यक ज्ञान नाही. तेंव्हा त्याकरिता मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद, नाशिक यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील सर्व जनमाहिती अधिकारी व जनअपिलीय अधिकारी यांच्याकरिता माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीच्या अंमलबजावणी संदर्भात वेळोवेळी कार्यशाळा/

शिबीरे आयोजीत करावीत. वरील विवेंचनासह अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

## निर्णय

१. अपिल  निकाली काढण्यात येत आहे.

२. अपिलार्थीस जनमाहिती अधिकारी यांनी त्यांनी मागितलेली मूळ माहिती हे आदेश निर्गमीत झाल्यापासून दोन दिवसाच्या आत अचूकरित्या व विनामुल्य पुरवावी.

३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद, नाशिक यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील सर्व जनमाहिती अधिकारी व जनअपिलीय अधिकारी यांच्याकरिता माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीच्या अंमलबजावणी संदर्भात वेळोवेळी कार्यशाळा/ शिबीरे आयोजीत करावीत.

औरंगाबाद
दिनांक २७ जून,२००७

**(वि. बा. बोरगे)**
**राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद**

प्रति,

१ श्री.अनिल मांगिलाल खिवसंरा, मु.पो.ता.दिडोंरी, जिल्हा- नाशिक

२ जनमाहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत, दिंडोरी, यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

३ जनअपिलिय अधिकारी तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती, दिंडोरी, जिल्हा- नाशिक, यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

४ मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद, नाशीक यांना योग्य त्या कार्यवाहीस्तव देण्यात येते.

५ श्री. दौड, सचिव मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला, नविन

प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई – ३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यासाठी.

६ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/३८४

निर्णय दिनांक २७-०६-२००७

श्री. निळकंठ दगडू पाटील, : अपीलार्थी

मु. बिलखेडे, पो. जांभोरे, तालुका धरणगांव

जिल्हा जळगाव

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :

तथा तहसीलदार एरंडोल, तालुका एरंडोल,

जिल्हा जळगाव

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा उपविभागीय अधिकारी जळगाव

जिल्हा जळगाव

**विवेचन**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २७-०६-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपीलार्थी श्री. निळकंठ दगडू पाटील (यापुढे त्यांना अपीलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार एरंडोल जिल्हा जळगाव श्री. र. ब. राजपूत (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी जळगाव जिल्हा जळगाव श्री. अनिल पवार (यापुढे त्यांना जन अपीलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी सर्व प्रथम अपीलार्थीने त्यांच्याकडील दिनांक ३१-०१-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडून, " मे. प्रांत ऑ. सा. अ. भाग यांचेकडील हुकूम नं. एल. बी. पी. एस आर १६/५६ तारीख २५-०२-५७ अन्वये मंजूर प्लॉट नं. ५, ६, ७, ८, १३, १४, १५, १६ चे प्लॉटची नक्कल मिळावी " अशी मागणी केली होती.

सदर माहितीचा कालावधी अपीलार्थीने आज (अर्ज दिनांकाखेर) अखेर असा दर्शविला असून सदर माहिती अपीलार्थीने व्यक्तीशः अपेक्षिली होती.

अपीलार्थीने अर्जासोबत जन माहिती अधिकारी यांच्या माहितीसाठी कबुलायतीची तसेच कच्च्या प्लॉटची नकाशाची झेराक्स प्रत व तहसीलदार धरणगाव यांचे दिनांक ०७-०१-२००६ च्या पत्राची झेरॉक्स प्रत संदर्भाकरिता जोडली आहे. अपीलार्थीच्या सदर अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस त्यांचेकडील पत्र क्रमांक १२/२००६ दिनांक १६-०२-२००६ अन्वये अपीलार्थीस त्यांचे कार्यालयात ही माहिती देण्यापोटीचे शुल्क म्हणून एकूण रुपये ८४ त्यांचे कार्यालयात भरण्याची विनंती केली. सदर पत्रातील सूचनेनुसार अपीलार्थीने २ मार्च २००६ रोजी जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयात पावती क्रमांक ०३२३६३२ व्दारे सदर शुल्क भरले. अपीलार्थीस त्याच दिवशी त्यांनी मागितलेल्या माहिती पैकी काही माहिती देण्यात आली. अपीलार्थीने एकूण ८ प्लॉटच्या नकला व या प्लॉटच्या कबुलायतनाम्याच्या प्रती मागितल्या होत्या तथापि जन माहिती अधिकारी यांच्याकडून

अपीलार्थीस फक्त ४ प्लॉटच्या कबुलायतनामाच्या प्रती दिल्या मात्र नकाशाच्या प्रती त्यांच्याकडे उपलब्ध नसल्यामुळे ते त्या अपीलार्थीस देऊ शकले नाहीत.

वरील प्रकारे मिळालेल्या माहितीवर समाधान न झाल्याने अपीलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) अन्वये जन अपीलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील दिनांक ०६-०३-२००६ रोजी केले. सदर अपील जन अपीलीय अधिकारी यांच्याकडे ०९ मार्च २००६ रोजी प्राप्त झाले. सदर अपीलाचे कारण अपीलार्थीस मिळालेली माहिती चुकीची असल्याचे अपीलार्थीने त्यांच्या अपीलात दर्शविले आहे. अपीलार्थीने त्यांची मूळ माहितीची मागणी या अपीलामध्ये कायम ठेवली आहे.

जन अपीलीय अधिकारी यांनी या अपीलाची सुनावणी दिनांक २८-०३-२००६, २५-०४-२००६, २३-०५-२००६, २०-०६-२००६, १८-०७-२००६, १४-०८-२००६, १२-०९-२००६ व १०-१०-२००६ इतक्या तारखांना एकूण ८ वेळा ठेवली. वरील ८ सुनावणीपैकी अपीलार्थी फक्त २३-०५-२००६ च्या सुनावणीस हजर झाले त्यावेळी अपीलार्थीचे म्हणणे नोंदवून घेण्यात आले. तर दिनांक २०-०६-२००६ रोजी झालेल्या सुनावणीमध्ये अपीलार्थी सुनावणी संपल्यानंतर जन अपीलीय अधिकारी यांच्या कार्यालयात हजर झाले. उर्वरीत ६ वेळी अपीलार्थी सुनावणीसाठी जन अपीलीय अधिकारी यांचे कार्यालयात उपस्थित झाले नाहीत. अपीलार्थीची सुनावणीची अनुपस्थिती पाहता अपीलार्थीस या मागणीकरिता स्वारस्य उरलेले नसल्याचा निर्णय जन अपीलीय अधिकारी यांनी घेऊन दिनांक १०-१०-२००६ रोजी अपीलार्थीचे अपील न्यायालयीन कामकाजातून काढून टाकले. (dismissed in default) पुर्वी अपीलार्थीने मागणी केलेले प्लॉट एरंडोल तालुक्यात होते तदनंतर एरंडोल तालुक्याचे एरंडोल व धरणगाव असे २ भाग झाले आणि अपीलार्थीने माहिती मागितलेल्या माहितीशी संदर्भित भूखंड आता धरणगाव तालुक्यात गेला त्यामुळे जन अपीलीय अधिकारी यांनी तहसीलदार धरणगाव यांच्याकडे या माहितीसाठी पाठपुरावा केला तथापि तहसीलदार

धरणगाव यांचेकडील सदर माहिती उपलब्ध होऊ शकत नसल्याचे त्यांनी त्यांचेकडील पत्र दिनांक २९-१०-२००६ रोजी जन अपीलीय अधिकारी यांना दिले आहे.

जन अपीलीय अधिकारी यांच्या सुनावणीतील निर्णयामुळे व्यथित होऊन अपीलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दिनांक ११-०५-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे. या व्दितीय अपीलामध्ये त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आज झालेल्या युक्तीवादामध्ये असे आढळून आले आहे की, आजमितीस जन माहिती अधिकारी व जन अपीलीय अधिकारी यांच्या कार्यालयात अपीलार्थी यांनी मागणी केलेली कोणतीही माहिती उपलब्ध नाही. अपीलार्थीने त्यांच्या माहिती अर्जासोबत दिलेल्या कबुलायत नाम्याच्या प्रतीच अर्जदाराला प्रतिउत्तर म्हणून जन माहिती अधिकारी यांनी आवश्यक ते शुल्क आकारुन केवळ प्रमाणीत करुन पुरविल्या. अपीलार्थी यांनी मागितलेली नकाशाची प्रत जन माहिती अधिकारी सदर प्रत त्यांच्याकडे उपलब्ध नसल्यामुळे देऊ शकले नाहीत. सदर प्रत अपीलार्थीस कशी देता येईल यादृष्टीने चर्चा केली असता असे आढळून आले आहे की, आता जर अपीलार्थीने संबंधित भूखंडाच्या चतु:सीमा महसूल विभागाच्या व भूमी अभिलेख कार्यालयाच्या अधिका-याना दाखविल्या तर त्यावरुन अपीलार्थीस अपेक्षित असलेल्या प्लॉटचा नकाशा तयार करता येईल व त्याची तपासणी करुन महसूल यंत्रणेला तो मोजणी करुन घेऊन प्रमाणित करुन देता येईल. अपीलार्थीस हवी असलेली नकाशाची प्रत मिळण्यासाठी आता हाच एकमेव मार्ग उरला असे चर्चेतून निष्पन्न झाले आहे. या परिस्थितीत असे आदेशित करण्यात येते की, तहसीलदार धरणगाव व तालुका निरीक्षक भूमी अभिलेख धरणगाव यांनी अपीलार्थीने संदर्भिय भूखंडाच्या दाखविलेल्या चतु:सीमातील असलेल्या क्षेत्राची मोजणी करुन त्याच्या सीमा निश्चीत करुन, नकाशा तयार करावा व त्याची प्रमाणीत प्रत हे आदेश निर्गमित झाल्यापासून ४५ दिवसाच्या आत अपीलार्थीस उपलब्ध करुन द्यावी.

तहसीलदार धरणगाव व तालुका निरीक्षक भूमी अभिलेख धरणगाव यांच्यातील समन्वयाचे काम उपविभागीय अधिकारी जळगाव यांनी करावे. तालुका निरीक्षक भूमी अभिलेख धरणगाव यांनी या कामामध्ये महसूल यंत्रणेस संपूर्णतः सहकार्य करावे.

अपीलार्थी मोजणी फी भरण्यास तयार असल्यामुळे त्यांनी सदर मोजणी फी तालुका निरीक्षक भूमी अभिलेख यांच्या कार्यालयात हे आदेश प्राप्त झाल्यापासून ७ दिवसाच्या आत भरावी. अपीलार्थीस माहिती देण्याची मुदत अपीलार्थीने सदर मोजणी रकमेचा शासकीय तिजोरीत भरणा केल्या पासून मोजण्यात यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभुमीवर अपीलार्थीचे आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

## निर्णय

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. तहसीलदार धरणगाव व तालुका निरीक्षक भूमी अभिलेख धरणगाव जिल्हा जळगाव यांनी अपीलार्थीने भूखंडाच्या दाखविलेल्या चतु:सीमातील असलेल्या क्षेत्राच्या सीमा निश्चीत करुन व मोजणी करुन त्याचा नकाशा तयार करावा व तो प्रमाणित करुन त्याची प्रत हे आदेश निर्गमित झाल्या पासून ४५ दिवसाच्या आत अपीलार्थीस उपलब्ध करुन द्यावी.

३. अपीलार्थीने मोजणी फी चा भरणा तालुका निरीक्षक भूमी अभिलेख यांच्या कार्यालयात हे आदेश प्राप्त झाल्यापासून ७ दिवसाच्या आत करावा. अपीलार्थीस माहिती देण्याची मुदत अपीलार्थीने सदर मोजणी रकमेचा भरणा केल्यापासून मोजण्यात यावी.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक २७ जून २००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. निळकंठ दगडू पाटील, मु. बिलखेडे, पो. जांभोरे, तालुका धरणगांव जिल्हा जळगाव

२ जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार एरंडोल, तालुका एरंडोल, जिल्हा जळगाव यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी जळगाव जिल्हा जळगाव यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ तहसीलदार धरणगाव तालुका धरणगाव जिल्हा जळगाव यांना या निकालपत्रा तील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ तालुका निरीक्षक भूमी अभिलेख धरणगाव तालुका धरणगाव जिल्हा जळगाव यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

७ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

अपील क्रमांक- २००७/३८९/रामाआ/औ'बाद
निर्णय दिनांक २८ जून, २००७.

१. श्री.चंद्रकांत ज्ञानेश्वर वाकचौरे .. अपिलार्थी.
रंगारगल्ली, संगमनेर,
जिल्हा- अहमदनगर

विरुध्द

१. जनमाहिती अधिकारी तथा .. प्रतिवादी
सचिव, वडाळा महादेव विविध
कार्यकारी सहकारी (विकास) सेवा
संस्था मर्यादित, मु.पो.वडाळा महादेव,
ता.श्रीरामपूर.

२. जनअपिलिय अधिकारी तथा ..
सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था,
श्रीरामपूर, जिल्हा- अहमदनगर.

## विवेचन

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक- २८ जून,२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी , यांचेवतीने त्यांचे प्रतिनिधी श्री.राजेश चंद्रकांत वाकचोरे, (येथून पुढे अपिलार्थी असे संबोधण्यात येईल.), तर जनमाहिती अधिकारी तथा सचिव, वडाळा, महादेव विविध कार्यकारी सहकारी (विकास) सेवा संस्था मर्यादित, वडाळा महादेव,ता.श्रीरामपूर, श्री.नामदेव लक्ष्मण लबाडे, (येथून पुढे जनमाहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलिय अधिकारी तथा सहाय्यक निबधंक, सहकारी संस्था श्रीरामपूर, जिल्हा- अहमदनगर, श्री.ए.व्ही.भांगरे ( येथून पुढे जनअपिलिय अधिकारी असे संबोधण्यात येईल ) हे हजर आहेत.

अपील सुनावणीच्या सुरुवातीस अपिलार्थी यांनी जनमाहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्याकडे उपलब्ध असलेली सर्व माहिती मिळाल्याचे आयोगा समोर सांगितले. त्याचबरोबर अपिलार्थीच्या माहिती मागण्याच्या अर्जाचे अवलोकन केले असता, सदर अर्ज दिनांक- ०८ ऑगस्ट, २००५ रोजी म्हणजेच १२ ऑक्टोंबर, २००५ पूर्वी जनमाहिती अधिकारी यांच्याकडे महाराष्ट्र माहिती अधिकार अधिनियमान्वये दाखल केल्याचे दिसून येते. मात्र आयोगाकडे केलेले व्दितीय अपिल माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये केलेले आहे. अपिलार्थीने मूळ अर्ज एका अधिनियमाखाली व त्यावरील अपिल प्रचलीत दुस-या अधिनियमाखाली असे केले आहे. अशा प्रकारचे अपिल ठरविण्याची अधिकारिता राज्य माहिती आयोगास नसल्याने अपिलार्थीचे अपील खारीज करण्यात येत आहे. सबब खालील प्रमाणे निर्णय पारीत करण्यात येत आहे.

## निर्णय

८. अपील खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद.**
दिनांक २८ जून,२००७

**(वि. बा. बोरगे)**
**राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद**

प्रति,

१ श्री.चंद्रकांत ज्ञानेश्वर वाकचौरे, रंगारगल्ली, संगमनेर, जिल्हा- अहमदनगर

२ जनमाहिती अधिकारी तथा सचिव, वडाळा महादेव विविध कार्यकारी सहकारी विकास सेवा संस्था मर्यारित वडाळा, तालूका श्रीरामपूर, जिल्हा- अहमदनगर, यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

३ जनअपिलिय अधिकारी तथा सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, श्रीरामपूर,

तालूका- श्रीरामपूर, जिल्हा- अहमदनगर,यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

४ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला, नविन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई – ३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यासाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

अपील क्रमांक- २००७/ ३८५/रामाआ/औ'बाद
निर्णय दिनांक २९ जून, २००७.

१. सौ.प्रमिला अशोक चव्हाण, .. अपिलार्थी.
१०३, गुरुकृपा, आरती सहकारी
गृह संस्था देवपूर, धुळे.

विरुध्द

१. जनमाहिती अधिकारी तथा .. प्रतिवादी
तलाठी देवपूर
जिल्हा-धुळे.

२. जनअपिलिय अधिकारी तथा ..
उपविभागीय अधिकारी, धुळे.

## विवेचन

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक- २९ जून,२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी , सौ.प्रमिला अशोक चव्हाण, (येथून

पुढे अपिलार्थी असे संबोधण्यात येईल.) हया गैरहजर आहेत. तर जनमाहिती अधिकारी तथा तलाठी, देवपूर, जि.धुळे,श्री.व्ही.व्ही.सोनवणे, (येथून पुढे जनमाहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जनअपिलिय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, धुळे,श्री.जी.एम.कदम,(येथून पुढे जनअपिलिय अधिकारी असे संबोधण्यात येईल ) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक- २१-१०-२००५ रोजीच्या पत्रान्वये जनमाहिती अधिकारी यांच्याकडे खालील प्रमाणे माहितीची मागणी केली होती.

> " सदरचे क्षेत्रफळ ज्या लेआऊटने दाखविणेत आले त्याची प्रत मिळणेबाबत. सर्वे क्रमांक- ६४/२ मध्ये शंभरपेक्षा जास्त प्लॉट होते, सदर सर्वे नंबरचा दफा कोणत्या कागदपत्रावरुन तयार झाला.
>
> सिटीसर्वेचा मोजमाप केलेला उतारा दाखल केल्यानंतरही दुरुस्ती आदेश काढलेला नाही. तलाठी देवपूर हयांनी मोजमाप करुन पंचनामा करताच प्रकरण निकाली निघाले असते. चार महिने झाले तरीही कार्यवाही नाही. शासनाकडे दाद मागावयाची आहे."

अपिलाथीने ही माहिती टपालाव्दारे अपेक्षिली आहे.

अपिलार्थीने माहिती मागण्यासाठी सर्व प्रथम अर्ज जनमाहिती अधिकारी यांच्याकडे न करता तो तहसीलदार, धुळे यांच्याकडे केला होता. अपिलार्थीच्या या अर्जानूसार तहसीलदार, धुळे यांनी त्यांचे दिनांक- ११-११-२००५ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीचे जागेचे कमी जास्त क्षेत्रफळाचे प्रकरण तालूका निरीक्षक भूमीअभिलेख

यांच्याकडे पाठविल्याचे अपिलार्थीस कळविले आहे व त्याचबरोबर अपिलार्थीस नगररचनाकार, धुळे यांच्या कार्यालयाकडून सदर प्रत प्राप्त होवू शकेल, असे सूचीत केले. अपिलार्थीस या अर्जाच्या संदर्भात दुसरे जनमाहिती अधिकारी जे आज सुनावणीस उपस्थित आहेत, त्यांनी देखील अपिलार्थीने मागितलेली कागदपत्रे शोध घेतली असता त्यांच्या दप्तरी आढळत नसल्याचे कळविल्याचे सांगत आहेत. जनमाहिती अधिकारी यांच्या वरील पत्रामूळे समाधान न झाल्यामूळे अपिलार्थीने त्यांच्याकडील दिनांक- १४-१२-०५ रोजीच्या अपील अर्जान्वये माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनूसार प्रथम अपील केले.

सदर अपीलाची सुनावणी जनअपिलीय अधिकारी यांनी दिनांक- २३-१२-२००६ रोजी घेवून अपिलार्थीस दिनांक- २१-०२-२००६ रोजी उत्तर दिले आहे. हे उत्तर पाहता, या सुनावणीमध्ये अपिलार्थीस त्यांच्या अपिलावर कोणताही ठोस निर्णय जनअपिलीय अधिकारी यांनी दिला नाही, असे आढळून येते. अपिलार्थीस नगर भूमापन अधिकारी यांच्याकडून आवश्यक ती कागदपत्रे प्राप्त करुन घेवून त्यांच्या कार्यालयास सादर केल्यास त्यांच्या मूळ प्रश्नावर कार्यवाही केली जाईल, अशा प्रकारचा उल्लेख या सुनावणी आदेशा मध्ये आहे, तो बरोबर नाही. याची नोंद जनअपिलीय अधिकारी यांनी घ्यावी.

जनअपिलीय अधिकारी यांच्या अशा प्रकारच्या उत्तराने व्यथीत होवून माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या १९ (३) अन्वये अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोगाकडे दिनांक- २५-०५-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे. हया अपीलामध्ये त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे व त्याचबरोबर

त्यांनी जनमाहिती अधिकारी व जनअपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस दिशाभूल करणारे पत्रे लिहीली असल्याचे म्हटले आहे. त्या पुढे त्यांनी या प्रकरणी जिल्हाधिकारी धुळे यांच्याकडे तक्रार करुन काहीही कार्यवाही झाली नसल्याचेही आयोगास निदर्शनास आणले आहे.

आज झालेल्या युक्तीवादामध्ये असे आढळून आले आहे की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही अत्यंत सरळपणे केलेली आहे. अपिलार्थीस धुळे देवपूर येथील भूखंड क्रमांक ६४/२ या भूखंडाचा ७/१२ उतारा ज्या कागदपत्रावरुन तयार केला, त्या कागदपत्राच्या प्रती हव्या होत्या. सदर भूखंडाची जिल्हाधिकारी, धुळे यांनी त्यांच्याकडील दिनांक- १३-०५-१९७४ रोजीच्या आदेशा अन्वये बिगर शेती म्हणून नोंद देखील केली आहे.

अपिलार्थीने मागणी केलेली कागदपत्रे ही जिल्हाधिकारी कार्यालयात तरी किमान असली पाहिजेत, अशी अपेक्षा आहे. कारण जिल्हाधिका-यांनी सदर भूखंड बिगर शेती करताना ही कागदपत्रे त्यांचेकडे सादर केली गेली असतीलच. तथापि या प्रकरणी अपिलार्थीने मागितलेली कागदपत्रे देण्या संदर्भात जनमाहिती अधिकारी व जनअपिलीय अधिकारी या दोघानीही प्रयत्न केल्याचे आयोगास आढळून आले नाही. या उलट अपिलार्थीस त्यांनी दुस-या शासकीय प्राधिकरणाकडे जाण्याचे सूचीत केले. अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपीलातील संबंधीत अधिका-याने दिशाभूल करणारे उत्तर दिले, हया अपिलार्थीच्या म्हणण्यामध्ये मोठया प्रमाणात तथ्यांश असल्याचे आयोगास आढळून आले आहे. अपिलार्थीने मागितलेली कागदपत्रे शासनाच्या कोणत्या अभिलेख प्रवर्गात मोडतात. याची विचारणा केली असता,

तत्कालीन तहसीलदार यांनी सुनावणीमध्ये सदर कागदपत्रे 'अ' वर्गात मोडतात असे आयोगास सांगितले. 'अ' वर्गात मोडणा-या कागदपत्राचे जतन हे कायम स्वरुपी करावयाचे असते, ही बाब लक्षात घेता, अपिलार्थीने मागणी केलेली कागदपत्रे जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयात उपलब्ध असणे अनिवार्य आहे. तेंव्हा या प्रकरणी असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या कागदपत्राचा शोध घेवून जनमाहिती अधिकारी यांनी हे आदेश प्राप्त झाल्यानंतर सदर कागदपत्राच्या प्रती अपिलार्थीस पंधरा दिवसाच्या आत विनामूल्य पुरविण्यात याव्यात.

जिल्हाधिकारी, धुळे यांना असे सूचित करण्यात येते की, अपिलार्थीस ही कागदपत्रे प्राप्त होण्याच्या दृष्टीने त्यांनी तात्काळ सकारात्मक कार्यवाही करावी व जर हे अ वर्गातील अभिलेखे सापडत नसतील तर ज्या कर्मचा-याकडून ही अभिलेखे गहाळ झाली असतील त्यांच्यावर आवश्यक वाटल्यास फौजदारी कार्यवाही करावी. त्याच बरोबर अपिलार्थीने या प्रकरणी त्यांच्याकडे अर्ज करुनही त्यावर का कार्यवाही होवू शकली नाही, याची कारण शोधून काढून आपल्या प्रशासनामध्ये योग्य ती सुधारणा घडवून आणावी.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेली कागदपत्रे तीस दिवसात न देता अपिलार्थीस जनमाहिती अधिकारी यांच्याकडून फक्त उडवाउडवीची उत्तरे दिली गेली आहेत. अपिलार्थीस माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील विहित केलेल्या तरतुदीनूसार मुदतीत माहिती न पुरविल्यामूळे, जनमाहिती अधिकारी यांना आयोगातर्फे ताकीद देण्यात येत आहे. याची नोंद त्यांच्या सेवापुस्तकात घेवून आपला

अनुपालन अहवाल उपविभागीय अधिकारी, धुळे यांनी आयोगास १५ दिवसाचे आत सादर करावा. सबब खालील प्रमाणे निर्णय पारीत करण्यात येत आहे.

## **<u>निर्णय</u>**

९. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

१०. अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या कागदपत्रांचा शोध घेवून जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ही माहिती, हे आदेश प्राप्त झाल्यानंतर पंधरा दिवसाच्या आत विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

११. अपिलार्थीस माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील विहित केलेल्या तरतुदीनूसार मुदतीत माहिती न पुरविल्यामूळे, जनमाहिती अधिकारी यांना आयोगातर्फे ताकीद देण्यात येत आहे. याची नोंद त्यांच्या सेवापुस्तकात घेवून आपला अनुपालन अहवाल उपविभागीय अधिकारी, धुळे यांनी आयोगास १५ दिवसाचे आत सादर करावा.

**औरंगाबाद.**
दिनांक २९ जून,२००७

**(वि. बा. बोरगे)**
**राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद**

प्रति,

१ सौ.प्रमिला अशोक चव्हाण, १०३, गुरुकृपा, आरती सह.गृ. संस्था देवपूर, धुळे

२ जनमाहिती अधिकारी तथा तलाठी, यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

३ जनअपिलिय अधिकारी तथा तहसीलदार,धुळे यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

४ उपविभागीय अधिकारी, धुळे यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

५ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला, नविन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई – ३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यासाठी.

६ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/३८६

निर्णय दिनांक २९-०६-२००७

श्री. आडेसरा संजय सुरेश, : अपीलार्थी
३ ब, सानिका को-ऑपरेटिव्ह हौसिंग
सोसायटी, राजपाल कॉलनी, मखमलाबाद
नाका, पंचवटी,
नाशिक – ४२२ ००३

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा उप आयुक्त (प्रशासन),
नाशिक महानगरपालिका, नाशिक

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा आयुक्त नाशिक महानगरपालिका,
नाशिक

**विवेचन**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २९-०६-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपीलार्थी श्री. आडेसरा संजय सुरेश (यापुढे त्यांना अपीलार्थी असे संबोधण्यात येईल) व जन माहिती अधिकारी तथा उप आयुक्त (प्रशासन), नाशिक महानगरपालिका, नाशिक श्री. जे. एम. ढाकरे (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत. जन अपिलीय अधिकारी तथा आयुक्त नाशिक महा नगरपालिका, नाशिक यांचे वतीने त्यांचे प्रतिनिधी म्हणून जन माहिती अधिकारी तथा उप आयुक्त (प्रशासन) नाशिक महानगरपालिका नाशिक हे हजर आहेत. यापुढे जन अपीलीय अधिका-यांनी आयोगासमोरील सुनावणीस व्यक्तिशः हजर व्हावे असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

या प्रकरणी सर्व प्रथम अपीलार्थीने त्यांच्याकडील दिनांक २२-११-२००५ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे सरळ सेवा भरती करतांना सर्वसाधारण उमेदवारा करिता आवश्यक असलेले किमान गुण व इतर मागासवर्गीय उमेदवारांना या प्रकरणी मिळणा-या गुणात्मक सुटीविषयी खालील प्रमाणे माहिती मागविली होती.

> “ नाशिक मनपाच्या आस्थापना विभागातर्फे सरळ सेवा भरती करतांना भारतीय घटना तसेच महाराष्ट्र नागरी सेवा अधिनियम १९८२ अन्वये सर्वसाधारण उमेदवारांना किमान गुण किती आवश्यक आहे याची माहिती, या उपरांत सर्वसाधारण उमेदवारापेक्षा मागासवर्गीय उमेदवारांना कमाल गुणात्मक सुट किती देता येते, या नियमाची माहिती व इतर मागासवर्गीय उमेदवारांना देखील गुणात्मक सुट लागू होते काय, असल्यास कोणत्या नियमाच्या आधारे ही गुणात्मक सुट लागू होते त्या नियमांची माहिती.”

सदर माहिती अपीलार्थीने व्यक्तीशः अपेक्षिली होती.

अपीलार्थीच्या या अर्जावर सर्व प्रथम आयुक्त महानगरपालिका नाशिक यांनी त्यांचे कडील दिनांक २०-१२-२००५ रोजीच्या पत्रान्वये अपीलार्थीस माहिती पुरविण्यासंदर्भात उत्तर दिले. जन माहिती अधिकारी यांनी काहीही उत्तर या टप्प्यावर दिले नाही. त्या उत्तरामध्ये त्यांनी अपीलार्थीस सदर नियमांची पुस्तिका आपणास कार्यालयीन वेळेत कार्यालयात उपलब्ध करुन देण्यात येईल असे म्हटले आहे. त्याच बरोबर मागासवर्गीच्या सेवा भरती प्रकरणी शैक्षणिक पात्रता, अनुभव इत्यादी बाबत शिथिलता देणे कामी शासनाने सुचित केल्याप्रमाणे त्याचे अनुपालन करुन वरील नियमान्वये नियुक्ती प्रक्रिया राबविण्यात येतात असा उल्लेख केला आहे.

अपीलार्थीस सदर नियमाची पुस्तिका उपलब्ध करुन दिली होती काय असे विचारले असता अपीलार्थीने त्यांना सदर नियमांची पुस्तिका अद्याप उपलब्ध करुन देण्यात आली नसल्याचे आयोगास सांगितले. अपीलार्थीच्या दिनांक २२-११-२००५ रोजीच्या माहिती अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी कोणतीही कृती न करता आयुक्त महानगरपालिका नाशिक यांनी दिलेले उत्तर हे प्रमाण मानून पुढे कारवाई केली नसल्याचे दिसून येत आहे.

आयुक्त महानगरपालिका नाशिक यांचेकडील पत्र अपीलार्थीस दिनांक २४-१२-२००५ रोजी प्राप्त झाले. त्यावर समाधान न झाल्याने अपीलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) अन्वये जन अपीलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०४-०१-२००६ रोजी प्रथम अपील केले. या अपीलामध्ये त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

सदर अपीलाची सुनावणी जन अपीलीय अधिकारी यांनी दिनांक ०३-०२-२००७ रोजी घेऊन आपले अंतीम आदेश दिनांक १०-०२-२००७ रोजी पारित केले. सदर आदेशा मध्ये त्यांनी उप आयुक्त (प्रशासन) महानगरपालिका नाशिक जे या प्रकरणी जन माहिती अधिकारी आहेत त्यांनी अपीलार्थीस त्यांच्या अर्जानुसार आवश्यक ती माहिती व सेवा भरती बाबतची नियमावली ३० दिवसाच्या आत देण्याचे सुचित केले.

तथापि या आदेशा नंतरही अपीलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपेक्षित माहिती न मिळाल्यामुळे अपीलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १५-०५-२००६ रोजी व्दितीय अपील केले. या अपीलामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी व जन अपीलीय अधिकारी यांनी त्यांना हवी असलेली माहिती स्पष्टपणे देण्यास टाळाटाळ केली असल्याचे आयोगाचे निदर्शनास आणले व संबंधित जन माहिती अधिकारी यांचेवर नियमानुसार कारवाई होण्यासाठी आयोगास विनंती केली आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी सेवेच्या सर्वसाधारण शर्तीनुसार सरळ सेवा भरती करतांना सर्वसाधारण उमेदवारांकरिता आवश्यक असलेले किमान गुण तसेच मागासवर्गीय व इतर मागासवर्गीय उमेदवारांना सर्वसाधारण उमेदवारापेक्षा लागू होत असलेल्या गुणात्मक सुट विषयीची नियमाची माहिती मागविली आहे.

आज झालेल्या युक्तीवादामध्ये असे आढळून आले आहे की, जन माहिती अधिकारी, अपीलार्थी व महानगरपालिकेचे प्रशासन यामध्ये या विषयावर बराच पत्रव्यवहार झाला आहे. अपीलार्थी यांनी मागणी केलेली माहिती प्रशासनास सरळपणे व स्पष्टपणे पुरविणे सहज शक्य होते तथापि जन माहिती अधिकारी तसेच त्यांच्या आस्थापना विषयक शाखेने अपीलार्थीस

कोणतीही  माहिती स्पष्टपणे देण्याचे टाळल्याचे दिसत आहे.  जन माहिती अधिकारी यांनी आज त्यांच्यातर्फे असा युक्तीवाद मांडला की महानगरपालिकेतर्फे कोठलीही भरती करत असतांना त्या भरतीसाठी खुल्या प्रवर्गातील आणि इतर प्रवर्गातील उमेदवारांना किमान किती गुण आवश्यक आहे हे त्या जाहिरामध्ये स्पष्ट केलेले असते.  वानगीदाखल त्यांनी आयोगास एक जाहिरात दाखविली. त्या जाहिरातीमध्ये सर्वसाधारण गटासाठी व मागासवर्गीय गटा करिता किमान किती गुण त्यांना असणे आवश्यक आहे याची सर्व वाचकांना कल्पना दिल्याचे दिसून येते.  त्यांनी आपल्या युक्तीवादाचे स्पष्टीकरण करतांना असे सांगितले की, या गुणा मध्ये पदानुसार बदल करण्यात येतो व खुल्या प्रवर्गातील उमेदवार वगळता इतर उमेदवारा करिता किती गुण ठेवावयाचे किंवा कोणते निकष लावावयाचे हे अद्यापही महा नगरपालिकेने कोणत्याही नियमाव्दारे निश्चीत केलेले नाही.  तथापि किमान आवश्यक गुणा मध्ये बदल करण्याचे अधिकार आयुक्तांना महानगरपालिकेच्या दिनांक २१-०६-१९८५ च्या ठरावान्वये दिलेले आहेत.  त्यामुळे आवश्यकतेनुसार त्यात किमान पात्रतेमध्ये बदल केले जातात.

दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला असता असे आढळून आले आहे की, महानगरपालिके कडे सर्वसाधारण भरतीकरिता किमान पात्रतेसंदर्भात निश्चित असे कोणत्याही स्वरुपाचे धोरण नाही परंतु पदनिहाय हे धोरण बदलले जाते.  त्याच बरोबर जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणामध्ये त्यांचे यथोचित कर्तव्य वेळेत पार पाडलेले नाही.   तेव्हा या प्रकरणी असे आदेशित करण्यात येते की, अपीलार्थीने मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी त्यांना हे आदेश प्राप्त झाल्या पासून ७ दिवसाच्या आत लेखी स्वरुपात विनामूल्य देण्यात यावी व त्याच बरोबर जन माहिती अधिका-यांनी त्यांच्या, अपिलार्थीस विहित मुदतीत कोणताही सकारात्कक प्रतिसाद देण्यापोटी दाखविलेल्या कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल, त्यांच्यावर प्रचलित सेवा नियमा प्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कार्यवाही करुन आयुक्त नाशिक

महानगरपालिका यांनी आपला अनुपालन अहवाल आयोगास हे आदेश निर्गमित झाल्यापासून दोन महिन्याचे आत सादर करावा. त्याच बरोबर नाशिक महा नगरपालिकेने आपल्या उमेदवार भरती प्रकरणी निश्चित स्वरुपाचे धोरण व नियम निश्चित करुन त्याची काटेकोर पणे अंमलबजावणी करावी. तसेच कर्मचारी भरती प्रकरणात अशा प्रकारची गुंतागुंत भविष्यात टाळण्याच्या दृष्टीने नाशिक महानगरपालिकेने यापुढे, निश्चित स्वरुपाची सेवा नियमावली तयार करुन ती त्यांच्या वेबसाईटवर प्रसिध्दीसाठी देण्यात यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभुमीवर अपीलार्थीचे आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

**निर्णय**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.
२. जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थी यांनी मागितलेली माहिती हे आदेश प्राप्त झाल्या पासून ७ दिवसाच्या आत अपीलार्थीस लेखी स्वरुपात देण्यात यावी.
३. जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी दर्शविलेल्या कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल त्यांचेवर प्रचलित सेवा नियमाप्रमाणे आयुक्त नाशिक महानगरपालिका यांनी यथायोग्य प्रशासकीय कार्यवाही करुन आयोगास हे आदेश निर्गमित झाल्यापासून दोन महिन्याचे आत आपला अनुपालन अहवाल सादर करावा.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक २९ जून २००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. आडेसरा संजय सुरेश, ३ ब, सानिका को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी, राजपाल कॉलनी, मखमलाबाद नाका, पंचवटी, नाशिक – ४२२ ००३

२ जन माहिती अधिकारी तथा उप आयुक्त (प्रशासन), नाशिक महानगरपालिका, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा आयुक्त नाशिक महानगरपालिका, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

५ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/३८७

निर्णय दिनांक २९-०६-२००७

ॲड युवराज विठ्ठल ठोंबरे, : अपीलार्थी

कोर्ट शॉपिंग सेंटर, तहसील कचेरी रोड, मु.

पो. तालुका शिरपूर, जिल्हा धुळे

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा सदस्य सचिव :
विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती,
विभागीय समाजकल्याण अधिकारी कार्यालय,
नाशिक विभाग, नाशिक

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा विभागीय समाजकल्याण अधिकारी,
नाशिक विभाग, नाशिक

**विवेचन**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २९-०६-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपीलार्थी ॲडव्होकेट युवराज विठ्ठल ठोंबरे (यापुढे त्यांना अपीलार्थी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत. जन माहिती अधिकारी तथा सदस्य सचिव विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती, विभागीय समाजकल्याण अधिकारी कार्यालय, नाशिक विभाग, नाशिक हे गैरहजर आहेत. जन अपीलीय अधिकारी तथा विभागीय समाजकल्याण अधिकारी श्री. बी. व्ही. शिंदे (यापुढे त्यांना जन अपीलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपीलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील अर्ज दिनांक १३-०२-२००६ अन्वये जन माहिती अधिका-यास खालील प्रमाणे माहितीची मागणी केली होती.

१.   “ श्रीमती मोरे आक्का डोंगर जात महार यांनी दिनांक २६-०७-२००५ रोजी आपल्या कार्यालयात जात पडताळणीकरिता अर्ज सादर केला असून अर्ज आवक क्रमांक २०४४ असा आहे. सदर जात पडताळणी पदोन्नती होणेकरिता शासनाने मागविली आहे. आपणास लागणारी सर्व पुर्तता केली आहे.तरी आजपर्यत सदर जात पडताळणी करुन मिळालेली नाही याचे कारण काय ?

२.   आपल्या कार्यालयात जात पडताळणी अर्ज दिल्यापासून किती कालावधीत जात पडताळणी करुन मिळते.

३.   सदर जात पडताळणी करुन किती कालावधीने मिळेल.”

४.

अपीलार्थीने त्यांच्या अर्जात माहितीच्या कालावधीचा किंवा माहिती त्यांना पोस्टाने हवी किंवा व्यक्तीशः हवी याबाबत काहीही उल्लेख केलेला नाही.

अपीलार्थीच्या वरील प्रमाणे केलेल्या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस दिनांक ०९-०३-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद दिल्याचे दिसून येते. या पत्रामध्ये त्यांनी त्यांच्या कार्यालयात सेवाविषयक प्रकरणे मोठ्या प्रमाणात असल्यामुळे आपल्या प्रकरणा चा शोध चालू आहे व त्यास जादा कालावधी लागण्याची शक्यता आहे म्हणून प्रकरण शोधल्या नंतर तात्काळ कारवाई करण्यात येईल असे उत्तर दिले.

जन माहिती अधिकारी यांच्या वरील उत्तराने समाधान न झाल्याने अपीलार्थीने जन अपीलीय अधिकारी यांच्याकडे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१)

अन्वये दिनांक २०-०३-२००६ रोजी प्रथम अपील केले आहे. या अपीलामध्ये त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

अपीलार्थीच्या या अपीलावर जन अपीलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतली नाही त्यामुळे व्यथित होऊन अपीलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १८-०५-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे.

आज झालेल्या युक्तीवादामध्ये असे आढळून आले की जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस त्यांच्याकडील दिनांक ०९-०३-२००६ च्या पत्रान्वये अपीलार्थी यांच्या कडील अर्जास शोध घेणे चालू आहे असे कळविले होते तथापि आज सुनावणीच्या दिनांकास देखील म्हणजे अपीलार्थीने मूळ अर्ज दाखल केल्यापासून म्हणजे १४ महिन्यानंतरही अपीलार्थीचा अर्ज सापडला किंवा कसे या प्रश्नावर उपस्थित अधिकारी कोणत्याही प्रकारचा ठोस खुलासा सादर करु शकले नाहीत.त्यांच्या अर्जाबाबत त्यांनी अपीलार्थीस आश्वासन देऊन देखील अपीलार्थीस त्यांच्या अर्जासंदर्भात काहीही कळविले नाही. जर अपीलार्थीचा अर्ज त्यांना सापडत नव्हता तर त्यांनी अपीलार्थीस त्याप्रमाणे त्यांच्या दिनांक ०९-०३-२००६ च्या पत्रानंतर, अपीलार्थीस त्यांच्या प्रकरणाची लागलीच माहिती देणे जरुरीचे होते परंतु अपीलार्थीच्या या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी एका पत्रानंतर कोणत्याही प्रकारची कृती केलेली त्यांनी आयोगास उपलब्ध करुन दिलेल्या कागदपत्रा वरुन आढळून येत नाही. जन अपीलीय अधिकारी व अपीलार्थी ह्या दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला असता असे आदेशित करण्यात येते की जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या कागदपत्राच्या प्रती हे आदेश निर्गमित झाल्यापासून १० दिवसाच्या आत विनामूल्य व सांक्षांकीत करुन द्याव्यात

व त्याप्रमाणे अनुपालन अहवाल हे आदेश निर्गमित झाल्यापासून १५ दिवसाच्या आत आयोगास पाठवावा. त्याच बरोबर ही माहिती अपीलार्थीस त्यांनी आयोगापुढे आज विनंती केल्यानुसार, त्यांना व्यक्तीशः उपलब्ध करुन द्यावी. तसेच अपीलार्थीच्या मागणीच्या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील विहित केलेल्या कालावधीत माहिती न देणे या यांच्या कृतीव्दारे त्यांच्यामध्ये असलेल्या कर्तव्यपरायणतेचा अभाव त्यांनी सिध्द केला आहे. त्यांनी दाखविलेल्या या कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल सचिव (सामाजिक न्याय) यांनी त्यांचेवर महाराष्ट्र नागरी सेवा नियम १९७९ (शिस्त व अपील) नुसार योग्य ती प्रशासकीय कारवाई, हे आदेश निर्गमित झाल्यापासून २ महिन्याच्या आत करावी व तद नंतर या कारवाई संदर्भात आपला अनुपालन अहवाल आयोगास १ महिन्याच्या आत सादर करावा असेही त्यांना सुचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभुमीवर अपीलार्थीचे आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

## निर्णय

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या कागदपत्राच्या प्रती हे आदेश निर्गमित झाल्यापासून १० दिवसाच्या आत अपीलार्थीस विनामूल्य व सांक्षांकीत करुन उपलब्ध करुन द्याव्यात व या कृतीचा अनुपालन अहवाल हे आदेश निर्गमित झाल्या पासून १५ दिवसाच्या आत आयोगास पाठवावा. ही माहिती अपीलार्थीस व्यक्तीशः उपलब्ध करुन द्यावी.

३. सचिव (सामाजिक न्याय) मंत्रालय मुंबई जन माहिती अधिकारी यांचेवर महाराष्ट्र नागरी सेवा नियम १९७९ (शिस्त व अपील) नुसार योग्य ती प्रशासकीय कारवाई हे

आदेश निर्गमित झाल्यापासून २ महिन्याच्या आत करावी व तद नंतर या कारवाई संदर्भात अनुपालन अहवाल आयोगास १ महिन्याच्या आत पाठवावा.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक २९ जून २००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ ॲड युवराज विठ्ठल ठोंबरे, कोर्ट शॉपिंग सेंटर, तहसील कचेरी रोड, मु. पो. तालुका शिरपूर, जिल्हा धुळे

२ जन माहिती अधिकारी तथा सदस्य सचिव विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती, विभागीय समाजकल्याण अधिकारी कार्यालय, नाशिक विभाग, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय समाजकल्याण अधिकारी, नाशिक विभाग, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव (सामाजिक न्याय) मंत्रालय मुंबई यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

६ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

अपील क्रमांक- २००७/ ३९३/रामाआ/औ'बाद
निर्णय दिनांक ३० जून ,२००७

१. श्री.शेख गनीभाई शक्करभाई .. अपिलार्थी.

स्वातंत्र्यसैनिक व पत्रकार,
६३३, तोफखाना, अहमदनगर.
विरुध्द

| | | |
|---|---|---|
| १. जनमाहिती अधिकारी तथा<br>उपविभागीय अभियंता, रोहयो,<br>सार्वजनिक बांधकाम विभाग,<br>राहुरी. | .. | प्रतिवादी |
| २. जनअपिलिय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता, रोहयो,<br>सार्वजनिक बांधकाम उपविभाग,<br>अहमदनगर. | .. | |

## विवेचन

वरील प्रकरणाची सुनावणी दिनांक- ३० जून,२००७ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, श्री.शेख गनीभाई शक्करभाई, (येथून पुढे अपिलार्थी असे संबोधण्यात येईल.), जनमाहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम, रोहयो,उपविभाग, राहूरी, श्री.पी.एच.सुपे ( येथून पुढे जनमाहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल ) व जनअपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम, रोहयो, विभाग, अहमदगनर, श्री. सटकुटवार, ( येथून पुढे जनअपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल ) हे हजर आहेत.

वरील प्रकरणी अपिलार्थीने सन २००२-२००३, २००४-२००५ या आर्थीक वर्षात खरेदी केलेल्या पातळ डांबर व वाहतुकीच्या कागदपत्रांच्या प्रती मागविल्या आहेत. त्यांच्याकडील दिनांक- १७-१२-२००५ रोजीच्या अर्जान्वये जनमाहिती अधिकारी यांच्याकडून माहिती मागविली आहे. सदर माहितीचा तपशील त्यांनी खालीलप्रमाणे स्पष्ट केला आहे.

“ रस्त्याच्या किरकोळ दुरुस्तीसाठी उपविभागातंर्गत खरेदी केलेल्या डांबराच्या व त्याच्या वाहतुकीच्या संबंधातील कागदपत्रांच्या प्रती.

१) गेटपास व बील

२) डांबर खाली करतांना केलेल्या वजन काटयाच्या पावत्या.

३) वाहतुकीच्या बीलाच्या प्रती.

४) डांबर ज्या कामांसाठी वापरले त्या कामांच्या कार्यारंभ आदेश व निविदेमधील ‘शेडयुल बी’ च्या पानांच्या झेरॉक्स प्रती

५) वाहतुक ठेकेदारास दिलेल्या कार्यारंभ आदेशाच्या प्रती. ”

अपिलार्थीच्या या अर्जावर जनमाहिती अधिकारी यांनी त्यांचेकडील पत्र जा.क्र.भांडार/१०७/सन २००६, दिनांक- ३१-०१-२००६ अन्वये अपिलार्थीस ही माहिती देण्यापोटी येणारे शुल्क म्हणून ६०/- रु. भरणा त्यांच्या कार्यालयात करण्याच्या सूचना दिल्या व त्याच पत्रामध्ये अपिलार्थीने मागितलेली माहिती पैकी गेटपास व बीलाच्या प्रती व वाहतुकीच्या बीलाच्या प्रती अपिलार्थीस देण्याची जनमाहिती अधिकारी यांनी तयारी दर्शविली.

जनमाहिती अधिकारी यांच्याकडून मिळालेल्या अशा प्रकारच्या प्रतिसादावर अपिलार्थी यांचे समाधान न झाल्यामूळे अपिलार्थीने, जनअपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक- २०-०१-२००६ रोजी प्रथम अपील केले. या अपीलामध्ये अपिलार्थी यांनी त्यांची मूळमाहितीची मागणी कायम ठेवली आहे व जनमाहिती अधिकारी यांच्यावर दंडात्मक कार्यवाही करण्याची जनअपिलीय अधिकारी यांना विनंती केली आहे.

या अपीलअर्जा सोबत अपिलार्थीने जनमाहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना देण्यात आलेल्या निर्णयाची प्रत जोडली नसल्यामूळे हे अपील विचारात घेता येत नाही, असे जनअपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील पत्र जा.क्र. माअ/९२२/ सन २००६, दिनांक- ०८-०२-२००६ अन्वये कळविले.

जनअपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयावर व्यथीत होवून अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोगाकडे दिनांक- १५-०४-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे. आज झालेल्या युक्तीवादामध्ये जनअपिलीय अधिकारी यांच्या तर्फे असा युक्तीवाद मांडण्यात आला की, राज्य शासनाने प्रसिध्द केलेल्या दिनांक- १८-११-२००५ रोजीच्या राजपत्रामध्ये सामान्य प्रशासन विभागाची ११ ऑक्टोंबर २००५ रोजीची अधिसूचना प्रसिध्द केली आहे. त्या अधिसूचनेमध्ये जनअपिलीय अधिकारी यांच्याकडे करावयाच्या अपीलअर्जा सोबत ज्या आदेशा विरुध्द अपिलार्थीस अपील करावयाचे आहे. त्या आदेशाची प्रत त्यांनी जनअपिलीय अधिकारी यांच्याकडे केलेल्या प्रथम अपिलामध्ये जोडणे आवश्यक असल्याचे नमूद केले आहे. या प्रकरणात अपिलार्थी

यांनी जनअपिलीय अधिकारी यांच्याकडे केलेल्या प्रथम अपील अर्जा सोबत जनमाहिती अधिकारी यांच्याकडून मिळालेल्या आदेशाची प्रत जोडलेली नाही. त्यामूळे  हे अपील त्यांच्या पातळीवर त्यांना चालविता  आले नाही. अपिलार्थी यांना त्यांनी अपीलअर्जा सोबत जनमाहिती अधिकारी यांचे आदेश जोडले होते किंवा कसे, हे विचारले असता अपिलार्थी यांनी ही बाब आठवत नसल्याचे  सुनावणीमध्ये सांगितले. राज्य माहिती आयोगाकडे अपिलार्थी यांची व्दितीय अपीलाची सुनावणी होण्यापूर्वी या प्रकरणी जनअपिलीय अधिकारी यांच्याकडे या प्रकरणाची प्रथम सुनावणी होणे, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) अन्वये आवश्यक आहे, असे आयोगाचे मत आहे. सबब असे आदेशित करण्यात येते की, जनअपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीनी त्यांचेकडे दिनांक- २०-०१-२००६ रोजी केलेल्या प्रथम अपीलावर सुनावणी घेवून त्यावर प्राधान्याने निर्णय घ्यावा व तत्पूर्वी अपिलार्थीने जनमाहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या दिनांक- ३१-०१-२००६ च्या आदेशाची प्रत जनअपिलीय अधिकारी यांना  हे आदेश निर्गमीत झाल्यापासून सात दिवसाच्या आत उपलब्ध करुन द्यावी. वरील विवेंचनासह अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येत आहे. सबब खालील प्रमाणे निर्णय पारीत करण्यात येत आहे.

## **<u>निर्णय</u>**

१. अपिल निकाली काढण्यात  येत आहे.

२. जनअपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांचेकडे केलेल्या दिनांक-२०-०१-२००६ रोजी केलेल्या प्रथम अपीलावर सुनावणी घेवून प्राधान्याने निर्णय घ्यावा.  तत्पूर्वी अपिलार्थीने जनमाहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या दिनांक- ३१-०१-२००६ च्या आदेशाची प्रत  जनअपिलीय

अधिकारी यांना  हे आदेश निर्गमीत झाल्यापासून सात दिवसाच्या आत उपलब्ध करुन द्यावी.

अहमदनगर
दिनांक-३० जून, २००७.

**(वि. बा. बोरगे)**
**राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद**

प्रति,

१ श्री.शेख गनीभाई शक्करभाई ६३३, तोफखाना, अहमदनगर, तालूका-नगर, जिल्हा- अहमदनगर.

२ जनमाहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग,राहुरी, यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

३ जनअपिलीय अधिकारी तथा, कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम  रोहयो विभाग, अहमदनगर, यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

४ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला, नविन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई- ३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यासाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

अपील क्रमांक- २००७/ ३९५/रामाआ/औ'बाद
निर्णय दिनांक ३० जून ,२००७

१. श्री.हरियाल श्रावण फकिरा, .. अपिलार्थी.
६९९२, मंगलगेट, रोजेश ॲटो,
अहमदनगर.

विरुध्द

१. जनमाहिती अधिकारी तथा .. प्रतिवादी

मुख्याध्यापक,
श्री.मार्कंडेय माध्यमिक व उच्च
माध्यमिक विद्यालय, गांधी मैदान,
अहमदगनर.

२. जनअपिलिय अधिकारी तथा ..
शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जि.प.
अहमदगनर.

## विवेचन

वरील प्रकरणाची सुनावणी दिनांक- ३० जून,२००७ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, श्री.हरियाल श्रावण फकिरा, (येथून पुढे अपिलार्थी असे संबोधण्यात येईल.), जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, श्री.मार्कंडेय माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, गांधी मैदान, अहमदनगर, श्री. गोटीन्पामूळ व्ही.बी.,( येथून पुढे जनमाहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल ) व जनअपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (मा.) जिल्हापरिषद, अहदमनगर, श्री. अनिल सदावर्ते, ( येथून पुढे जनअपिलीय अधिकारी तथा असे संबोधण्यात येईल ) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीस त्यांचेकडील दिनांक- २८-१०-२००५ रोजीच्या पत्रान्वये जनमाहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या शिक्षण संस्थेच्या व कार्यालयाच्या नुतनीकरणा बाबत काही माहिती मागविली होती. या माहितीमध्ये– नुतनीकरणाचे काम केलेल्या फर्मचे नाव व पत्ता, सदरच्या कामाचा दर व पध्दती, नुतनीकरण करण्याचा ठराव व दिनांक, नुतनीकरणाच्या कामाचा कालावधी, नुतनीकरणासाठी साहित्य खरेदी केलेल्या फर्मची नावे व पत्ते, नुतनीकरणाच्या निविदा बाबत वर्तमान

पत्राची नावे व दिनांक, कार्यालयाच्या नुतनीकरणासाठी एकुण खर्च करण्यात आलेली रक्कम, सर्व खर्च कोणत्या खात्यातून / फंडातून करण्यात आला, या खात्याची आजची परिस्थिती काय आहे, नुतनीकरणाच्या कार्यक्रमावर खर्च केलेली एकूण रक्कम - या मुद्याचा समावेश होता.

अपिलार्थीने ही माहिती २००४ ते २००५ या आर्थीक वर्षातील मागितली आहे. अपिलार्थीच्या या अर्जावर जनमाहिती अधिकारी यांनी सर्व प्रथम दिनांक- २८-११-२००५ रोजी अपिलार्थीस ही माहिती देण्यापोटी लागणारे शुल्क म्हणून २००/- रुपये त्यांच्या कार्यालयास पाठविण्याचे सूचीत केले. त्यानंतर लगेचच त्यांचेकडील पत्र दिनांक- ०२-१२-२००५ अन्वये सदर संस्थेमध्ये दिनांक ०१ एप्रिल, २००४ ते ३१ मार्च, २००५ हया कालावधीत कोणत्याही प्रकारचे नूतनीकरणाचे काम केलेले नसल्यामूळे त्या संदर्भातची माहिती देता येत नाही, असे अपिलार्थीस कळविले.

जनमाहिती अधिकारी यांनी दोन्हीही वेळेस घेतलेल्या वेगवेगळया भुमिकेमुळे अपिलार्थीस माहिती प्राप्त झाली नाही व त्यांनी जनअपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक- ०६-०१-२००६ रोजी प्रथम अपील केले. या अपीलामध्ये त्यांनी आपली मूळमाहितीची मागणी कायम ठेवली आहे.

जनअपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या अपीलअर्जावर अपिलार्थीस त्यांच्याकडील पत्र दिनांक- १८-०१-२००६ अन्वये अपिलार्थीस दिनांक २४-०१-२००६ रोजी त्यांच्या कार्यालयात सुनावणीसाठी बोलाविले. सदर अपीलावर

जनअपीलीय अधिकारी यांच्या कार्यालयात कोणत्याही प्रकारची सुनावणी झाली नाही, असे जनमाहिती अधिकारी यांनी आज आयोगास सुनावणीमध्ये सांगितले.

जनमाहिती अधिकारी व जनअपिलीय अधिकारी यांच्याकडून मिळालेल्या अशा प्रकारच्या प्रतिसादामूळे व्यथीत होवून अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक- २१-०४-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे.

आज झालेल्या युक्तीवादामध्ये जनमाहिती अधिकारी यांनी त्यांचे म्हणणे शपथपत्राव्दारे आयोगास सादर केले आहे व त्यामध्ये त्यांनी अपिलार्थीस त्यांनी केलेल्या दिनांक- २८-१०-२००५ रोजीच्या अर्जामध्ये माहिती संबंधीत कालावधी २००४ ते २००५ असा दर्शविला होता व या कालावधीमध्ये शाळेत कोणत्याही प्रकारचे नुतनीकरणाचे काम झाले नाही व त्याप्रमाणे त्यांनी अपिलार्थीस दिनांक- ०२-१२-२००५ रोजी रजिष्टर पोष्टाव्दारे पत्र पाठविल्याचे नमूद केले आहे.

अपिलार्थीस सदर पत्र मिळाल्याची पोंचपावती जनमाहिती अधिकारी यांनी आयोगा समोर हजर केली. त्यांच्या या शपथपत्रामध्ये त्यांनी पुढे असेही म्हटले आहे की, अपिलार्थी हे या विषयावर त्यांच्याकडे वेळोवेळी अर्ज करीत असतात, त्याचबरोबर सदर संस्थेच्या विरुध्द त्यांनी शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांच्याकडेही वेळोवेळी अशा प्रकारचे एकूण १९ अर्ज केले आहेत. जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे असे आहे की, या प्रकरणात सदर शिक्षण संस्थेचे सचिव जनअपिलीय अधिकारी असतांना त्यांनी शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हापरिषद, अहमदगनर

यांच्याकडे प्रथम अपीलअर्ज केला होता. त्यांनी चुकीच्या प्राधिकरणाकडे प्रथम अपील दाखल केले असल्यामूळे त्यांचे अपील फेटाळण्यात यावे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळमाहितीच्या अर्जाव्दारे मागितलेली माहिती मध्ये “ आर्थीक वर्ष अशा अर्थाचा कोठेही शब्दप्रयोग केला नाही. अपिलार्थीस माहिती संबंधात कालावधी २००४ ते २००५ असा दर्शविला आहे.” या संस्थेमध्ये नुतनीकरणाचे काम दिनांक- १५ एप्रिल, २००५ ते ऑगस्ट, २००५ असे दर्शविले आहे. त्यामूळे जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक- ०२-१२-२००५ रोजीच्या पत्रान्वये दिलेले उत्तर चुकीचे ठरते. त्याचबरोबर प्रत्येक शिक्षण संस्थेमध्ये संबंधीत संस्थेचे सचिव यांना जनअपिलीय अधिकारी नेमण्याचे आदेश शिक्षण संचालकाकडून दिनांक- ३०-०८-३००६ रोजी पारीत झाले . म्हणजेच अपिलार्थीने प्रथम अपील केलेल्या दिनांकाच्या ( दिनांक- ०६-०१-२००६) रोजी शिक्षण अधिकारी (माध्यमिक) हेच अपिलीय अधिकारी होते. त्यामूळे अपिलार्थीने केलेल्या प्रथम अपीलाच्या संबंधातील जनमाहिती अधिकारी यांनी केलेला युक्तीवाद येथे लागू पडत नाही.

अपिलार्थीने याच प्रकरणी दुस-या एका केलेल्या अर्जाच्या संदर्भात सदर शिक्षण संस्थेने अपिलार्थीस त्यांच्याकडील पत्र क्रमांक ३३५, दिनांक- १९-०१-२००६ अन्वये काही माहिती पाठविल्याचे उपलब्ध कागदपत्रावरुन दिसून येते. तथापि ही माहिती अपिलार्थीने त्यांच्याकडील अर्ज दिनांक- ०६-१२-२००५ रोजीच्या संदर्भात दिलेली माहिती आहे. हया माहितीमध्ये अपिलार्थीने त्यांच्या दिनांक- २८-१०-२००५ रोजीच्या अर्जान्वये विचारलेले बहूतांश सर्व मुद्यांचा समावेश आहे. तथापि अपिलार्थीस

दिलेल्या या माहितीमध्ये नुतनीकरण करण्याचा ठराव ,दिनांक व नुतनीकरणाच्या कामासाठी खर्च करण्यात आलेली निश्चीत रक्कम. या दोन मुद्याचा समावेश नाही. अपिलार्थीने विचारलेली या संस्थेची आर्थीक परिस्थिती काय आहे. या संदर्भातील माहिती प्रश्नार्थक स्वरुपात विचारली आहे व ही माहिती सर्वसाधारण स्वरुपाची आहे. अशा प्रकारची सर्वसाधारण स्वरुपाची व प्रश्नार्थक विचारलेली माहिती अपिलार्थीस देणे जनमाहिती अधिकारी यांच्यावर बंधनकारक नाही.

अपिलार्थीस आता उर्वरीत जी माहिती संस्थेने द्यावयाची आहे, ही माहिती जनमाहिती अधिकारी यांना संस्थेच्या कार्यालयातून जावून आणावी लागेल, असे त्यांनी आज सुनावणीमध्ये सांगितले. तेंव्हा असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांचे दिनांक- २८-१०-२००५ रोजीच्या अर्जान्वये जी माहिती मागितली होती व जी माहिती अद्यापही अपिलार्थीस देणे बाकी आहे. ती सर्व माहिती स्पष्ट स्वरुपात हे आदेश निर्गमीत झाल्या पासून सात दिवसाच्या आत जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, विनामुल्य पुरवावी. वरील विवेंचनासह अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे. सबब खालील प्रमाणे निर्णय पारीत करण्यात येत आहे.

## **निर्णय**

२. अपील अशंतः मान्य करण्यात येत आहे.

३. अपिलार्थीने त्यांचे दिनांक- २८-१०-२००५ रोजीच्या अर्जान्वये जी माहिती मागितली होती व जी माहिती अद्यापही अपिलार्थीस देणे बाकी आहे. ती सर्व माहिती स्पष्ट स्वरुपात हे आदेश निर्गमीत झाल्या पासून सात दिवसाच्या आत जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, विनामुल्य पुरवावी.

अहमदनगर
दिनांक-३० जून, २००७.

**(वि. बा. बोरगे)**
**राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद**

प्रति,

१ श्री.हरियाल श्रावण फकिरा, ६९९२ मंगलगेट, राजेश ॲटो, अहमदनगर, तालूका जिल्हा- अहमदनगर.

२ जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक श्री. मार्कडेय विद्यानगर गांधी मैदान, अहदमनगर,यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

३ जनअपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक)जिल्हापरिषद, अहदमदनगर, यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

४ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला, नविन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई- ३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यासाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

अपील क्रमांक- २००७/ ३९६/रामाआ/औ'बाद
निर्णय दिनांक ३० जून ,२००७

१. श्री.महादेव बापुराव मोरे, .. अपिलार्थी.
भिस्तबाग, ढवण वस्ती,
अहमदनगर, जिल्हा- अहमदनगर.

विरुध्द

१. जनमाहिती अधिकारी तथा .. प्रतिवादी
शहरअभियंता,

महानगरपालिका, अहमदनगर.

२. जनअपिलीय अधिकारी तथा ..
उपआयुक्त,
महानगरपालिका, अहमदनगर.

## विवेचन

वरील प्रकरणाची सुनावणी दिनांक- ३० जून,२००७ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, श्री. महादेव बापुराव मोरे, (येथून पुढे अपिलार्थी असे संबोधण्यात येईल.), जनमाहिती अधिकारी तथा शहर अभियंता, श्री. मगर नंदकूमार भास्करराव, ( येथून पुढे जनमाहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल ) व जनअपिलीय अधिकारी तथा उपआयुक्त, महानगरपालिका, अहमदनगर श्री. आर.के.देशमुख ( येथून पुढे जनअपिलीय अधिकारी तथा असे संबोधण्यात येईल ) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने प्रथम त्यांच्याकडील दिनांक- ३१-०१-२००६ रोजीच्या अर्जान्वये अहमदनगर शहरामध्ये खाजगी तत्वावर शहर बस सेवा सुरुवात करण्या संदर्भात, २००५ ते २००६ हया कालावधीतील माहिती मागविली होती. या माहितीमध्ये अहमदनगर शहरामध्ये ठेकेदार पध्दतीने बस सेवा सुरु करण्याचे महापालिकेने प्रस्ताविले होते व या विषया संदर्भात खाजगी ठेकेदार व महानगरपालिका यांच्यात झालेल्या कराराची झेरॉक्सप्रती -- या मुद्यांचा समावेश होता.

सदर माहिती अपिलार्थीने व्यक्तीशः अपेक्षिली होती.

तथापि अपिलार्थीच्या या अर्जावर जनमाहिती अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारे अपिलार्थीस माहिती पुरविण्याच्या दृष्टीने प्रयत्न केल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही.

जनमाहिती अधिकारी यांच्याकडून आवश्यक ती माहिती प्राप्त न झाल्यामूळे अपिलार्थीने जनअपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक- ०६-०३-२००६ रोजी प्रथम अपील केले. या अपीलामध्ये अपिलार्थी यांनी आपली मूळमाहितीची मागणी कायम ठेवली आहे. सदर अपीलाची सुनावणी दिनांक- २२-०३-२००६ रोजी जनअपिलीय अधिकारी यांनी घेतली. सदर अपीलाच्या सुनावणीमध्ये जनअपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांचे अपील मान्य करण्यात येवून संबंधीत जनमाहिती अधिकारी यांच्या विरुध्द महानगरपालिका स्तरावर नियमानूसार उचित कार्यवाही करावी व अपिलार्थी यांना नियमानुसार अपेक्षिलेली माहिती विनामुल्य पुरविण्यात यावी, असे जनमाहिती अधिकारी यांना आदेशित केले.

तथापि वरील आदेशाने समाधान न झाल्यामूळे व्यथीत होवून अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोगाकडे दिनांक- ११-०४-२००६ रोजी व्दितीय अपील दाखल केले आहे. त्यामध्ये त्यांनी संबंधीत जनमाहिती अधिकारी यांनी वेळेत माहिती न दिल्यामूळे त्यांना दंड व्हावा, अशी मागणी केली आहे.

आज झालेल्या युक्तीवादामध्ये जनमाहिती अधिकारी यांना, अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती विहित मुदतीत न देण्याचे कारण विचारले असता, त्यांनी

अपिलार्थी यांनी ज्या दिवशी माहितीच्या मागणीसाठी अर्ज केला होता. त्या दिवशी महानगरपालिका व संबंधित ठेकेदार यांच्यात करार न झाल्यामूळे त्यांना अपिलार्थीस ही माहिती पुरविणे शक्य झाले नाही. महानगरपालिका व संबंधित ठेकेदार यांच्यामध्ये प्रत्यक्ष करार दिनांक- ०४-०३-२००६ रोजी झाला व सदर करारनाम्याच्या झेरॉक्सप्रती अपिलार्थीस जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक- ०६-०३-२००६ रोजी दिल्याचे जनमाहिती अधिकारी हे सुनावणीमध्ये सांगत आहेत. तथापि अपिलार्थी यांचे म्हणणे असे आहे की, त्यांना दिनांक- २२-०३-२००६ रोजी सदर माहिती प्राप्त झाली. अपिलार्थीस दिनांक- ०६-०३-२००६ रोजी सदर प्रत मिळाल्याप्रित्यर्थ जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीची स्वाक्षरी घेवून त्याची पोंचपावती आयोगा समोर सादर केली आहे. तथापि अपिलार्थी यांचे म्हणणे असे आहे की, जर मला दिनांक- ०६-०३-२००६ रोजी माहिती मिळाली असती तर मी त्या दिवशी अपील केले नसते व मला दिनांक २२-०३-२००६ रोजी माहिती मिळाली आहे. या त्यांच्या भूमिकेवर ते ठाम आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन व दोन्हीही बाजूने मांडलेल्या युक्तीवादावरुन असे आदेशित करण्यात येते की, या प्रकरणी जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यापोटी विलंब केलेला आहे. जर अपिलार्थीने मागितलेली माहिती, माहिती अर्जाच्या दिवशी त्यांच्याकडे उपलब्ध नव्हती तर त्यांनी अपिलार्थीस त्याप्रमाणे विहित मुदतीत कळवून अपिलार्थीच्या माहिती अर्जावर निर्णय घेणे भाग होते. तथापि त्यांनी असे काही केलेले आढळून येत नाही.त्यांच्या या गप्प बसण्याच्या कृती व्दारे त्यांनी त्यांचेतील कर्तव्य परायणतेचा अभाव सिध्द केला आहे. अपिलार्थीचे अपील जनअपिलीय अधिकारी यांनी मान्य केले आहे व अपिलार्थीस आता त्यांना आवश्यक असलेली माहिती विनामुल्य प्राप्त झालेली आहे. जनमाहिती

अधिकारी यांनी या प्रकरणी दाखविलेल्या कर्तव्य परायणतेच्या अभावा बद्दल त्यांचे विरुध्द माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० (२) अन्वये महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ मधील तरतुदीस अनुसरुन संबंधित प्रशासकीय प्राधिकरणाने योग्य ती प्रशासकीय कार्यवाही करुन आयोगास आपला अहवाल दोन महिन्याच्या आत सादर करावा. असे आदेशित करण्यात येत आहे. वरील विवेंचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येत आहे. सबब खालील प्रमाणे निर्णय पारीत करण्यात येत आहे.

## निर्णय

४. अपिल निकाली काढण्यात येत आहे.

५. जनमाहिती अधिकारी यांनी या प्रकरणी दाखविलेल्या कर्तव्य परायणतेच्या अभावा बद्दल माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० (२) मधील तरतुदी अन्वये महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ मधील तरतुदीस अनुसरुन संबंधित प्रशासकीय प्राधिकरणाने योग्य ती प्रशासकीय कार्यवाही करुन आयोगास आपला अहवाल दोन महिन्याच्या आत सादर करावा.

अहमदनगर<br>
दिनांक-३० जून, २००७.

**(वि. बा. बोरगे)**<br>
**राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद**

प्रति,

१ श्री.महादेव बाबपुराव मोरे, भिस्तबाग, ढवण वस्ती, अहमदनगर, जिल्हा- अहमदनगर.

२ जनमाहिती अधिकारी तथा शहरअभियंता, महानगरपालीका, अहमदनगर, यांना

वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

३ जनअपिलीय अधिकारी तथा, उपआयुक्त, महानगरपालीका, अहमदनगर, यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

४ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला, नविन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई- ३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यासाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

अपील क्रमांक- २००७/ ३९६/रामाआ/औ'बाद
निर्णय दिनांक ३० जून ,२००७

१. श्री.महादेव बापुराव मोरे, .. अपिलार्थी.
भिस्तबाग, ढवण वस्ती,
अहमदनगर, जिल्हा- अहमदनगर.

विरुध्द

१. जनमाहिती अधिकारी तथा .. प्रतिवादी
शहरअभियंता,
महानगरपालिका, अहमदनगर.

२. जनअपिलीय अधिकारी तथा ..
उपआयुक्त,
महानगरपालिका, अहमदनगर.

**<u>विवेचन</u>**

वरील प्रकरणाची  सुनावणी दिनांक- ३० जून,२००७ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, श्री. महादेव बापुराव मोरे, (येथून पुढे अपिलार्थी असे संबोधण्यात येईल.), जनमाहिती अधिकारी तथा शहर अभियंता, श्री. मगर नंदकूमार भास्करराव, ( येथून पुढे जनमाहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल ) व जनअपिलीय अधिकारी तथा उपआयुक्त, महानगरपालिका, अहमदनगर श्री. आर.के.देशमुख  ( येथून पुढे जनअपिलीय अधिकारी तथा असे संबोधण्यात येईल ) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने प्रथम त्यांच्याकडील दिनांक- ३१-०१-२००६ रोजीच्या अर्जान्वये अहमदनगर शहरामध्ये खाजगी तत्वावर शहर बस सेवा सुरुवात करण्या संदर्भात, २००५ ते २००६ हया कालावधीतील माहिती मागविली होती. या माहितीमध्ये अहमदनगर शहरामध्ये  ठेकेदार पध्दतीने बस सेवा सुरु करण्याचे महापालिकेने प्रस्ताविले होते व या विषया संदर्भात खाजगी ठेकेदार व महानगरपालिका यांच्यात झालेल्या कराराची झेरॉक्सप्रती --  या मुद्यांचा समावेश होता.

सदर माहिती अपिलार्थीने व्यक्तीशः अपेक्षिली होती.

तथापि अपिलार्थीच्या या अर्जावर जनमाहिती अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारे अपिलार्थीस माहिती पुरविण्याच्या दृष्टीने प्रयत्न केल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही.

जनमाहिती अधिकारी यांच्याकडून आवश्यक ती माहिती प्राप्त न झाल्यामूळे अपिलार्थीने जनअपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक- ०६-०३-२००६ रोजी प्रथम अपील केले. या अपीलामध्ये अपिलार्थी यांनी आपली मूळमाहितीची मागणी कायम ठेवली आहे. सदर अपीलाची सुनावणी दिनांक- २२-०३-२००६ रोजी जनअपिलीय अधिकारी यांनी घेतली. सदर अपीलाच्या सुनावणीमध्ये जनअपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांचे अपील मान्य करण्यात येवून संबंधीत जनमाहिती अधिकारी यांच्या विरुध्द महानगरपालिका स्तरावर नियमानूसार उचित कार्यवाही करावी व अपिलार्थी यांना नियमानुसार अपेक्षिलेली माहिती विनामुल्य पुरविण्यात यावी, असे जनमाहिती अधिकारी यांना आदेशित केले.

तथापि वरील आदेशाने समाधान न झाल्यामूळे व्यथीत होवून अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोगाकडे दिनांक- ११-०४-२००६ रोजी व्दितीय अपील दाखल केले आहे. त्यामध्ये त्यांनी संबंधीत जनमाहिती अधिकारी यांनी वेळेत माहिती न दिल्यामूळे त्यांना दंड व्हावा, अशी मागणी केली आहे.

आज झालेल्या युक्तीवादामध्ये जनमाहिती अधिकारी यांना, अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती विहित मुदतीत न देण्याचे कारण विचारले असता, त्यांनी अपिलार्थी यांनी ज्या दिवशी माहितीच्या मागणीसाठी अर्ज केला होता. त्या दिवशी महानगरपालिका व संबंधित ठेकेदार यांच्यात करार न झाल्यामूळे त्यांना अपिलार्थीस ही माहिती पुरविणे शक्य झाले नाही. महानगरपालिका व संबंधित ठेकेदार यांच्यामध्ये प्रत्यक्ष करार दिनांक- ०४-०३-२००६ रोजी झाला व सदर करारनाम्याच्या झेरॉक्सप्रती अपिलार्थीस जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक- ०६-०३-२००६ रोजी

दिल्याचे जनमाहिती अधिकारी हे सुनावणीमध्ये सांगत आहेत. तथापि अपिलार्थी यांचे म्हणणे असे आहे की, त्यांना दिनांक- २२-०३-२००६ रोजी सदर माहिती प्राप्त झाली. अपिलार्थीस दिनांक- ०६-०३-२००६ रोजी सदर प्रत मिळाल्याप्रित्यर्थ जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीची स्वाक्षरी घेवून त्याची पोंचपावती आयोगा समोर सादर केली आहे. तथापि अपिलार्थी यांचे म्हणणे असे आहे की, जर मला दिनांक- ०६-०३-२००६ रोजी माहिती मिळाली असती तर मी त्या दिवशी अपील केले नसते व मला दिनांक २२-०३-२००६ रोजी माहिती मिळाली आहे. या त्यांच्या भूमिकेवर ते ठाम आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन व दोन्हीही बाजूने मांडलेल्या युक्तीवादावरुन असे आदेशित करण्यात येते की, या प्रकरणी जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यापोटी विलंब केलेला आहे. जर अपिलार्थीने मागितलेली माहिती, माहिती अर्जाच्या दिवशी त्यांच्याकडे उपलब्ध नव्हती तर त्यांनी अपिलार्थीस त्याप्रमाणे विहित मुदतीत कळवून अपिलार्थीच्या माहिती अर्जावर निर्णय घेणे भाग होते. तथापि त्यांनी असे काही केलेले आढळून येत नाही.त्यांच्या या गप्प बसण्याच्या कृती व्दारे त्यांनी त्यांचेतील कर्तव्य परायणतेचा अभाव सिध्द केला आहे. अपिलार्थीचे अपील जनअपिलीय अधिकारी यांनी मान्य केले आहे व अपिलार्थीस आता त्यांना आवश्यक असलेली माहिती विनामुल्य प्राप्त झालेली आहे. जनमाहिती अधिकारी यांनी या प्रकरणी दाखविलेल्या कर्तव्य परायणतेच्या अभावा बद्दल त्यांचे विरुध्द माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० (२) अन्वये महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ मधील तरतुदीस अनुसरुन संबंधित प्रशासकीय प्राधिकरणाने योग्य ती प्रशासकीय कार्यवाही करुन आयोगास आपला अहवाल दोन महिन्याच्या आत सादर करावा. असे आदेशित करण्यात येत आहे.

वरील विवेंचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात  येत आहे. सबब खालील प्रमाणे निर्णय पारीत करण्यात येत आहे.

## <u>निर्णय</u>

६. अपिल निकाली काढण्यात  येत आहे.

७. जनमाहिती अधिकारी यांनी या प्रकरणी दाखविलेल्या कर्तव्य परायणतेच्या अभावा बद्दल  माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० (२) मधील तरतुदी अन्वये महाराष्ट्र नागरी सेवा  (शिस्त व अपील) नियम १९७९ मधील तरतुदीस अनुसरुन संबंधित प्रशासकीय प्राधिकरणाने योग्य ती प्रशासकीय कार्यवाही करुन आयोगास आपला अहवाल दोन महिन्याच्या आत सादर करावा.

अहमदनगर
दिनांक-३० जून, २००७.

**(वि. बा. बोरगे)**
**राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद**

प्रति,

१ श्री.महादेव बाबपुराव मोरे, भिस्तबाग, ढवण वस्ती, अहमदनगर, जिल्हा- अहमदनगर.

२ जनमाहिती अधिकारी तथा शहरअभियंता, महानगरपालीका, अहमदनगर, यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

३ जनअपिलीय अधिकारी तथा, उपआयुक्त, महानगरपालीका, अहमदनगर,  यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

४ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला, नविन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई- ३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यासाठी.

५ निर्णय नस्ती.